
# स्वातंत्र्यवीर सावरकर
## व्यक्तिदर्शन

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ३०१३



REFBK-0024094

संदर्भ निबंध
३०९३
२४०९४
७।१।८४

# स्वातंत्र्यवीर सावरकर व्यक्तिदर्शन

REFBK-0024094

संपादक : प्रा. श्याम अत्रे

प्रकाशक : भारतीय विचार साधना, पुणे

प्रकाशक –
ब. शं. दाते
भारतीय विचार साधना
१८४७, सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०

# स्वातंत्र्यवीर सावरकर
## व्यक्तिदर्शन

मूल्य : दहा रुपये

मुद्रक –
गोपाळ द. जोशी
अक्षर मुद्रण,
स्वानंद नगर,
कल्याण ४२१ ३०१

# प्रकाशकाचे मनोगत

'स्वातंत्र्यवीर सावरकर व्यक्तिदर्शन' हे पुस्तक सावरकर जन्मशताब्दीनिमित्त डोंबिवली येथील के. वि. पेंढरकर महाविद्यालयात जे वाङ्मयीन चर्चासत्र योजण्यात आले होते त्यावर आधारीत आहे. या चर्चासत्रात सावरकरांचे जीवन, तत्त्वज्ञान आणि कार्य याचा व्यासंगी व अभ्यासू व्यक्तींनी उहापोह केला. मुंबई व पुणे विद्यापीठ क्षेत्रातील साठसत्तर तरुण विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात भाग घेतला, हे विशेष. या चर्चासत्रात आलेले विषय आणि अधिकारी व्यक्तींकडून त्यांची झालेली मांडणी यांचे महत्व लक्षात घेता हे विचारमंथन पुस्तकरुपाने प्रसिद्ध होऊन लोकांपर्यंत पोहोचावे असे आम्हाला वाटले. डोंबिवली शिक्षण प्रसारक मंडळाचे पदाधिकारी व के. वि. पेंढरकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी ही व्याख्याने पुस्तकरुपाने प्रसिद्ध करण्यासाठी अनुमती व आवश्यक ते सहकार्य दिले, याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

या चर्चासत्रातील व्याख्यात्यांनी त्यांचे विचार प्रसिद्ध करण्याची अनुमती दिली याबद्दल त्या सर्वांचे आणि हे पुस्तक परिपूर्ण व्हावे म्हणून 'समाजसुधारक सावरकर' हा लेख लिहून दिल्याबद्दल प्रा. डॉ. अशोक मोडक यांचे आम्ही आभारी आहोत. या पुस्तकासाठी 'सोबत' साप्ताहिकाचे संपादक श्री. ग. वा. बेहेरे यांनी अल्पावधीत विवेचक प्रस्तावना लिहून दिली. त्यांचे याबद्दल आभार मानतो. श्री. बेहेरे यांच्या प्रस्तावनेमुळे या पुस्तकाचे मोल वाढले आहे.

या पुस्तकाचे साक्षेपी संपादन या वाङ्मयीन चर्चासत्राचे संयोजक प्रा. श्याम अत्रे यांनी परिश्रमपूर्वक केले आहे. सर्व ध्वनिमुद्रित व्याख्यानांना निबंधरुप देण्याची व त्यांच्या संपादनाची अवघड जबाबदारी त्यांनी हौसेने पत्करली व समर्थपणे पार पाडली. याबद्दल प्रा. अत्रे व त्यांचे सहकारी अभिनंदनास पात्र आहेत.

'अक्षर मुद्रण' कल्याण, यांनी पुस्तकाची सुबक छपाई अल्पावधीत करुन दिली याबद्दल श्री. गोपाळ जोशी व त्यांचे सहकारी यांचे आभार मानतो.

सावरकर जन्मशताब्दी वर्षात प्रसिद्ध होत असलेल्या या पुस्तकाचे वाचक भरघोस स्वागत करतील असा विश्वास वाटतो.

— प्रकाशक

# पुरस्कार

डोंबिवली येथील के. वि. पेंढरकर महाविद्यालयात अगदी पहिल्या वर्षापासूनच विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विकसित करण्याच्या दृष्टीने विविध अभ्यासेतर उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. या उपक्रमांपैकी एक वैशिष्टच्यपूर्ण उपक्रम म्हणजे दरवर्षी घेण्यात येणारे दोन दिवसांचे वाङ्मयीन चर्चासत्र. या चर्चासत्रात आमच्या महाविद्यालयातील निवडक विद्यार्थ्यांबरोबर मुंबई महानगर परिसरातील अन्य महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना आमंत्रित करण्यात येते. आतापर्यंत पुढील विषयांवर चर्चासत्रे आयोजित करण्यात आली. १) वक्तृत्वकला (१९७९–८०) २) वाङ्मयनिर्मिती : प्रेरणा व प्रक्रिया (१९८०–८१) ३) कलेचा रसास्वाद (१९८१–८२) या प्रत्येक चर्चासत्रात त्या त्या विषयातील सातआठ तज्ज्ञ व्यक्तींची भाषणे, चर्चा व प्रश्नोत्तरे यांचा समावेश असतो. चर्चासत्रातील सर्व व्याख्याने ध्वनिमुद्रित करून घेण्यात येतात. १९८०–८१ या शैक्षणिक वर्षापासून आम्ही 'अक्षर वेल' हे वार्षिक प्रकाशित करतो. दरवर्षी त्या त्या वर्षात आयोजित केलेल्या चर्चासत्रातील व्याख्यानांचा विस्तृत गोषवारा या वार्षिकात प्रसिद्ध करण्यात येतो.

१९८३ हे स्वा. सावरकर जन्मशताब्दीचे वर्ष असल्याने या वर्षीच्या चर्चासत्राचा विषय होता : "स्वा. सावरकर व्यक्ति, वाङ्मय आणि तत्त्वविचार." या चर्चासत्रात सावरकरांचे अभ्यासक व तज्ज्ञ अशा नऊ वक्त्यांची भाषणे झाली. सर्वच व्याख्याने अभ्यासपूर्ण होती. चर्चासत्र आटोपल्यानंतर ही व्याख्याने पुस्तकरुपाने प्रसिद्ध करावीत ही कल्पना पुढे आली. आता या पुस्तकाच्या रुपाने ती कल्पना साकार होत आहे. स्वा. सावरकर जन्मशताब्दी निमित्ताने या वर्षात त्यांच्यासंबंधी अनेक पुस्तके प्रसिद्ध होणे स्वाभाविक आहे. हे पुस्तक अशाच स्वरुपाचे असून त्याद्वारे आम्ही स्वा. सावरकरांच्या स्मृतीस आदरांजली वाहात आहोत. सावरकरांचे विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचा हा आमचा एक अल्पसा प्रयत्न आहे. सावरकरांच्या विचारांचा चिकित्सक परामर्श पुस्तकरुपाने प्रसिद्ध करणारे असे हे कदाचित एकमेव महाविद्यालय असण्याची शक्यता आहे.

आमच्या महाविद्यालयाच्या या प्रकल्पास अनेकांचे साहाय्य लाभले आहे. त्यात डोंबिवली शिक्षण प्रसारक मंडळाचे सदस्य तसेच माझे सहकारी प्राध्यापक आणि आमच्या 'अक्षरवेल' वार्षिकाचे संपादक प्रा. श्याम अत्रे यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. या पुस्तकाच्या प्रकाशनाची जबाबदारी भारतीय विचार साधना, पुणे, यांनी उचलली याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो आमच्या महाविद्यालयातर्फे प्रसिद्ध होणारे हे पहिले पुस्तक असल्याने त्याचा मला, माझ्या सहकार्यांना आणि विद्यार्थ्यांना जरुर अभिमान आहे. वाचक वर्ग आमच्या या उपक्रमाचे स्वागत करील अशी आशा आहे.

— न. गो. काळे

प्राचार्य

# अनुक्रमणिका

प्रस्तावना

श्री. ग. वा. बेहेरे

**व्यक्ती आणि व्यक्तिविकास**

प्रा. डॉ. वि. रा. करंदीकर ९

प्रा. राम कापसे १९

श्री. वि. श्री. जोशी ३१

**तत्त्वज्ञान**

प्रा. डॉ. अशोक मोडक ३८

श्री. ज. द. जोगळेकर ४८

श्री. सुधीर फडके ५३

प्रा. भालबा केळकर ५९

श्री. दि. वि. गोखले ६८

**वाङ्मय**

प्रा. शंकर वैद्य ७८

प्रा. डॉ. व. दि. कुलकर्णी ८६

# भूमिका

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात भारतीय जनजीवनाला आणि संस्कृतीला हादरवून सोडणाऱ्या अनेक घटना घडल्या. इंग्रजी सत्तेची पाळेमुळे या देशात रुजली; पाश्चात्य संस्कृती, शिक्षण आणि तत्त्वज्ञान यांचा आक्रमक प्रभाव येथील समाजमानसावर जाणवू लागला; इंग्रजांबरोबर आलेले विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचे दूरगामी परीणाम येथील समाजरचना व आर्थिक जीवन यावर होऊ लागले. आत्मविस्मृत, पराभूत, प्रतिकारशून्य आणि सुस्त समाज या नव्या अनुभवामुळे भयचकित होऊन गेला. इंग्रजी शिक्षण घेतलेल्या उच्चविद्याविभूषित तरुणांत हळुहळु जागृती उत्पन्न झाली. भारतीय समाजजीवनाची तत्कालीन स्थिती आणि पाश्चात्य संस्कृतीचे वैभव यांची नकळत तुलना त्यांच्या मनात सुरू झाली. या समाजहितैषी मंडळींनी सामाजिक समस्यांचा विश्लेषणात्मक आणि विवेचक अभ्यास केला व आपापल्या प्रतिभेनुसार समाज सुधारणेसाठी प्रयत्न केले. कधी कठोर आत्मनिंदेने या समाजावर आसूड ओढून त्याद्वारे स्वत्व विसरलेल्या समाजाला जागे करण्याचा प्रयत्न केला, तर कधी आत्मगौरवाच्या भूमिकेतून या देशाचा पूर्वेतिहास जागविला व त्याद्वारे राख होऊ घातलेला सामाजिक चैतन्याचा स्फुल्लिंग चेतविण्याचे काम केले. या समाजचिंतनातून झालेल्या प्रबोधनामुळे सामाजिक सुधारणांचा मार्ग अधिक प्रशस्त झाला.

समाजचिंतनातून समाजप्रबोधन व सामाजिक सुधारणा यांना गती मिळाली. त्याचप्रमाणे हजार वर्षांच्या गुलामगिरीतून या देशाला मुक्त करण्याची प्रेरणा याच कालखंडात अखिल भारतभर कार्यरत झाली. पारतंत्र्याच्या कारणांची व परिणामांची मीमांसा करून स्वातंत्र्याची भावना समाजमानसात रुजविणे, स्वतःच्या राजकीय शक्तीचा विश्वास समाजात उत्पन्न करणे आणि संघटित होऊन ब्रिटिश सत्तेविरुद्ध संघर्षासाठी समाजाची सिद्धता करणे या दिशेने याच कालखंडात राजकीय चळवळ उभी राहू लागल्याचे दिसते. सामाजिक सुधारणा आणि राजकीय स्वातंत्र्य या दोन्ही आघाड्यांवर देशात सुरु झालेले प्रबोधनाचे हे प्रयत्न सावरकरांच्या संपूर्ण जीवनाला पार्श्वभूमीसारखे लाभले आहेत.

प्रत्येक देशातील समाजाची संस्कृती व चिती त्या समाजात जन्मलेल्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाला आकार देत असते. इतिहासाच्या

कालखंडातून समाजाने उभे केलेले वैभव व सोसलेली विपन्नावस्था, जय आणि पराजय, जागृती आणि आत्मविस्मृती या साऱ्यांचे कमी अधिक परीणाम व्यक्तीवर होत असतात. सावरकर याला अपवाद नाहीत. पण सावरकरांचे वेगळेपण असे की आपल्या प्रतिभासंपन्न आणि तेजस्वी व्यक्तिमत्वाने त्यांनी केवळ वर्तमानावरच नव्हे तर भविष्यकाळावर आपल्या कर्तृत्वाचा अमिट ठसा उमटवून ठेवला आहे. भविष्याला आकार देण्याचे त्यांचे सामर्थ्य केवढे मोठे आहे याची वेगळी साक्ष काढण्याची आवश्यकता निदान आज तरी नाही.

सावरकरांचा अभ्यास करतांना काळाचे हे सर्व संदर्भ लक्षात ठेवावे लागतात. त्यांच्या व्यक्तिमत्वाचे रसायन मोठे विलक्षण आणि अद्भुत आहे. सर्व धागेदोरे उलगडून त्यांच्या व्यक्तिमत्वाचे सूत आणि पोत तपासणे हे खरोखरच एक आव्हान आहे. सावरकरांचे व्यक्तिमत्व, जीवितकार्य आणि या सर्वांची अभिव्यक्ती करणारे त्यांचे तेजस्वी वाङ्मय या परस्परपूरक व अविभाज्य गोष्टी आहेत. सोयीसाठी त्यांचा वेगवेगळा विचार केला जात असला तरी त्यातील एकसंधतेची जाणीव सतत मनात ठेवावी लागते.

'आसिंधुसिंधु पर्यंता' ही भारताच्या अखंडत्वाची ठाम भूमिका असणारा आणि या देशाला पितृभूमी, पुण्यभूमी मानून त्याच्या वैभवासाठी आत्मार्पणालाही सिद्ध असणारा हा महापुरुष आहे. या देशाचा गौरव म्हणजे या देशाशी पुत्ररुप असणाऱ्या समाजाचा, त्या समाजाच्या संस्कृती आणि चितीचा गौरव याची सुस्पष्ट जाणीव सावरकरांना आहे. या समाजाला वैभवाच्या स्थितीपर्यंत न्यावयाचे असेल तर तो जागरूक, स्वाभिमानी, समतेच्या भक्कम पायावर आधारलेला व सुसंघटित झाला पाहिजे. तसा तो नाही याची त्यांना खंत आहे. म्हणूनच या समाजात उत्पन्न झालेल्या दोषांवर आणि विकृतींवर त्यांनी प्रखर हल्ले केले. असे करण्यात त्यांची भूमिका मूर्तिभंजकाची नव्हती. या समाजाची धारणा करण्याचे सामर्थ्य असणारा हिंदुधर्म विशुद्ध स्वरुपात पुन:प्रतिष्ठित झाला पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. ज्ञानविज्ञान निष्ठा, आधुनिकता आणि अद्ययावतता यांचा आधार असलेला नवसमाज निर्माण करणे हे सावरकरांचे स्वप्न होते. याच्या जोडीलाच हा समाज आत्मविश्वाससंपन्न व्हावयाचा असेल तर राजकीयदृष्टया तो स्वतंत्र, मुक्त झाला पाहिजे यावर त्यांचा भर होता. सारांश, सामाजिक सुधारणांचा त्यांचा आग्रह आणि राजकीय स्वातंत्र्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न या सावरकरांच्या अनेकमिती व्यक्तिमत्वाच्या दोन ठळक बाजू आहेत. काळ जसजसा पुढे जातो आहे तसतसे

भविष्याला मार्गदर्शन करण्याची क्षमता असणाऱ्या सावरकरांचा सर्वांगीण अभ्यास होणे अधिकाधिक आवश्यक होत आहे.

सावरकर जन्मशताब्दीनिमित्ताने तरुण विद्यार्थ्यांना सावरकरांचा डोळस अभ्यास करण्याची प्रेरणा व दिशा मिळावी या हेतूने एका वाङ्मयीन चर्चासत्राची योजना करण्यात आली. या चर्चासत्रात सावरकरांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण व परिपूर्ण विचार झाला असे म्हणता येणार नाही. दोन तीन दिवसांच्या अवधीत असा विचार होणे कठीण आहे. ही चर्चा तीन टप्प्यात घेण्यात आली १) सावरकरांचे व्यक्तिमत्व – घटक, आधार व प्रेरणा २) सावरकरांचे जीवितकार्य आणि तत्त्वज्ञान ३) सावरकरांचे वाङ्मय. याच क्रमाने या पुस्तकातील लेखांची मांडणी केली आहे. चर्चासत्रात हिंदुसंघटक सावरकर, हिंदुमहासभेद्वारा सिद्ध झालेले त्यांचे राजकारण व नाटककार सावरकर यांचा स्वतंत्रपणे विचार होऊ शकला नाही. तथापि या तिन्ही पैलूंच्या मूलाधाराचा विचार या चर्चासत्रात आलेला आहे, हे वाचकांच्या लक्षात येईलच.

या चर्चासत्राच्या आयोजनामागील विचारसूत्र लक्षात ठेवून सर्व तज्ञ वक्त्यांनी आपापल्या विषयाची अभ्यासपूर्वक मांडणी केली. या व्याख्यानांचे आणि सद्यस्थितीच्या संदर्भात सावरकरांच्या विचारांना जे नवे अन्वयार्थ प्राप्त होत आहेत त्यांचे महत्व लक्षात घेता हे विचारमंथन प्रसिद्ध होणे आवश्यक आहे असे वाटले. त्या जाणीवेतूनच हे पुस्तक सिद्ध झाले आहे. ध्वनिफितींच्या आधारे सर्व भाषणांची संपादित आवृत्ती तयार करण्यात आली. या संपादित लेखांबद्दल त्या त्या वक्त्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. न. गो. भाळे यांचे प्रोत्साहन या सर्व उपक्रमाला लाभले आहे. व्याख्यानांच्या ध्वनिमुद्रणापासून प्रत्यक्ष मुद्रणप्रत तयार होईपर्यंतच्या प्रक्रियेत माझे सहकारी प्रा. डॉ. रवींद्र बागूल, प्रा. हेमंत देवधर, प्रा. सौ. अनुराधा साळवेकर, प्रा. सौ. स्मिता कापसे, प्रा. रमेश कोकाटे व प्रा. कु. स्मिता फाटक यांचे सहकार्य मला मिळाले. डॉ. म. पु. केंदूरकर व डॉ. गो. पं. कुलकर्णी यांच्याशी झालेल्या चर्चेचा मला संपादनाच्या कामात खूप उपयोग झाला. या सर्व सुहृदांचे मी कृतज्ञतापूर्वक आभार मानतो. प्रकाशकांनी संपादनाची जबाबदारी माझ्यावर टाकून जो विश्वास दाखविला त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

– श्याम अत्रे

३०१२
निबंध २४०९४
७।१।८४

# प्रस्तावना

दि. २१, २२ व २३ जानेवारी १९८३ रोजी डोंबिवली येथील के. वि. पेंढरकर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात सावरकर या विषयावर एक चर्चासत्र आयोजित करण्यात आलें होते. या चर्चासत्राचे उद्‌घाटन करण्याचे मी मान्य केंले होते. पण मी हृदयविकारानें आजारी पडल्यामुळे या चर्चासत्राला हजर राहू शकलो नाही. या चर्चासत्रात झालेल्या व्याख्यानांचें एखादे पुस्तक तयार करण्याची कल्पना संयोजकांनी काढली आणि प्रस्तावना लेखनाचे काम त्यांनी माझ्याकडे सोपविले.

प्रा. वि. रा. करंदीकरांच्या लेंखाचा अपवाद वगळता अन्य सर्व लेखांची हस्तलिखिते मी वाचली आहेत. काही लेंख टिपणवजा आणि त्रोटक आहेत तर काही लेख त्या विषयाचा संपूर्ण आढावा घेणारे आहेंत. विशेषतः श्री. दि. वि. गोखलें यांचा लेंख सावरकरांचे संरक्षणविषयक तत्वज्ञान विशद करण्याच्या दृष्टीने अधिक माहितीपूर्ण आहे.

या चर्चासत्रात केवळ प्राध्यापकांनीच भाग घेतला असे नाही तर अनेक महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनीही भाग घेतला. ह्या गोष्टीचा मला अतिशय आनंद झाला. कारण सावरकरांचे तत्त्वज्ञान तरुण पिढीला समजणे अत्यावश्यक आहें.

अनेंक तऱ्हेच्या अपप्रचारामुळे, काही लोकांच्या हातून कळत – तर काहींच्या हातून न कळत सावरकरांची अप्रतिष्ठा झाली. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर स्वातंत्र्यविषयक चळवळीचा इतिहास लिहिताना क्रांतिकारक आणि सावरकर यांच्यावर अन्याय झालेंला आहे. सावरकर हें एकांतिक, हेकट, उद्धट आणि जातीयवादी राजकीय पुढारी आहेंत, अशा तऱ्हेचा प्रचार करण्यात केवळ सत्तारूढ पक्षच गुंतला होता असे नव्हे, तर सावरकर तत्त्वज्ञानातील कठोर सत्य समाजापासून लपविलें तरच आपला निभाव लागेल असे मानणारे आत्यंतिक पुरोगामीही या बदनामीच्या कटात सामील झाले होते.

कोणी असे म्हणतात की सावरकरांचा त्याग अलौकिक होता आणि त्यांच्या समर्पणापुढे आम्ही नम्र आहोत, पण ते या देशातील राजकीय प्रवाह ओळखू शकले नाहीत म्हणून ते इतिहासजमा झाले. तर कोणी असे म्हणतात की पस्तीस सालापर्यंतचे सावरकर आम्हाला मान्य आहेत, पण त्यांची हिंदुराष्ट्र विषयक कल्पना आणि त्यांचा शक्तीवरील विश्वास हा देश-विघातक असल्यामुळे आम्हाला त्यांचा स्वीकार करता येत नाही. काहींची अचाट कल्पनाशक्ती तर इतकी पुढे गेली की, सावरकरांच्या मुसलमान द्वेषामुळे पाकिस्तानची मागणी पुढे आली आणि देशाची फाळणी झाली असे ते प्रतिपादन करतात. सावरकरांच्या विज्ञाननिष्ठेची टवाळी करून ' हिंदुधर्माची मोडतोड करणारा हा हिंदुधर्म संरक्षक होईलच कसा ' असा सवाल काहीजण करू लागले.

हे जे सावरकरांचे आक्षेपक आहेंत त्यापैकी शुद्ध राष्ट्रीय दृष्टीनें विचार करणारे कोणी नाहीत. कोणी मानवतावादी आहेत, कोणी सर्वोदयवादी आहेत तर कोणी शुद्ध अहिंसावादी आहेत. राष्ट्र ही कल्पनाच ज्या व्यक्तींना मान्य नाही त्यांच्याशी चर्चा करण्यात अर्थ नाही. जेव्हा केव्हा मनुष्यजातीचा विकास होईल आणि मनुष्य राष्ट्राच्या सीमा ओलांडून वैश्विक संस्कृतीचा विचार करेल तेव्हा राष्ट्रवाद आपोआप मोडीत निघेल. पण अजून तरी या जगात राष्ट्रवादाचें अधिराज्य आहे. अमेरिका, रशिया, चीन, इंग्लंड, जपान यासारख्या सर्व राष्ट्रांना राष्ट्ररक्षणाच्या चिंतेशिवाय दुसरी चिंता नाही. राष्ट्रवाद तर राहोच साम्राज्यवादही अजून नष्ट झालेला नाही. अमेरिकेचे औद्योगिक साम्राज्य, रशियाचें कम्युनिस्ट साम्राज्य, इस्लामी राष्ट्रांचें पॅन इस्लाम यासारखे साम्राज्यवाद जगावर संकट ओढवीत आहेत. त्यामुळे हिंदुस्थानला राष्ट्रवादाचा स्वीकार करण्यावाचून पर्याय नाही. हिंदुस्थान हे एकेकाळी असलेच तर अध्यात्मिक राष्ट्र होते. राजकीय राष्ट्राची संकलपनाच मुळी गेल्या शतकातील आहे आणि हिंदुस्थानात तर ती अजून सिद्ध होत आहे. भिन्न भाषा, भिन्न धर्म, भिन्न जाती, भिन्न आचार पद्धती यामुळे एकसंध समाज निर्माण करण्याचे कार्य केल्यावाचून स्वातंत्र्य मिळविणे आणि आलेले स्वातंत्र्य टिकविणे या दोन्ही गोष्टी शक्य नाहीत, असे सावरकरांना वाटले. एखादा मनुष्यसमुह एखाद्या राष्ट्रात गुंफायचा असेल तर त्याला काहीतरी एखादा चिवट धागा लागतो आणि सुदैवाने

आपल्या देशात हिंदुत्वाच्या रूपाने तो धागा अस्तित्वात होता. सावरकरांनी तो धागा घट्ट पकडून हिंदुराष्ट्रवादाची आखणी केली आणि हिंदुसमाजाच्या पुर्नानिमितीचे एक नवे स्वप्न या समाजाला दिले.

ज्यांनी काही वेगळ्या स्वप्नांचा विचार केला होता त्यांना हे हिंदुराष्ट्राचें स्वप्न गैरसोयीचे होते. म्हणून त्यांनी सावरकरांच्या तत्त्वज्ञानावर हल्ला करण्याऐवजी सावरकर या व्यक्तिमत्त्वावर हल्ला करण्यास आरंभ केला. पण सावरकरांनी आपली विचारसरणी घासूनपुसून इतकी लखलखीत केली होती की या देशातील अनेक बुद्धिमान लोकांनी तिचा पराभव करण्याचा प्रयत्न करुनही ती अजिंक्य राहिली. त्यांची एकेक भाकिते खरी ठरलेली आपण पाहत आहोत. आज भारतीय सैन्य सुसज्ज झाले आहे ते गांधी–तत्त्वज्ञानामुळे नव्हे किंवा नेहरुंच्या पंचशील तत्त्वज्ञानामुळे नव्हें तर सावरकरांच्या बलिष्ठ राष्ट्रसंकल्पनेंमुळेच. मुसलमानांचा अनुनय करुन गांधीजी त्यांचे हृदयपरिवर्तन करु शकले नाहीत किंवा मुसलमानांना आंजारून गोंजारून वा त्यांच्या संस्कृतीचा गौरव करुनही मुसलमान भारतीय राष्ट्रीय प्रवाहात एकरुप होऊ शकले नाहीत. सावरकरांचे त्याबाबतचें अचूक मार्गदर्शन शब्दश: खरे ठरलेले आहें. आज आसामचा प्रश्न गंभीर झाल्यासारखा वाटतो, पण त्याचे गांभीर्य सावरकरांनी तीसपस्तीस वर्षापूर्वीच आक्रंदून सांगितले आहें. अणुबाँब बनविणार नाही असे म्हणत म्हणत भारताने अणुबाँबचा स्फोट केला. अंतराळयानही निर्माण केले. विज्ञानात अद्ययावत राहिलें पाहिजे हे त्यांचे आक्रंदन त्यावेळी चेष्टेचा विषय झाले. पण आज वस्तुस्थिती काय आहे ? गांधीजींची ग्रामराज्ये निर्माण होण्याऐवजी योजनाशून्य औद्योगीकरण आपण करीत निघालो आहोत. खोटया स्वप्नांच्या मागे लागून या देशाचे नुकसान झाले. जे होणार होणार असे सावरकर सतत सांगत होते त्या सर्व गोष्टी प्रत्यक्षात आलेल्या आपण पाहत आहोत.

सावरकरांविषयी चर्चा करतांना सोयीसाठी म्हणून सावरकर तत्त्व–ज्ञानाची विभागणी या चर्चासत्रात केलेली दिसते. पण सावरकर तत्त्वज्ञान म्हणजे अनेक विचारांची पोतडी नाही. सावरकरांचा कोणताही विचार त्यांच्या तत्त्वज्ञानापासून वेगळा काढताच येत नाही. आत्मनिर्भर, विज्ञाननिष्ठ, नवहिंदुराष्ट्राची रचना या त्यांच्या एकमेव संकल्पनेच्या सिद्धीसाठीच त्यांचा प्रत्येक विचार मांडला गेला. सावरकरांचे अपूर्व व्यक्तिमत्व, युक्तिवाद आणि

घणाघाती प्रतिपादन हे सारे त्यांनी या एकाच गोष्टीसाठी राबविलें. केवळ साहित्यानंदासाठी लिहिलेल्या एखाददुसऱ्या कवितेचा वा निबंधाचा अपवाद वगळता त्यांचें सर्व साहित्य, वक्तृत्व, सभासंमेलने हें सर्व त्यांच्यालेखी साधनरूपच होते.

भाषाशुद्धीसारखा विषय केवळ भाषेचा प्रश्न नसतो. भाषेवर झालेंले परकीय आक्रमण, राजकीय आक्रमणाबरोबरच हालवावे लागते कारण त्या सर्व गुलामगिरीच्या खुणा आहेंत. ग्रंथप्रामाण्य किंवा शब्दप्रामाण्य हें केवळ विज्ञानविरोधी म्हणून त्याला विरोध नाही तर एकदा शब्दात किंवा ग्रंथ–प्रमाणात तुम्ही अडकलात की, समाज विकसनाची गती रोखली जाते आणि नवीन विचारांचे रस्तेच बंद होतात. शुद्धिकरणाचा प्रयोग कशासाठी तर केवळ आपल्या धर्मीयांची संख्या वाढविण्यासाठी नव्हे आणि मुसलमान किंवा ख्रिश्चनांना खिजविण्यासाठी तर नव्हेच नव्हे, जबरदस्तीनें किंवा आमीषाने केल्या जाणाऱ्या धर्मांतरामुळे राष्ट्रीय प्रवाहात अडथळा येतो. मुसलमान व ख्रिश्चन धर्माच्या प्रेरणा ह्या इथल्या संस्कृतीशी वैर करणाऱ्या आहेत म्हणून त्यांना विरोध. सैनिकीकरण कशासाठी तर या देशाचे मानसिक व शारीरिक बल वाढविण्यासाठी. सहजगत्या कोणत्याही संस्कृतीपुढे हा समाज वाकला जाणार नाही, असा आत्मविश्वास निर्माण होण्यासाठी राष्ट्रानें बलसंपन्न व्हावयास हवे. या समाजातील जातीभेद व उच्चनीचभाव नष्ट करण्यामागची त्यांची प्रेरणा करुणेची किंवा मानवतेची नाही. समाज एकसंध व्हावयास हवा असेल तर अशा तऱ्हेची विषमता टाळणे आवश्यक आहे. नाहीतर या समाजाचे अस्तित्वच धोक्यात येईल. म्हणून सावरकरांच्या लेखी तो अस्तित्वाचा लढा आहे. आपली समाजसुधारणेविषयी मते सांगताना ते अतिशय कडवे होतात याचें कारण त्यांच्या दृष्टीने ती लढाईच आहें. परकीयांच्या आक्रमणापेक्षाही उच्चनीचतेमुळे निर्माण झालेली परस्परांमधील दरी त्यांना अधिक धोक्याची वाटते.

म्हणूनसावरकर समजावून घ्यायचे असतील किंवा स्वीकारायचे असतील तर आपल्या सोयीनुसार त्यांचा अन्वयार्थ लावून चालत नाही. क्रांतिकारक सावरकर, स्वातंत्र्यसैनिक सावरकर, समाजसुधारक सावरकर, हिंदुसंघटक सावरकर, साहित्यिक सावरकर असे सावरकरांचे वेगवेगळे कप्पे नसतातच. **पुरुषार्थी अशा हिंदु समाजाची पुनर्रचना करणारा स्मृतिकार अशी**

**सावरकरांची एकसंध भूमिका आहे**. ह्या एकसंध भूमिकेच्या समर्थनार्थ त्यांनी कविता–निबंध–व्याख्यानें वा युक्तिवाद कसा राबविला यावर आपण फारतर विचार करु शकू. परंतु केवळ साहित्यिक सावरकर अशा तऱ्हेंचे सावरकर मुळात अस्तित्वातच नाहीत. स्थानबद्ध करुन त्यांना सरकारने गंजत ठेवले नसते तरी देखील सावरकर समाजसुधारक झालेच असते. फक्त त्यांची भाषा कदाचित थोडी बदलली असती. जसजसा काळ लोटत जाईल, तसतसे सावरकरांचे हे एकसंधत्व आपल्या अधिकाधिक लक्षात येईल आणि जितके आपल्याला ते एकसंधत्व समजावून घेता येईल तितके सावरकर समजून घेणे सोपे जाईल.

सावरकर प्रत्यक्ष आपल्या आयुष्यकाळात यशस्वी झालें किंवा नाही असा प्रश्न आपल्याला विचारता येईल. अर्थात, यश म्हणजे काय याची व्याख्या करण्यावर त्याचे उत्तर अवलंबून राहील. लौकिक यश म्हणजे मानसन्मान, धनसंपत्ती किंवा अनुयायी वर्ग असा जर केला, तर तें यशस्वी झाले नाहीत असे म्हणावे लागेल. पण जर एखाद्या माणसाच्या कर्तृत्वाचे यश त्याने मांडलेल्या संकल्पनांच्या सिद्धीत असेल तर ते यशस्वी झालें आहेत, होत आहेत, हे मनोमन आपल्याला मान्य करावे लागेल. हिंदुसमाजाच्या पुनरुत्थानाचा विचार करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. हिंदु-राष्ट्रवादाचा विचार करणारा राजकीय पक्ष तसेच विद्यार्थी, कामगार, आदिवासी इत्यादि क्षेत्रात वा संघटनात जर हिंदुराष्ट्रवाद हा आधारभूत पाया असेल तर सावरकर विचारांचा वृक्ष हळुहळू फोफावतो आहे. असे म्हणावयास हरकत नाही.

सावरकरांच्या अपयशाची मीमांसाच करायची असेल तर एका गोष्टीचा विचार नेंहमी मनात येतो. तें म्हणजे सर्वसामान्य माणसाच्या आकलनापलिकडचे विचार तें मांडत होतें. समाजाची मानसिक शक्ती लक्षात न घेता समाजावर निरनिराळ्या संकल्पना लादत होतें. हिंदु-समाजाची मुळातच आक्रमक वृत्ती नाही. तो खऱ्या अर्थाने अध्यात्ममार्गीही नाही व इहवादीही नाही. सावरकरांनी काळाच्या फार पुढे जाण्याचा प्रयत्न केला व आपल्या मागे कोण येते याचीही पर्वा केली नाही. आज काळच पुढे सरकला आहें आणि गरजेपोटी समाजाला सावरकर विचारांचा आश्रय

करण्यावाचून गत्यंतर उरलेलें नाही. एकाच माणसाच्या ठायी अनेक प्रकारचे अलौकिक कर्तृत्व विधात्यानें निर्माण करून जनसामान्यांना गोंधळात टाकले आहे. पण आता तो गोंधळ संपला आहे. प्रयत्नवादाशिवाय पुनरुत्थान अशक्य आहे, हे समाजाला कळल्यानंतर एका नव्या समष्टीजीवनाचा शोध आपल्याला लागला आहे. काही काळापूर्वी सावरकर हे स्वप्नातील काव्य वाटत होते. पण आज ते वास्तवातले रुद्र सत्य बनू पहात आहेत. आणि अशा वेळी सावरकरांचा सर्वांगीण अभ्यास करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहें. पण तिथेही सावरकरांच्या शब्दात सांगायचें तर आपण सावधानता बाळगली पाहिजे. ती म्हणजे सावरकरांचा शब्द म्हणजे अखेरचा शब्द नव्हे. सावरकरांचे ग्रंथ म्हणजे प्रमाण ग्रंथ नव्हे. काळाच्या गरजेनुसार व राष्ट्राच्या सोयीनुसार जे उपयुक्त असेल तेवढेच सावरकर आपल्या चिंतनाचा विषय राहावेत.

**– ग. वा. बेहेरे**

# सतीचे वाण आणि वास्तवाचे भान

**डॉ. वि. रा. करंदीकर**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा जन्म झाला त्याला या वर्षी शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. एकोणिसाव्या शतकाची पहिली सतरा वर्षे उलटली त्याच्या पुढच्या वर्षी म्हणजे सन १८१८ मध्ये हा देश परतंत्र झाला आणि ते शतक संपण्यास सतरा वर्षे उरली होती तेव्हा म्हणजे १८८३ मध्ये सावरकरांचा जन्म झाला. या मधल्या अवधीत या देशात आणि विशेषतः महाराष्ट्रात जे काही घडले त्यावर एक दृष्टिक्षेप टाकला, तर सावरकरांनी केलेल्या कार्याची पृष्ठभूमी स्पष्ट होईल आणि त्यांचे निराळेपणही ध्यानात येईल.

१८१८ नंतरची पहिली पंचवीसतीस वर्षे केवळ स्तिमिततेची आणि जडमूढ अवस्थेची गेली. १८४८ पासून थोडीथोडी जाग येऊ लागली. तिचे लोण सर्वसामान्य समाजापर्यंत पोहोचण्यास अर्थातच बराच अवधी जावा लागला. राजकीय विचारांची जी नवी जाग आली तिचे प्रमुख असे दोन प्रवाह दिसून येतात. एक विचारप्रवाह असा होता की ज्या इंग्रजांनी आपल्याला जिंकले आहे त्यांचे ज्ञान आपल्याहून फार सरस आहे, त्यांच्या राजकीय जोखडाखालून आपल्याला मुक्त व्हावयाचे असेल तर त्यांच्या आणि आपल्या प्रगतीत असलेले अंतर आपण भरून काढले पाहिजे. सर्वांगीण सुधारणेच्या दिशेने जाणाऱ्या या पंथाला नेमस्त किंवा उदारमतवादी हे नाव दिले गेले. दुसऱ्या पंथाचे मत थोडे वेगळे होते. इंग्रजांमुळे या देशात अनेक आधुनिक गोष्टी आल्या हे खरे असले, तरी या साऱ्या सुधारणा त्यांनी या देशावर आपल्याला सुखाने राज्य करता यावे यासाठी केल्या आहेत. आपल्याला स्वतंत्र व्हावयाचे असेल, तर परकी इंग्रज सरकारबरोबर संघर्ष अटळ आहे कारण नाक दाबल्याशिवाय तोंड उघडत नाही, असे या पक्षाचे म्हणणे होते. या पक्षाने उभ्या केलेल्या चळवळीला जहाल राजकारण हे नाव मिळाले.

## तिसरा पंथ

तिसराही एक पंथ होता आणि तो क्रान्तिकारकांचा म्हणून ओळखला जातो. क्रान्तिकारक या शब्दाला त्या काळात एक वेगळा अर्थ होता. आज सामान्यपणे ज्या क्रान्तीची भाषा केली जाते ती सामाजिक क्षेत्रातील असते. राजकीय क्रान्तीपेक्षा सामाजिक क्रान्ती अधिक महत्त्वाची आहे असे म्हटले जाते आणि ते खरेही आहे. पण देश परक्यांचा गुलाम झाला की राजकीय क्रान्तीला सर्वाधिक महत्त्व प्राप्त होते. इतर सर्व गोष्टी बाजूला ठेवून प्रथम गेलेले स्वातंत्र्य परत मिळवावे लागते. दुसऱ्या देशाबरोबर आपले युद्ध चालू असताना ते जिंकण्यावर सारे लक्ष व साऱ्या शक्ती केन्द्रित कराव्या लागतात. राजकीय पारतंत्र्याचा काळ हा एका दृष्टीने सतत चालू राहणारा असा युद्धाचा काळ असतो. त्या काळात परकी सरकारविरुद्ध आपला संग्राम चालू आहे अशी भूमिका घ्यावी लागते, तशी घेतली तरच त्या सरकारविरुद्ध झुंज देण्यासाठी जनमानस तयार करता येते, असे मानणारा पक्ष तो क्रान्तिकारकांचा पक्ष.

इंग्रजांनी आम्हाला गुलाम केले आहे आणि या गुलामीतून मुक्त होण्यासाठी त्यांच्याशी संघर्ष करणे आवश्यक आहे, एवढे म्हणण्यापुरते या क्रान्तिकारकांचे जहाल राजकारणाशी साधर्म्य होते. पण क्रान्तिकारक या जहाल राजकारणाच्या दिशेने आणखी कितीतरी पुढे जाऊ पाहत होते. मिळेल तेथून हत्यार हाती घेऊन आणि मिळतील तेवढी चारदोन माणसे गोळा करून तेवढ्या तुटपुंज्या बळावर परकी सरकारचे प्रतिनिधी असलेल्या अधिकारी व्यक्तीवर आघात करणारा तो क्रान्तिकारकांचा पक्ष. या मार्गाने गेल्याने परिणाम काय होणार आहे ते या क्रान्तिकारकांना स्पष्टपणे माहीत असे. एक तर त्या प्रयत्नातच मरण पत्करावे लागेल किंवा सरकारच्या हाती पडल्यास जन्मभर बंदीवासात पडावे लागेल. कदाचित फाशीची शिक्षाही होईल, ती झाल्यास हसतमुखाने फाशीच्या पायऱ्या चढून जाण्याची सिद्धता ठेवावी लागेल. अशी तयारी ठेवणारे ते क्रान्तिकारक. त्यांना यशाची आशा नसे आणि अपयशाची फिकीर नसे. यशाची आशा नसे याचे कारण आपल्या तुलनेने राज्यकर्त्यांची ताकद केवढी मोठी आहे हे त्यांना पुरते माहीत असे. अपयशाची फिकीर नसे, कारण एका उदात्त ध्येयासाठी आपण

हा त्याग करीत आहोत आणि तसा तो करण्यातच आपल्या जीवनाची धन्यता साठवलेली आहे अशी त्यांच्या मनाची धारणा असे.

## हौतात्म्याची पूजा

इंग्रजीमध्ये मार्टीर असा एक शब्द आहे. हुतात्मा असा त्याचा मराठीतील प्रतिशब्द सावरकरांनी योजलेला आहे. तो त्यांच्याकडून सुचवला जावा हे अर्थपूर्ण आहे. हुतात्मा कोण ? अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपल्या ध्येयासाठी झगडत असतांना जो प्राणांचे बलिदान करतो तो हुतात्मा. जो लढाई जिंकतो तो भाग्यवान हे खरे, पण तो हुतात्मा नव्हे. आपल्याला अपयश मिळण्याचा संभव आहे हे ध्यानात घेऊन जो सावधगिरीने पावले टाकतो त्यालाही हुतात्मा ही पदवी लाभत नाही. यशाची, कीर्तीची वा मानाची अशी कोणतीही अपेक्षा न ठेवता ध्येयासाठी हसतमुखाने बलिदान करणारा तो हुतात्मा. अपयश हेच तो आपले अटळ भागधेय मानीत असतो आणि बलिदानातच आपल्या ध्येयवादी जीवनाचे स्वयंपूर्ण साफल्य पाहत असतो. क्रांतिकारक हे अशा हौतात्म्याचे पूजक होते. मंदिर उभे करावयाचे असेल तर त्याच्या पायामध्ये काही दगड घालावेच लागतात. त्याशिवाय मंदिर उभारले जाऊच शकत नाही. असे दगड पायामध्ये गाडले गेले आहेत आणि त्यांच्या आधारावर ते मंदिर उभे आहे, हे कोणाला कळतही नाही. असे गाडले गेलेले पायातील दगड आपल्याला व्हावयाचे आहे, असे क्रान्तिकारक मानीत असत. अशा हौतात्म्यशील क्रान्तिकारकांचे सावरकर हे अग्रणी होते. म्हणूनच ते म्हणू शकले की, "जे दिव्य दाहक म्हणून असावयाचे । बुध्याच वाण धरिले करि हे सतीचे ॥"

देशासाठी माणसे आपापल्या परीने जो त्याग करतात त्याच्याही काही पातळ्या असतात. आपला प्रपंच आणि नोकरी वा व्यवसाय सांभाळून देशासाठी जेवढे काही करता येईल तेवढे करीत राहणे ही अशा त्यागाची अगदी प्राथमिक अशी पातळी म्हणता येईल. सामान्य माणसाच्या दृष्टीने एवढी पातळी गाठता आली तरी आपण जीवनामध्ये पुष्कळच काही साधले असे त्याला वाटणे स्वाभाविक आहे. व्यक्तिगत प्रपंच न करता सारा जन्म देशाच्या सेवेमध्ये व्यतीत करणे ही अधिक वरची पायरी होय. या कोटीत बसणारी माणसेही फार मोठ्या संख्येने आढळत नाहीत. याच्या वरची पायरी

ती हौतात्म्याची. त्या पायरीवर उभा असलेला क्रान्तिकारक अन्य कोणत्याच व्यावहारिक लाभालाभाचा विचार मनात आणीत नाही. समाजात चैतन्य उत्पन्न करावयाचे असेल तर असे हौतात्म्य कोणीतरी पत्करावे लागते, ते उदाहरण मी घालून देईन, एवढाच विचार तो करीत असतो. पारतंत्र्याचा निमूटपणाने स्वीकार करणाऱ्यांचा देश दुबळ्यांचा मानला जातो. भेकडांचा मानला जातो. माझा देश तसा नाही, तर तो वीरांचा देश आहे, शूरांचा देश आहे, असे मी आपल्या कृतीने दाखवून देईन, असे क्रान्तिकारक मानीत असतो.

## क्रान्तिकारकांचे ऋण

असे क्रान्तिकारक हे एका वेगळ्याच धुंदीत वावरत असतात. अशा धुंदीचा एक शतांशही आज आपल्या वाट्याला येत नाही, त्यामुळे तिची नीटशी कल्पनाही आपण करू शकत नाही. तशा धुंदीची आज गरज नाही हेही खरे आहे. पण पारतंत्र्याच्या त्या अंधाऱ्या कालखंडात त्या धुंदीत वावरणाऱ्या तरुणांची गरज खचितच होती. ती गरज सावरकर आणि त्यांच्यासारखे इतर क्रान्तिकारक तरुण यांनी भरून काढली होती हे त्यांचे ऋण आपण कधी विसरता कामा नये. त्या तरुणांची ती धुंदी मरणाला तुच्छ मानणारी होती, कसल्याही भीषण प्रसंगात निर्भयपणाने आणि ताठ मानेने उभी राहणारी होती. याची कितीएक रोमांचकारक उदाहरणे त्या वेळच्या इतिहासात आढळून येतात. चारसहा महिने कोणी तुरुंगात जाऊन आले, तर त्याने केवढा पराक्रम केला आणि किती वनवास सोसला असे आज आपल्या मनात येते. सावरकरांना पन्नास वर्षे काळ्या पाण्यावर जाण्याची शिक्षा झाली. एवढ्या प्रदीर्घ कारावासाच्या शिक्षेचे उदाहरण जगाच्या इतिहासात शोधूनही सापडेल की नाही याची शंका आहे. अशी भीषण शिक्षा कानी पडल्यावर सावरकरांची उत्स्फूर्त अशी प्रतिक्रिया कोणती झाली ? यत्किंचितही विचलित न होता त्यांनी प्रश्न केला आहे, "पन्नास वर्षांची शिक्षा मला देत आहात, पण एवढा काळ इंग्रजांचं राज्य या देशावर टिकून राहाणार आहे असं वाटतं का ?"

अशा वृत्तीचे सावरकर हे एकटे नव्हते. हौतात्म्याची वाट चालत असताना उदात्ततेच्या वेगवेगळ्या परी दाखवणारे तरुण त्या काळात झाले

आहेत. त्यांच्या शौर्याची गाथा कोणाच्याही मनात आदराची भावना निर्माण करू शकेल. मृत्यूची सजा फर्मावल्याचे शब्द न्यायाधीशाच्या तोंडून निघालेले कानावर पडताच बंगालमधील एका प्रसिद्ध क्रान्तिकारकाने उद्‌गार काढले, "ठीक आहे. आतापर्यंत हे जग पाहिलं, आता मृत्यूनंतरचं जग कसं आहे ते पाहू." फाशी जाण्याची शिक्षा दिली गेल्यापासून प्रत्यक्ष फासावर जाण्याच्या दिवसापर्यंतच्या मधल्या महिना-सव्वा महिन्याच्या अवधीत कन्हैय्यालाल दत्त या अठरा-वीस वर्षांच्या तरुणाचे वजन काही पौंडांनी वाढलेले आढळून आले. अशा तरुणाचा देह मृत्यूनंतर अग्नीला समर्पण झाल्यावर त्याच्या चितेतील चिमूटभर राख मिळवून ती डबी लोकांनी आपल्या घरी देव्हाऱ्यात ठेवली असेल तर त्यात काही नवल नाही. अशा प्रकारच्या सहजासहजी विश्वास बसणार नाही अशा कितीतरी घटना क्रान्तिकारकांच्या या तेजस्वी पर्वात घडून आल्या आहेत.

जो ध्येयाची साधना करीत असताना मृत्यूला सरळसरळ सामोरा जातो त्याच्या आत्मसमर्पणाला स्वाभाविकपणे उदात्ततेचा स्पर्श होत असतो. ही प्रत्यक्ष कृतीतील उदात्तता असते, कधीकधी हिचा लाभ एखाद्याला अबोधपणेही होऊन जातो. वैचारिक पातळीवरील उदात्तता वेगळी असते, ती कोणाला अशी नकळत लाभत नाही. तिचा स्वीकार जाणिवेच्या पातळीवरून बोधपूर्वक व्हावा लागतो. शिवाय अशा वैचारिक उदात्ततेचे नाते साधुत्वाशी किंवा करुणेसारख्या भावनेशी जसे जुळते, तसे ते पौरुषाशी किंवा आघातशील पराक्रमाशी जुळत नाही असेही वाटून जाते. पण सावरकर यालाही अपवाद ठरले आहेत. "बोला, असे कवण भक्ष्य हुताशनाला।" असे आवाहन भगवान श्रीरामचन्द्राने केल्याचे वर्णन त्यांनी केले आहे आणि आपले कुल त्यासाठी सज्ज आहे असे म्हटले आहे. प्रदीप्त अग्निकुंडात जीवनाची आहुती देण्याचे हे 'निमंत्रण' आहे. कशासाठी ही आहुती द्यावयाची आहे ? सावरकरांनी शब्द योजले आहेत, "विश्वाचिया अखिल मंगल–धारणाला।" यातील मानसिक धारणेची व्यापक उदात्तता उलगडून दाखवण्याची आवश्यकता नाही. अर्थात सावरकरांच्या मनाची ही नित्याची बैठक नव्हे. त्यांची दृष्टी वास्तवावर आणि व्यावहारिक शक्यतेवर अधिक खिळलेली असे. त्या प्रकाशात त्यांचे सारे विचार चालत, निर्णय होत. पण तरीही कल्पनेच्या पंखावर आरूढ होऊन अपवादात्मक स्थळी ते विश्वा–

त्मकतेच्या व्यापक पातळीपर्यंत भरारी घेऊ शकत असत हेही ध्यानात घेण्यासारखे आहे.

## वैचारिक बैठक

क्रांतिकारकांच्या बलिदानाला विचारांचे विशेष अधिष्ठान नव्हते, तर त्यामध्ये केवळ तारुण्यसुलभ भावनोत्कटताच होती, हा समज सावरकरांच्या अशा वचनांमुळे काहीसा दूर होऊ शकेल. सावरकरांचे मोठेपण असे की, त्यांनी क्रांतिकारकांच्या या हौतात्म्यशील राजकारणाला एक तात्त्विक अधिष्ठान प्राप्त करून दिले. महाराष्ट्रात सावरकरांपूर्वी वासुदेव बळवंत किंवा चाफेकर बंधू असे देशभक्त हौतात्म्याच्या मार्गाने गेले. सावरकरांना समकालीन असलेले बंगालमधील अनुशीलन समितीचे सदस्य त्याच ऊर्मीने झपाटलेले होते. पंजाबमधील आणि विदेशातील शीख तरुणांनी प्राधान्याने उभे केलेले पहिल्या महायुद्धाच्या काळातील गदर आंदोलन त्याच भावनेने प्रेरित झालेले होते. ही परंपरा पुढे सरदार भगतसिंह आदी हुतात्म्यांपर्यंत आणि सुभाषचंद्र बोसांच्या आझाद हिंद सेनेपर्यंत आणून पोहोचविता येते. पण आपल्या अशा प्रकारच्या कृतीमागे विचारांची कोणती बैठक उभी करता येईल याचा शोध घेण्याकडे यापैकी कोणी वळलेला आढळत नाही. सावरकरांनी तो शोध घेतला आहे.

नेमस्तांचा उदारमतवादी विचार अनेकांकडून स्पष्ट केला गेला आहे. सनदशीर मार्गाने चालविल्या गेलेल्या संघर्षवादी जहाल राजकारणाची वैचारिक बैठकही अनेक प्रसंगी विशद केली गेली आहे. सावरकरांचे कार्य हे की, एकाकीपणे परकी सत्तेशी झुंज देण्यास उभे ठाकणाऱ्या क्रांतिकारकांच्या कृतीमागे कोणता विचार असू शकतो ते त्यांनी दाखवून दिले. इटलीचा स्वातंत्र्यवीर जोसेफ मॅझिनी याच्या विचारांचे त्यांनी घडविलेले दर्शन आणि त्या चरित्रग्रंथाला त्यांनी लिहिलेली विख्यात प्रस्तावना हे त्याचे सर्वात ठळक उदाहरण होय. येथेच सहज म्हणून हा उल्लेख करावयास हवा की, सावरकरांनी मॅझिनीचा सामग्र्याने स्वीकार केला आहे असे म्हणता येणार नाही. स्वदेशावरील उत्कट प्रेम, पारतंत्र्याविषयी विलक्षण चीड आणि परकी राज्यकर्त्यांच्या प्रतिकारार्थ प्रसंगी शस्त्राचाराचा अवलंब, अशा बाबीतील मॅझिनीचा विचार सावरकरांना यथार्थपणे भावला आहे. त्याचा

इतर सारा विचार त्यांच्या मनापर्यंत तितक्याच प्रमाणात पोहोचला आहे असे आढळून येत नाही. अखेर मॅझिनी आणि सावरकर या दोघांच्या व्यक्तिमत्त्वातही काही फरक आहे, पण तो वेगळा विषय होईल.

हौतात्म्यशील राजकारणाचे असे दाहक व्रत घेण्याची प्रेरणा सावरकरांना कोठून मिळाली? छत्रपती शिवाजी महाराज, १८५७ च्या स्वातंत्र्यसमरातील योद्धे, वासुदेव बळवंत, चाफेकर बंधू अशी त्यांची काही स्फूर्तीस्थाने होती. पण मूळप्रेरणा मात्र जन्मसिद्ध होती. "मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी मी शत्रूशी मारिता मारिता मरेतो झुंजेन" अशी प्रतिज्ञा त्यांनी वयाच्या केवळ चौदाव्या वर्षी घेतली. तिला नंतर खतपाणी मिळाले ते इतिहासाच्या अभ्यासाने आणि वर उल्लेख केलेल्या वीर पुरुषांच्या उदाहरणाने.

## नित्य रणांगणात उभा असलेला नेता

सावरकरांनी आपल्या आयुष्यातील ऐन उमेदीची बारातेरा वर्षे अंदमानच्या कारागृहात काढली. त्यानंतरची त्यांची तेराचौदा वर्षे रत्नागिरीच्या स्थानबद्धतेत गेली. वयाच्या सत्ताविसाव्या वर्षी अंदमानच्या कारागृहाच्या त्या भव्य लोखंडी दरवाजातून हातापायांतील लोखंडी बेड्या खळखळावीत आत शिरताना, आपण मृत्यूच्या जबड्यात प्रवेश करीत आहोत आणि आपले प्रेतच येथून बाहेर पडणार अशी भावना त्यांच्या मनात होती. पण संकटाच्या अशा उग्र भीषण दर्शनानेही त्यांचे मन कधी भयकंपित झाले नाही किंवा अंतःकरणातील देशसेवेची इच्छा थोडीही उणावली नाही. त्या कारावासातही आपण आपल्या देशासाठी काय करू शकू हाच विचार त्यांचे मन नित्य करीत राहिले, जो संकल्प त्या अवस्थेत स्वतःशी केला त्याचा पाठपुरावा करीत राहिले; कमला काव्य त्यातून जन्माला आले. कारागृहाच्या त्या सर्वथा विपरीत वातावरणातही आपल्या मनाची रसिकता, सौन्दर्यवृत्ती आणि निर्मितीक्षमता त्यांनी सतेज ठेवली. ही सारी साधना किती कठीण आहे आणि किती विरळा आढळणारी आहे हे ध्यानात घेतले, तरच सावरकरांच्या दुर्दम्य व्यक्तिमत्त्वाचा गाभा हाती लागेल.

कोणत्याही परिस्थितीत असताना, आपण परकी सत्ताधीशांविरूद्ध रणांगणात उभे असलेले नेते आहोत, सेनानी आहोत, असा सावरकरांचा

रास्त आवेश असे. तो त्यांना शोभूनही दिसे, तो शोभून दिसावा असेच त्यांचे सर्व प्रसंगांतील वागणे असे. अशा उत्तुंग व्यक्तिमत्त्वालाही कोणत्या ना कोणत्या रूपाने मर्यादांचा स्पर्श होत असतो, मानवाची ती प्रकृतीच आहे. सावरकरांचे "दिव्य दाहक" व्यक्तिमत्त्वही याला अपवाद ठरलेले नाही. दुर्दम्य आत्मविश्वास आणि त्यापोटी उमटणारा अहंकार या दोहोतील सीमारेषा फार सूक्ष्म असते, ती सांभाळणे त्यांना फार कठीण गेले आहे. दूर अंतरावरून पाहणाऱ्या माणसांना दाहकत्वातील तेज भुरळ घालते, निकट सहवासात गेल्यावर तशी स्थिती राहतेच असे नाही. अंदमानच्या कारावासात आणि रत्नागिरीच्या स्थानबद्धतेत अशा गोष्टींची चाहूल कोठेकोठे लागते आणि पुढे १९३७ नंतर संपूर्ण मुक्त होऊन राजकारणात वावरू लागल्यावर ती चाहूल अधिक स्पष्टही होते. पण अशा साऱ्या मर्यादा ध्यानात घेतल्यावरही सावरकरांचे जे दर्शन आपल्याला घडते ते एका अद्‌भुत, उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचेच राहते.

## अनेकांगी राष्ट्रविचार

सावरकरांचे भाग्य आणि आपल्या समाजाचेही भाग्य असे की, हौतात्म्याच्या दिशेने वाट चालत असलेले सावरकर अंदमानच्या कारावासात गेले आणि अंदमानातूनही परत येऊन अखेर ते मुक्त झाले. त्यावेळी त्यांनी पन्नाशी ओलांडलेली होती. एवढ्या शारीरिक आणि मानसिक यातनांतून बाहेर पडलेला हा योद्धा ऐन तारुण्यातील कालाइतकाच झुंझार राहिलेला आहे, असा एक विस्मय उत्पन्न करणारा अनुभव साऱ्या देशाला आला. क्रान्तिकारकाच्या हृदयात जागत असणारी देशभक्तीची धगधगीत ज्वाला उसळत्या रक्ताचे विशीतील तरुणच पेलू शकतात, असे मानले जाते. जगात सर्वत्र येणारा अनुभव सामान्यपणे तसाच आहे. पण सावरकरांचे सारेच काही असामान्य. तारुण्याच्या सीमेवर पाऊल ठेवतेवेळी त्यांच्या हृदयात जो अंगार फुललेला होता, तो पन्नाशी नंतरच्या सरत्या वयातही कधी मंदावला नाही.

पण त्याहून महत्वाची गोष्ट आहे ती अशी की क्रांतिकारकांच्या आत्मबलिदानामागे उभा असणारा विचार सांगणाऱ्या सावरकरांनी राष्ट्राचे जीवन यशस्वी होण्यासाठी, समाजाच्या मूल अस्तित्वासाठी आणि प्रगती-

साठी आवश्यक वैचारिक दृष्टीकोनही तितक्याच समर्थपणे मांडला आहे. त्यामध्ये केवळ राजकारण आलेले आहे असे नाही, तर छोटया वाटणाऱ्या प्रश्नांपासून तो मोठ्या मानल्या जाणाऱ्यापर्यंतचे अनेकानेक प्रश्न येऊन गेले आहेत. त्यात मराठीचा अभिमान जागविलेला आहे, ती शुद्ध कशी राखावी याचे मार्गदर्शन आहे, समग्र राष्ट्राची भाषा संस्कृतनिष्ट हिंदी ही होय हे सांगितले आहे, मराठ्यांच्या उज्ज्वल इतिहासाचा मागोवा आहे, भारताच्या इतिहासातील सोनेरी पाने आहेत, जातिभेद आणि अस्पृश्यता यांच्या निर्मूलनाची आवश्यकता प्रतिपादिली आहे, हिंदु समाज एकात्म व्हावा यासाठी केलेला समतेचा पुरस्कार आहे, बुवाबाजीचे स्तोम आणि क्षुद्र दैवत प्रतीके यावर प्रहार आहे, कालबाह्य रूढीवर आणि आंधळ्या धर्मश्रद्धेवर केलेला आघात आहे, परधर्मात गेलेल्यांना स्वधर्मात परत आणण्याची हाक आहे, रोटीबंदी किंवा बेटीबंदी असे खुळचट निर्बंध फेकून देण्याचा आदेश आहे, कोणत्या सामाजिक सुधारणा तातडीने व्हावयास हव्यात त्याचे दिग्दर्शन आहे, यंत्रयुगाचे स्वागत करण्याचा सल्ला आहे, सैनिकीकरणाची पुकार आहे, स्वदेशाच्या सीमांचे संरक्षण व्हावयास हवे याविषयीची जागती चिंता आहे, अधुनिक युगाचे प्राणतत्त्व अशा विज्ञाननिष्ठेचा आणि बुद्धिप्रामाण्यवादाचा अंगीकार आहे, पोथीनिष्ठा आणि पोकळ कर्मकांड यांचा धिक्कार आहे, त्याचवेळी आपला धर्म आणि संस्कृती याविषयीचा अभिमान जोपासण्याचा आग्रह आहे, हिंदुसमाजाला आपल्या अस्मितेची खूण पटवून देणारा हिंदुत्वाचा संदेश आहे, नुसता संदेश नाही तर त्या हिंदुत्वाच्या संकलपनेचे आपल्या परीने विवरण आहे.

## वास्तवाचे भान

सावरकरांच्या विचारात कोठेही, कसलाही भोंगळपणा नाही. सर्वत्र वास्तवाचे रोकडे भान त्यांनी ठेवलेले आहे. राष्ट्राचे जीवन हें नित्य धकाधकीचे असते, ते ऐहिकातील असते. या ऐहिकात सात्त्विकराजसाबरोबर तामस, सुष्टाबरोबर दुष्ट असतात. देशाला किंवा समाजाला मित्र असतात, तसेच शत्रूही असतात. शत्रूंचा मुकाबला सामर्थ्यानेच करावा लागतो, हें सारे सावरकर जाणून होते. एखाद्या उदात्त मानल्या जाणाऱ्या तत्त्वाच्याही आहारी ते कधी गेले नाहीत. समरांगणात उभ्या असलेल्या सेनापतीला तसे कधी करता येत नाही आणि सावरकर हे नित्य समरांगणात उभे होते.

त्यांची शोधक दृष्टी सतत आपल्या समाजाच्या शत्रूंवर रोखलेली होती आणि सावध हात जणू कमरेला लटकविलेल्या तलवारीवर होता. सद्‌गुणांचा अस्थानी अतिरेक हा आपल्या अस्तित्वालाच घातक ठरतो हें त्यांनी पुन्हा पुन्हा सांगितले आहे. हे सांगणे फार आवश्यक होते. साधुत्वाच्या, उदारतेच्या आणि सहिष्णुतेच्या पोटी या अभागी हिंदुसमाजाने आजवर जेवढी किंमत मोजली आहे, तेवढी जगातील दुसऱ्या कोणत्याही समाजाने बहुधा मोजली नसावी. अशा या हिंदुसमाजाला सावरकरांनी जो अनेकांगी विचार दिला तो किती उचित आणि आवश्यक होता याची साक्ष स्वातंत्र्य-प्राप्तीनंतरचे प्रत्येक वर्ष आपल्याला पटवीत आले आहे. यानंतर येणारे प्रत्येक वर्ष ती साक्ष तशीच पटवीत राहणार आहें हे आज सभोवताली घडणाऱ्या घटना जो डोळे उघडून पाहील त्याच्या सहज लक्षात येण्यासारखे आहे.

सावरकरांचे हृदय आपल्या समाजाविषयी अथांग प्रेमाने भरलेले होते. त्यांची आयुष्यभरातील उक्ती आणि कृती या साऱ्यांची प्रेरणा त्या प्रेमात साठविलेली आहे. आपला हिंदुसमाज जगात ताठ मानेनें उभा राहू शकला पाहिजे या एकमात्र आकांक्षेने झपाटलेला हा समर्थ पुरुष जन्माला आला त्याला शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. त्यांनी सांगून ठेवलेले विचार आपल्या समाजाने आत्मसात केले, तर या देशाच्या भवितव्याची चिंता करण्याचे कारण उरणार नाही.

★★★

# सावरकरांचे व्यक्तिमत्त्व

प्रा. राम कापसे

स्वातंत्र्यवीर सावरकरांसारख्या व्यक्तींच्या व्यक्तिमत्वावर काही बोलावयाचे असेल तर अशा व्यक्तींशी प्रत्यक्ष परिचय असणे नेहमीच श्रेयस्कर असते. अर्थात सर्वांनाच हे भाग्य लाभते असे नाही. अशावेळी त्या व्यक्तीचे वाङ्मय आणि त्या व्यक्तिविषयी जे जे लिहून ठेवले गेले आहे त्या आधारे त्या व्यक्तीच्या चरित्राचा आणि व्यक्तिमत्वाचा शोध घेणे आवश्यक ठरते. सावरकरांच्या वाङ्मयाचा अभ्यासक या नात्याने मला जाणवलेल्या त्यांच्या व्यक्तिमत्वाचे काही पैलू उलगडून दाखविण्याचा प्रयत्न मी करणार आहे.

सावरकरांच्या व्यक्तिमत्वातील सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे आयुष्यात सावरकरांनी कोणाचेही शिष्यत्व पत्करलेले दिसत नाही. सामान्यतः असे घडत नाही. म. गांधी, गोपाळकृष्ण गोखले, न्या. रानडे यांसारख्या मोठ्या माणसांनी कोणाला तरी गुरुस्थानी मानले होते. सावरकरांच्या बाबतीत शि. म. परांजपे वा लो. टिळक त्यांचे गुरु असतील असे आपल्याला वाटेल पण त्यांच्या आत्मचरित्रात तसा कोठेही उल्लेख नाही. दिसते ते असे की स्वातंत्र्यवीरांनी आयुष्यभर जे निर्णय घेतले ते स्वतःचे स्वतः घेतले. कुणीतरी मार्ग दाखविला, शिकविले आणि त्याप्रमाणे सावरकर वागले असे सावरकरांच्या बाबतीत दिसत नाही. याअर्थी त्यांचे व्यक्तिमत्व स्वयंभू होते. त्यांना कोणी गुरु असा नव्हता.

सावरकरांचे लहानपण भगूरला गेले. तेथे त्यांच्या सहवासात जे राहिले त्यांनी आपल्या आठवणी लिहून ठेवल्या आहेत. सावरकरांनी जरी त्यांना मित्र मानले असले तरी या मंडळींची अशी भावना होती की सावरकर आपल्यापेक्षा कितीतरी उंच आहेत. 'आपण एकत्र वावरलो, खेळलो, एकत्र चळवळी केल्या हा एक योगायोग आहे.' अशी त्यांची श्रद्धा दिसते. या मित्रमंडळीत कोणी वयाने तर कोणी अन्य विषयात सावरकरांपेक्षा मोठे

होतें. परंतु त्याआधारे त्यांनी सावरकरांना काही शिकविलें असे दिसत नाही. सावरकर हे एक अलौकिक व्यक्तिमत्व आहे याच भावनेने हा मित्रपरिवार भारावलेला दिसतो.

बाबाराव सावरकर हे सावरकरांचे वडील बंधू. त्यांची तर तात्यारावांबद्दल सतत अशी भावना दिसते की तें कोणीतरी अवतारी पुरुष आहेत. विपन्नावस्थेतसुद्धा बाबारावांनी तात्यांना नोकरीत शिरू दिलें नाही. नोकरीसाठी परीक्षा, सरकारी नोकरी या गोष्टी तात्यासाठी नाहीत. तो काही तरी उज्ज्वल यश मिळविण्यासाठी, असामान्य जीवन जगण्यासाठी जन्माला आला आहे, अशी बाबारावांची भावना होती. तात्यासाठी सर्व प्रकारचे कष्ट उपसण्याची या मोठ्या भावाची तयारी होती. प्रसंगी बाबा स्वयंपाक करीत आणि तात्यांना जेवायला वाढत, असे त्यांच्या चरित्रात नमूद केलें आहे. तात्या वेगळा आहे म्हणून त्याला वेगळी वागणूक दिली पाहिजे असे बाबारावांना वाटावे यावरुन तात्यांच्या व्यक्तिमत्वात काहीतरी विलक्षण रसायन असलें पाहिजे, असे जाणवत राहतें.

पुढे तात्या नासिकला शिक्षणासाठी आले. तेंथे म्हसकर व पागे हे बाबारावांचे मित्र होतें. तें वयाने अर्थातच मोठे होतें. काहीतरी कार्य करावे म्हणून त्यांनी मित्रमेळा ही संस्था स्थापन केली. त्यावेळी सावरकरांचे वय जेमतेम चौदा-पंधरा वर्षांचे असेल. हा मुलगा मित्रमेळ्यात सामील झाला. संस्थापकांच्या दृष्टीने त्यांच्या मित्राचा धाकटा भाऊ कार्यकर्ता म्हणून त्यांच्यात आला आहे असे सुरवातीला वाटणे स्वाभाविक होतें. अशी हरहुन्नरी मुलें कार्यकर्ता म्हणून सर्वांनाच हवीशी वाटतात. सावरकरांनी मित्रमेळ्याच्या सदस्यत्वाची शपथ घेतली आणि त्यावेळी छोटेसे भाषण केलें. त्या भाषणाने म्हसकर अतिशय भारावून गेले. पुढे वर्षभराच्या आत अशी स्थिती निर्माण झाली की सावरकरांनी निर्णय घ्यावे व म्हसकर, पागे यांनी तें अंमलात आणावे. सावरकरांना माणसें अशी सहजगत्या वश होत गेली.

माणसे मोठी झाली की सगळेच त्यांच्यापुढे वाकतात. पण माणसे मोठी होत असतांना त्यांना सतत कष्ट, संघर्ष करून म्हणजे झगडून मोठे व्हावे लागतें. लो· टिळकांच्या बाबत असेच झाल्याचे दिसतें. टिळकांना एकएक

पाऊल पुढे टाकतांना त्रास झाला. जवळपास असलेल्या माणसांनी त्यांना वाढूच दिले नाही. मोठेपण मिळवतांना लोकमान्यांना जसा संघर्ष करावा लागला तसा सावरकरांना मुळीच करावा लागला नाही. हे त्यांचे वैशिष्टच.

अगदी बालवयापासून सावरकरांनी माणसांना वश करणे, आपल्या स्वाधीन करून घेणे, त्यांना आपल्यासारखे करून टाकणे या माणसे मिळविण्याच्या विद्येत खूप प्रगती केली असल्याचे जाणवते. सावरकरांच्या केवळ सहवासामुळे माणसे बदलून जात, याची अनेक उदाहरणे सापडतात. कवी गोविंदांचे उदाहरण खूपच बोलके आहे. खेड्यात वाढलेला हा माणूस. चेष्टामस्करी, मौज, वायफळ गप्पा यात त्यांना विशेष रस होता. हे दरेकर म्हणजेच कवी गोविंद सावरकर राहत त्या गल्लीत रहावयास आले. सावरकरांच्या सहवासात त्यांचे संपूर्ण आयुष्य बदलून गेले. लावण्या आणि शृंगारिक कवितात रमणाऱ्या गोविंदांच्या प्रतिभेचे सुप्त तेज उफाळून बाहेर आले. कवी गोविंद स्वातंत्र्याचे शाहीर आणि राष्ट्रीय वृत्तीचे क्रांतिकारक कवी बनले. सावरकरांचा सहवास आणि नेतृत्व यांच्या परिसस्पर्शानें हे घडून आले.

स्वाभाविक नेतृत्व आणि दुसऱ्यावर छाप पाडण्याची किमया ही सावरकरांची वैशिष्टये ठिकठिकाणी दिसून येतात. मदनलाल धिंग्रा कोण होता ? इंग्लंडमध्ये शिकण्याच्या निमित्ताने गेलेला हा खुशालचेंडू युवक. लंडनमध्ये हमरस्त्यावरील कोपऱ्यावर रेकॉर्डस् लावणे, नृत्य करणे, आपणही नृत्यात मग्न होऊन जाणे अशी त्याची आवड. आपल्या उत्कट मनोवृत्तीचा आविष्कार तो नृत्यातून करीत असे. उत्कट मनोवृत्तीला योग्य वळण नसले की ती बहकते. सावरकरांना भेटण्यापूर्वीचा मदनलाल हा असा होता. तो सावरकरांच्या सहवासात आला. हळुहळू त्याच्यात बदल होत गेलेला दिसतो. हा बदल इतका आमूलाग्र होता की त्याच धिंग्राच्या हातून इंग्लंडच्या भूमीवर कर्नल वायलीचा खून झालेला आहे. हसतहसत तो फासाला सामोरा गेला. सावरकर ज्या उत्कटतेनें जगायचा प्रयत्न करीत होते त्याच उत्कटतेने मदनलाल जगला आणि देशासाठी हुतात्मा झाला.

अंदमानच्या तुरुंगात काय झालें ? तेथे काळचा पाण्याची शिक्षा भोगण्यासाठी आलेली मदमस्त अशी अनेक माणसे सावरकरांच्या अवतीभवती

होती. सावरकरांनी त्यांनाही झपाटून टाकले, आपलेसे करून टाकले. ज्या-दिवशी सावरकर अंदमानच्या तुरुंगामधून बाहेर पडले त्यादिवशी त्यांना एक चाफ्याच्या फुलांचा हार घालायला मिळावा म्हणून सर्व प्रकारची शिक्षा भोगायला हेच कैदी तयार होते. हे अर्थातच आपोआप झालेले नाही. सावरकरांचा व्यवहार त्या कैद्यांना सुद्धा सावरकर हे आपले नेते वाटावेत असाच होता.

सावरकरांच्या व्यक्तिमत्वाचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने त्यांच्या जीवनातील आणखी एका प्रसंगाचा जरा तपशिलात जाऊन विचार करणे आवश्यक आहे. सावरकर पुण्यात आले तेव्हाचा हा प्रसंग आहे. ते फर्ग्युसन महाविद्यालयात शिकत होते. त्या काळातील एका सभेची ही हकिकत. या सभेच्या व्यासपीठावर त्या काळातील पुण्यातील सर्व मोठी माणसे उपस्थित होती. फक्त लोकमान्य टिळक नव्हते. या सभेत मोठ्या नेत्यांच्या भाषणांपूर्वी बोलण्यासाठी काही युवकांची योजना केली होती. कॉलेज प्रतिनिधी म्हणून सावरकरांना बोलण्यासाठी पाचारण करण्यात आलें होते. पुण्याच्या या प्रचंड सभेत स्वदेशी, स्वराज्य वगैरे विषयांची चर्चा चालली असताना सावरकर बोलायला उभे राहिले. त्यांनी आपल्या भाषणात जे सांगितलें ते भल्याभल्यांना अवाक् करून गेले. ते म्हणाले की, स्वदेशी, स्वराज्य या गोष्टींची चर्चा बरोबरच आहें. पण या देशात इंग्रजांचें राज्य आहे हीच गोष्ट आपल्याला सहन होता कामा नये. विदेशी कपडे वापरणे ही जर अयोग्य गोष्ट वाटत असेल तर आपण या कपड्यांची होळी केली पाहिजे. नुसती कल्पना सुचवून सावरकर थांबलें नाहीत तर त्यांनी संपूर्ण योजनाच तपशीलवार सभेसमोर मांडली. सावरकरांच्या या आक्रमक व आंदोलनात्मक पवित्र्यामुळे सभेचें वातावरण कसे बदलून गेलें असेल व नंतरच्या भल्याभल्या वक्त्यांची काय परिस्थिती झाली असेल याची आपण कल्पना करू शकतो. त्याकाळात विदेशी कपड्यांची होळी करण्याची कल्पना मांडणे ही सामान्य गोष्ट नव्हती. ही कल्पना अभिनव हाती. त्यातून बंडाची ठिणगी पडणार होती. हे बंड सुरू करण्याचे आवाहन सावरकर सभेत करीत होते. बंड करण्याची मानसिक तयारी सगळ्यांची असतेच असे नाही. पण सावरकरांच्या भाषणाचा प्रभावच असा होता की सावरकरांचें आवाहन नंतरच्या वक्त्यांनादेखील स्वीकारावे लागले. ती सभा संपवून सावरकर टिळकांना

भेटण्यासाठी गेले त्यावेळी टिळकांनी सावरकरांना फक्त एकच प्रश्न विचारला, " कल्पना बरी आहे, परंतु एक गाडीभर कपडे जमतील ना? " आंदोलन करणे त्याकाळात किती अवघड होते हेच यावरून लक्षात येते. टिळकांना भेटायला सरकारने जेव्हा बंदी घातली तेव्हा टिळकांच्या घरावरून जाणारा रस्ता जवळचा असला तरी लोक फेरा घालून जात असत, असा तो काळ. अशा भीतीग्रस्त वातावरणात सावरकरांनी आंदोलनाची हाक दिली होती. त्या उत्स्फूर्त आवाहनाने सभेत चैतन्याची लाट उसळली. नंतर सावरकरांनी योजनेनुसार ठरल्या वेळी, ठरल्या ठिकाणी विदेशी कपड्यांची पहिली होळी या देशात घडवून आणली.

खरे नेतृत्व, स्वयंभू नेतृत्व हे अशा प्रकारचे असते. अशा नेतृत्वाला माणसे वश होतात. तरुण वयातील सावरकरांचे फोटो बघितले तर लक्षात येते की सावरकर दिसायला अत्यंत सुंदर होते. त्यांचे डोळे अतिशय तेजस्वी आणि भेदक होते. ' एखादा फणा काढलेला पिवळाजर्द नाग असावा तसे सावरकर दिसत,' हे सावरकरांचे वर्णन यथार्थ आहे. अत्यंत रूपसंपन्न आणि सतेज असेच त्यांचे व्यक्तिमत्व होते. व्यक्तिमत्वाच्या तेजस्वितेचे मूळ त्यांच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक ठेवणीत होते, तसेच विचार करण्याच्या त्यांच्या विशिष्ट पद्धतीत, कृतिशीलतेत आणि उपक्रमशीलतेतही होते. ही सर्व वैशिष्टचे सावरकरांच्या व्यक्तिमत्वात एकवटलेली दिसतात.

असे जर आहे तर सावरकरांना अपयश कां आले, याचा विचार करावा लागेल. सावरकरांची अखेर अपयशी अशाच प्रकारची आहे. असे कां व्हावे ? रत्नागिरीला आल्यानंतर सावरकरांनी सामाजिक नेतृत्व केले, त्यानंतर त्याकाळात अत्यंत लोकप्रिय असणाऱ्या म. गांधींच्या बरोबरीने सभा घेऊन राजकीय नेतृत्व केलें. पण लौकिकार्थानें त्यांना अपयश आलें हे खरे आहे. याचा अर्थ त्यांच्यात नेतृत्वगुण कमी होते असे समजण्याचें कारण नाही. नेतृत्व करण्यासाठीच जन्माला आलेला असा हा नेता होता. त्यामुळे त्यांच्या अपयशाची स्वतंत्रपणे मीमांसा करावी लागेल आणि त्यांच्या नेतृत्वाचे वेगळेपण स्वतंत्रपणे समजावून घ्यावे लागेल.

सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणखी एक पैलू बघू. भावना व बुद्धी या सामान्यतः एकत्र न नांदणाऱ्या. पण त्या सावरकरांच्या ठिकाणी एकत्र

होत्या. अत्यंत ध्येयवादी, निष्ठावान आणि भावनाशील माणसे तर्कशुद्ध बोलू लागली की जरासे आश्चर्य वाटते कारण तर्काचे आणि भावनाशील वृत्तीचे अनेकदा वाकडे असते, असाच सर्वसाधारण अनुभव आहे. सावरकर हे या नियमाला अपवाद होते.

सावरकरांजवळ प्रचंड भावनाशीलता होती. त्यांनी आयुष्यात जे अनेक पराक्रम केले त्यांची प्रेरणा त्यांच्या भाववृत्तीत आढळून येते. भावनाशील असल्याशिवाय माणूस हौतात्म्याचा मार्ग कधीच स्वीकारू शकणार नाही. काही लोक एक चमत्कारिक प्रश्न कधीकधी विचारतात. अनेक लोक फासावर लटकले तसे सावरकर काही प्रत्यक्ष फाशी गेले नाहीत, मग सावरकर हुतात्मा कसे ? या प्रश्नकर्त्यांना प्रतिप्रश्नानेच उत्तर द्यायला हवे. सावरकरांच्या जीवनातील एक तरी प्रसंग दाखवून द्या की हौतात्म्य स्वीकारण्याची संधी आली आणि सावरकरांनी ती नाकारली. नाशिकपासून साताऱ्यापर्यंत सर्व ठिकाणी विश्वासू माणसे जोडली, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात अभिनव भारताच्या शाखा सुरू केल्या, भारतातच नव्हे तर परदेशात देखील हे कार्य पोहोचविले, परळला बाँबचा कारखाना काढला, इंग्लंडातून अनंत कान्हेरे सारख्या अनेकांना गुप्त मार्गानें पिस्तुले पाठविली. या सर्व प्रसंगात स्वतःचे हात पोळून घेण्याशिवाय त्यांना काय मिळणार होते ? सर्व क्रांतिकारक शिर तळहातावर घेऊन प्रतिज्ञा घेणारे हाते, त्यासाठी जे भोगावे लागेल ते सर्व स्वीकारायला ते सज्ज होते. त्यांची बलिदानाची प्रत्येक क्षणी तयारी होती. जळत्या आगीत उडी घ्यायला नित्य सिद्ध असणारा हा माणूस होता. ते फ्रांसमध्ये असताना एक प्रसंग घडला तो यासंदर्भात लक्षात घेण्यासारखा आहे. सावरकरांच्या अटकेचें वॉरंट निघाले होते, त्यांची सर्व मित्रमंडळी अटकेत होती. फ्रांसमधील त्यांचें सहकारी सावरकरांना परोपरीनें सांगत होते की त्यांनी इंग्लंडला परत जाऊ नये, कारण पुढे काय होणार ते ठरलेलेच होते. त्या सर्वांना सावरकरांनी जे उत्तर दिले ते संस्मरणीय आहे. 'माझे सर्व सहकायी जेलमध्ये असताना मला याठिकाणी राहणे जमणार नाही.' इंग्लंडला जाता क्षणीच त्यांना अटक झाली. पुढे काय झाले हें सर्वांना ठाऊक आहे. परिणाम काय होतील हे माहीत असूनही त्याची पर्वा न करता, एकदा पत्करलेला मार्ग प्रखर ध्येयवादाने, प्रसंगी बलिदानाची तयारी ठेऊन, आक्रमित राहाण्याची ही जी

भूमिका त्यालाच हौतात्म्य असे म्हणतात. तरल भाववृत्ती असल्याशिवाय हौतात्म्य संभवतच नाही.

सावरकरांच्या या भाववृत्तीचा आविष्कार त्यांच्या श्रेष्ठ दर्जाच्या कवितेत दिसून येईल. अंदमानच्या जेलमध्ये असतांना त्यांनी लिहिलेली एक एक कविता डोळ्यासमोर आणली तरी त्यांचे कुसुमकोमल कविहृदय जाणवू शकेल. भावनेची हीच कोवळीक सावरकरांच्या कौटुंबिक संबंधात व्यक्त झाली आहे. येसू वहिनींना उद्देशून लिहिलेले काव्यात्म पत्र किंवा धाकटा भाऊ बाळ याला 'पत्नीला त्रास होईल तू असे वागू नकोस' असे आर्जवून सांगणारे पत्र वाचले म्हणजे त्यांची कुटुंबवत्सलता कोणत्या दर्जाची होती हे कळू शकते. आपल्या नातलगांबाबत त्यांनी जे लिहून ठेवले आहे. ते सुद्धा या दृष्टीने वाचण्याजोगे आहे. नेतेपदी पोहोचल्यानंतरसुद्धा स्नेहाच्या या जाणीवा कधीही कमी झाल्या नाहीत हे विशेष. येसूवहिनींबाबत त्यांच्या मनातील भावना 'ही माझी जणू मोठी बहीण आहे' अशी होती. तिच्याजवळ हट्ट करावे, तिला फसवावे, तिची चेष्टा करावी असे त्यांचे व वहिनीचे नाते. कलिंगडे चांदण्यात वाळत घातली म्हणजे फार गार होतात असे सांगून घेऊन जावीत आणि जाता जाता सगळा गर खाऊन टाकावा, हे जे सावरकरांचे वहिनींशी वागणे आहे त्यातून सावरकरांच्या अंतःकरणांतील मृदु भावनाच व्यक्त होतात. आपल्या अनुयायांबद्दलच्या त्यांच्या भावना अशाच उत्कट आहेत.

ही भावनाशीलता आयुष्यभर त्यांना सोबत करते. त्यांचे देशावरील प्रेम असेच अंतःकरणातून उमलले आहे. या देशासाठी सर्वस्व अर्पण केले पाहिजे ही त्यांची सतत धारणा आहे. त्यांचे मानवतेवरील प्रेम याच पद्धतीचे आहे. सावरकरांच्या लेखनातील उतारेच्या उतारे असे काढून दाखविता येतील की ज्यातून सावरकरांचे मानवताप्रेम व्यक्त होते. माणुसकी हा एकच धर्म आहे अशी त्यांची धारणा होती. तरीसुद्धा सावरकरांना आयुष्यात जे कटु अनुभव आले त्याचा परिणाम म्हणून केवळ उपयुक्ततावादातून सावरकरांनी केवळ हिंदुत्वाची भूमिका घेतली. मुळात सबंध मानवमात्रावर प्रेम करणारा हा मनुष्य आहे. सावरकरांना स्वतःला शेवटी हिंदुत्व या भूमिकेला बांधून टाकावे लागले याला आणखी एक कारण आहे. कितीही उत्कट ध्येयवाद बाळगला आणि सबंध मानवतेला दृढमिठी घालण्याचा

प्रयत्न केला तरी माणसे फार थिटी असतात, उपयुक्ततावादी असतात. त्यांना मोठी आवाहने पेलत नाहीत. मोठीमोठी आवाहने करून, त्यांच्या मागे लागून, राष्ट्राचा ऱ्हास होता कामा नये, ही सावरकरांची भूमिका असल्यामुळे ते हिंदुत्वाकडे वळले. म्हणून त्यांचे मानवतेवरील प्रेम कमी होते असे समजण्याचे कारण नाही.

एकीकडे भावनाशील कविमन असणारे सावरकर दुसऱ्या बाजूला अत्यंत तर्ककठोर आणि बुद्धिनिष्ठ होते. 'गाय हा उपयुक्त पशू आहे त्यामुळे गायीचे पूजन करू नका तर योग्य तऱ्हेने पालन करा.' असे समाजास आवर्जून सांगणारे सावरकर खऱ्या अर्थाने बुद्धिनिष्ठ होते. त्यांचे सर्व विज्ञाननिष्ठ निबंध याच दृष्टीकोनातून लिहिले गेले आहेत. या त्यांच्या विचारांना सनातनी हिंदूंचाही विरोध झाला. रुढी, अंधश्रद्धा, यावर त्यांनी कठोर प्रहार केले. त्यांचे विचार या समाजाला पचवता आले नाहीत. सर्वसामान्यांना तर्क फारसा समजत नाही, समजला तरी रुचत नाही. राजकारणात यशस्वी होण्यासाठी टोकाची भूमिका घेण्याचे टाळावे लागते, तर्काला मुरड घालावी लागते. जी मुत्सद्देगिरी गांधीजींनी दाखविली ती बुद्धिनिष्ठेचा वसा घेतलेल्या सावरकरांना जमली नाही. यामुळेच ते कदाचित अपयशी झाले असतील.

तर्काबाबत सावरकरांनी कधीही तडजोड केलेली नाही. या त्यांच्या तर्ककठोर वृत्तीमुळेच त्यांनी पत्नीच्या मृत्युनंतर अंत्यसंस्कार केले नाहीत. स्वतःच्या मृत्युनंतर काय करावे याबाबत मृत्युपूर्वीच बुद्धिनिष्ठ सूचना देऊन ठेवल्या. "माझ्या मृत्युनंतर कोणतेही धार्मिक विधी करू नयेत. कोणीही हरताळ पाळू नये. कारण मुंबईसारख्या मोठ्या शहरात खाणावळीत जेवणारे लोक असंख्य असून हरताळ पाळल्यामुळे त्यांना उपाशी रहावे लागेल. माझ्या मृत्युनंतर चंदनवाडीतील विद्युतदाहिनीत अंत्यसंस्कार करावा. माझी रक्षा गंगेत किंवा गोदावरीत न टाकता सर्व नद्या अखेर ज्या सागराला जाऊन मिळतात त्या सागरात – चौपाटी येथे – नेऊन टाकावी." अनुभव असा आहे की तारुण्यात साधारणपणे सगळेच सोपे वाटते. वय वाढल्यावर सगळे अवघड होते. वयाच्या वाढीबरोबर तर्काची पकड ढिली व्हायला लागते आणि तर्कापेक्षा इतर गोष्टी महत्वाच्या वाटायला लागतात. तरुणपणी तर्कनिष्ठ असणारी माणसे वय वाढल्यानंतर

तशी राहात नाहीत. परंतु आयुष्याच्या अखेरपर्यंत तर्काच्या आधारे निर्णय घेणे आणि त्या निर्णयासाठी जे स्वीकारावे लागेल तें स्वीकारण्याची तयारी ठेवणे हे सावरकरांचे वैशिष्टय होतें.

या बुद्धिनिष्ठेमुळेच सावरकर भावनेवर विजय मिळवू शकले. तें भावनाशील असलें तरी भावनाविवश कधीही झालें नाहीत. भावनाशीलता आणि भावविवशता या गोष्टी पूर्णतः भिन्न असून भावविवश होणाऱ्या लोकांना सावरकरांनी कधीही जवळ केंले नाही. भावनेंवर विवेकाने नियंत्रण राखता येते हे त्यांनी पूर्ण ओळखले होतें. आयुष्याच्या अखेरीस जेव्हा माणसे अत्यंत हळुवार झालेंली असतात व सर्व गोतावळा भोवती जमविण्याच्या प्रयत्नात असतात, अशावेळी सावरकर मात्र भेटावयास आलेंल्या लाडक्या प्रभातला, 'आपण उद्या भेटू शकू' असे सांगून निश्चयानें परत पाठवतात. भावनाशीलता आणि तर्कशुद्धता यांचा जो समतोल असावा लागतो तो सावरकरांच्या ठायी प्रकर्षानें घडून आल्याचे जाणवतें. जीवनात बुद्धीला महत्त्व असतें आणि भावनेलाही. परंतु या दोन्ही गोष्टींचे महत्त्व दुर्दैवाने योग्य प्रकारे जाणले जात नाही. उदाहृणार्थ, आगरकरांनी बुद्धीचे महत्त्व जाणले पण भावनेचे जाणले नाही, परिणामी आगरकरांना पराभव पत्करावा लागला. उलट टिळकांनी बुद्धीपेक्षा भावनेंला अधिक महत्त्व दिले, याबाबतीत सावरकरांचे वेगळेपण लक्षात घेण्याजोगे आहे.

उपक्रमशीलता आणि उद्योगशीलता सावरकरांच्या आयुष्यात अगदी बालपणापासून अखेरपर्यंत कायम दिसतें. इंग्रजी सहावीत असताना सावरकरांनी संपूर्ण जगाचा व जगातील प्रत्येक देशाचा इतिहास वाचला होता. विपुल वाचन करताना आढळलेली प्रत्येक चांगली गोष्ट तें आपल्या 'सर्वसार संग्रह' नामक वह्यांमध्ये टिपून ठेवीत. निसर्गानें जरी बुद्धीचे देणे दिलेलें असले तरी सावरकरांनी आपल्या बुद्धीला परिश्रमपूर्वक सुयोग्य वळण लावले. त्यामुळेच जेथे जातील तेथे यश मिळविणे त्यांना सहज शक्य झाले. या उद्योगशीलतेंबरोबरच शरीराच्या विकासाकडेही त्यांनी लक्ष दिले. व्यायाम करून त्यांनी जे शरीर कमावले त्यामुळेच नंतरच्या आयुष्यात झालेंल्या हालअपेष्टांना ते तोंड देऊ शकले. व्यक्तिविकास साधण्यासाठी शारीरिक, मानसिक, बौद्धिक अशा सर्वांगीण विकासाकडे त्यांनी सारखे लक्ष

दिले. बोटीवरील शौचकुपातून सावरकरांनी मारलेली उडी लक्षात घेता अंग आक्रसून बारीक करण्याची योगविद्या त्यांना अवगत असावी असे वाटल्यावाचून राहात नाही. त्यांची ही उद्योगशीलता अखेरपर्यंत टिकली. ऐंशीच्या घरात असताना सावरकरांना मृत्यूचे वेध लागले. त्यावेळी मृत्यूसंबंधी आपले विचार लेखरूपाने लिहून त्यांनी 'माणूस' साप्ताहिकाकडे पाठविले. अत्यंत अभ्यासपूर्वक लिहिलेला असा तो लेख आहे. आजवर किती लोकांनी प्रायोपवेशन करून आपले आयुष्य संपविले, किती जणांनी समाधी घेतली याचा चिकित्सक अभ्यास त्या लेखात आलेला आहे. आपल्यालासुद्धा आत्माहुती द्यायची आहे अशा प्रकारचा निश्चय याचवेळी त्यांच्या मनात पक्का होत होता. मृत्यूला आपण असेच सामोरे जायचे असा निर्णय त्यांनी घेतला. एकदा विचारपूर्वक हा निर्णय घेतल्यानंतर त्यापासून काहीही झाले तरी तें माघारी जाणे शक्य नव्हतें. आयुष्यात सर्व प्रकारच्या तडजोडी करणारी माणसे एका बाजूला दिसतात आणि दुसऱ्या बाजूला एखादा निर्णय घेतल्यानंतर त्यासाठी सर्वस्वाचा होम करण्याची वृत्ती असणारे सावरकर दिसतात. प्रायोपवेशनाने मृत्युला सामोरे जाण्यात सावरकरांच्या व्यक्तिमत्वाचा एक आगळाच पैलू चमकून गेलेला दिसतो.

प्रखर देशभक्ती हा सावरकरांच्या व्यक्तिमत्वाचा आणखी एक पैलू आहे. त्यांच्या आयुष्याच्या अखेरच्या पर्वात भारताचे चीनशी युद्ध सुरू झाले. तेव्हा सावरकरांनी तार करून पं. नेहरुंना असे कळविले की "देशाच्या सैन्यात जाऊन देशासाठी आत्मार्पण करण्याची प्रेरणा माझे हृदय मला देत आहे." पाकिस्तानबरोबर युद्ध चालू असताना इकडे सावरकर अत्यवस्थ होते. युद्धासंबंधी प्रत्येक बातमी सावरकरांना तात्काळ कळाली अशी व्यवस्था लालबहाद्दूर शास्त्रींनी केली होती. भारतीय सेना लाहोरच्या दिशेने विजयी वाटचाल करीत असल्याच्या बातम्या जसजशा सावरकरांच्या कानावर येऊ लागल्या तसतसा त्यांच्या प्रकृतीस आराम पडत गेला. अखेरी सावरकरांचे प्रायोपवेशन चालू असताना हिंदुमहासभेचे काही नेंते त्यांना भेटावयास गेले. त्या सर्वांनी सावरकरांनी अधिक काळ जगावे अशी इच्छा प्रदर्शित केली. तेंव्हा 'माझ्या या उर्वरित आयुष्यात तुम्ही अखंड हिंदुस्थान मिळविणार आहात काय ? तसे जर असेल तर मी अधिक काळ जगण्यास तयार आहे' असे सावरकरांनी निर्धाराने सांगितले. जीवनाच्या अखेरपर्यंत

बुद्धी सतेज असलेला आणि जीवनाचे अंतिम ध्येयदेखील पूर्वीइतकेच स्पष्ट आणि अढळ राखणारा हा महापुरुष होता.

वृद्धापकाळातसुद्धा इतकी सतेज बुद्धी राहावी, आपल्या आयुष्याचे ध्येय इतके स्पष्ट दिसावे यासाठी वेगळेच व्यक्तिमत्त्व माणसाजवळ असावे लागते. माणसे सामान्यतः मुळातच थिटी असतात. काही थोडीफार मोठी असतात पण वयपरत्वे छोटी व्हायला लागतात आणि म्हातारपण म्हणजे चांगुलपणाचा ऱ्हास असे अनेकांच्या बाबतीत आपल्याला दिसतें. काही माणसे अशी असतात की ती ह्या वृद्धत्वावर विजय मिळवतात. त्यांच्यामध्ये असाधारण गुण एकाच वेळी एकत्र नांदतात. त्या गुणांचा परमोच्च त्यांच्या व्यक्तिमत्त्वात पोहोचलेला दिसतो. हे सारे सावरकर नावाच्या व्यक्तिमत्त्वात प्रकर्षाने होते म्हणून ते मोठे ठरतात.

असे जर होते तर मग सावरकर आयुष्यात अपयशी का झाले ? अनेकांनी अनेक प्रकारे या अपयशाची मीमांसा केली आहे. एक कारण असे की सावरकर मुळात एकांतप्रिय होते. जोडीला सुमारे बारा वर्षे एकलकोंडीत त्यांना काढावी लागली त्याचाही त्यांच्या आयुष्यावर अधिक परिणाम झाला होता. जेलमध्ये तारुण्याचा फार मोठा काळ घालवावा लागणे म्हणजे काय हे फार थोड्या लोकांना समजते. तुरुंगात जाण्यापूर्वी माणूस जसा असतो तसा तो तुरुंगातून परत आल्यानंतर राहू शकत नाही. दुसरे असे की, सावरकर मुळात जरी अत्यंत आशावादी असले तरी संपूर्ण आयुष्यभर प्रतिकूलतेनेच त्यांची साथ केल्यामुळे त्यांना वैफल्य आले असावे. ‘प्रतिकूल तेच घडेल’ असा सावरकरांना नियतीने जणू शापच दिला होता. त्यांचा आशावाद हा उपजत होता तर निराशावाद हा त्यांनी स्वतःला आलेल्या कटू अनुभवातून स्वीकारलेला होता. सावरकरांना अनेक बाजूंनी कोमेजून टाकले होते. त्यामुळेही कदाचित सावरकर थोडे तुसडे झाले असावेत. व्यावहारिक जीवनात असे होऊन चालत नाही. राजकारणात यशस्वी होण्यासाठी माणसे जोडावी लागतात, सर्वांना बरोबर घेऊन जावे लागते. सावरकरांच्या बाबतीत तसे झाले नाही. मूळचा एकांतप्रिय स्वभाव, तुरुंगातील अनुभवाने कोमेजून टाकलेले व्यक्तिमत्त्व या सर्वांचा परिणाम म्हणजे राजकारणात यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेलें वेगळेच व्यक्तिमत्व सावरकर उभे करू शकले नाहीत.

सावरकरांच्या अपयशाचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे राजकारणात त्यांचा प्रवेश होण्यास झालेला विलंब. १९२० ते १९३७ याकाळात गांधीजींनी भारताचे राजकारण सर्व बाजूंनी वेढले होते. अशावेळी सावरकरांचा राजकारणात प्रवेश झाला. म्हणजे त्यांचा राजकारणात फारच उशीरा प्रवेश झाला. एखादा सायकलस्वार वाऱ्याच्या उलटया दिशेने सायकल चालवीत असला आणि त्याचवेळी जोराचा वारा वाहू लागला तर सायकलस्वाराची जी स्थिती होईल तीच भारतीय राजकारणांत सावरकरांची झाली. स्वतःच्या तर्कनिष्ठेमुळे सावरकरांनी गांधीजींशी तडजोड केली नाही. परिणामी त्यांच्या वाटयाला अपयश आले.

लौकिक अर्थानें जरी सावरकर यशस्वी होऊ शकले नसले तरी लौकिक यश म्हणजे काही सर्वस्व नसतें. लौकिक यशापलिकडे असेही काही यश असते व ते सावरकरांना मिळाले ही गोष्ट निःसंशय खरी आहे. पुण्यात अमृतमहोत्सवानिमित्त झालेल्या सत्कार समारंभात सावरकरांनी कृतार्थतेचे उद्‌गार काढले आहेत. त्या सभेत सावरकर म्हणाले, 'अखंड नसला तरी तीनचतुर्थांश देश स्वतंत्र झालेला मला पहायला मिळाला हे कोणतेंही लौकिक पद मिळण्यापेक्षा महत्त्वाचे नाही काय ?' त्यांनी जे जे विचार मांडले, जी भविष्यवाणी सांगितली, जे जे आग्रह धरले ते सर्व रास्त आणि सत्य ठरल्याचे त्यांना 'याचि देही याचि डोळा' पहावयास मिळाले हे सावरकरांचे यश नव्हे काय ?

कविवर्य ग. दि. माडगूळकरांच्या शब्दात समारोपादाखल म्हणावेसे वाटतें की,

'आकाशाहुनि विशाल भासे ज्याचे व्यक्तित्व
कर्पुरतेसम जाळी अपुले अवघे कर्तृत्व
चिरंजीव हा हौतात्म्याचा विजयी अभिमान
इतिहासाविण कुणी करावा याचा सन्मान ?'

# सावरकरांचे क्रांतिकार्य

**वि. श्री. जोशी**

वीर सावरकर हे जीवनातील अनेक क्षेत्रात क्रांतिकारक होते. धर्मकल्पना, समाजकारण, वाङ्मय, काव्यरचना यासारख्या अनेक क्षेत्रात त्यांनी आपली क्रांतिकारक विचारप्रणाली प्रसृत केली. परंतु आज मी त्यांच्या राजकीय क्षेत्रातील क्रांतिकार्याचा प्रामुख्याने विचार करणार आहे.

सावरकरांचे घराणे ऐतिहासिक काळात त्यांच्या पूर्वजांनी राजकीय घडामोडीत महत्त्वाचा भाग घेतल्याने प्रसिद्ध होते. सावरकरांच्या पूर्वजांनी केलेल्या कामगिरीमुळेच त्यांना भगूरजवळ दारणा नदीच्या पलिकडे राहुरी हे गाव इनाम मिळाले होते. भगूरला त्यांची दोन घरे होती. त्याकाळी त्यांची परिस्थिती संपन्नतेची होती.

सावरकरांचा जन्म भगूरला २८ मे १८८३ ला झाला. त्यावेळी काय परिस्थिती होती ? सावरकरांच्या जन्मापूर्वी काही दिवसच अगोदर आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके काळ्या पाण्याची भयानक शिक्षा सोसत असतांना दिवंगत झाले होते. राजकीय जागृतावस्थेच्या दृष्टीने या देशात फार मोठी पोकळी निर्माण झाली होती. अशा अस्वस्थ परिस्थितीत संपूर्ण स्वातंत्र्य हेच आपले ध्येय, असे सावरकरांनी मनोमन ठरविले. या गोष्टीला फार महत्त्व आहे. अशा पुरुषांनाच 'पुरस्सर' किंवा 'पायोनियर' असे म्हणतात.

सावरकरांचे पाचवीपर्यंतचे शिक्षण भगूरलाच झाले. बालपणापासूनच घरात आणि गावात येणारी 'केसरी', 'गुराखी', 'जगद्हितेच्छु' ही वृत्तपत्रे ते वाचून काढीत. 'हरिविजय', 'पांडवप्रताप', 'पेशव्यांची बखर', 'निबंधमाला' यासारखी पुस्तके त्यांच्या वाचनात आली. पुढील शिक्षणासाठी सावरकर नासिकला गेले.

नासिकला खरे वकील यांचे 'नाशिकवैभव' आणि नाटककार अनंत वामन बर्वे यांचे 'लोकसेवा' ही वृत्तपत्रे होती. पण राजकीय जागृती फार नव्हती. याच काळात सावरकरांच्या जीवनाला कलाटणी देणारी एक घटना

वडली. प्लेगच्या साथीतील गोऱ्या सोजिरांच्या अत्याचारांचा प्रतिशोध म्हणून पुण्यात क्रांतिकारक चाफेकरांनी प्लेग समितीचा प्रमुख रॅन्ड याला २२ जून १८९७ ला गोळ्या घालून मारलें. त्यानंतर पुढे चाफेकर निर्भयपणे फाशी गेले. आपली मातृभूमी पारतंत्र्यात आहे आणि तिला स्वतंत्र करण्या-साठीच चाफेकर फाशी गेलें या विचाराने सावरकर हळहळले. त्या दिवशी त्यांच्या मनात असे विचार आले की स्वदेशाच्या छळाचा प्रतिशोध घेण्यासाठी चाफेकर फाशी गेले. त्यांच्या प्राणज्योतीने चेतविलेली शत्रुंजय वृत्ती यज्ञकुंडात समिधेमागून समिधा टाकून प्रज्वलीत ठेवणे आवश्यक असेल तर त्याचे दायित्व आपल्यावरही आहे. चाफेकरांचें अपुरे राहिलेले कार्य आपणच कां करू नये ? या प्रक्षुब्ध मनःस्थितीत ते आपल्या घरातील अष्टभुजा देवीपुढे जाऊन बसलें आणि त्यांनी प्रतिज्ञा केली की 'देशाचे स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठी सशस्त्र क्रांतीचा केतू उभारून मारिता मारिता मरेतो झुंजेन.' सावरकरांच्या क्रांतीच्या तत्वज्ञानात स्वातंत्र्यासाठी मरायला आणि मारायला प्रत्येकानें सिद्ध असले पाहिजे हाच ध्वनी आहे. तारुण्याच्या प्रारंभापासून अगदी मृत्यूपर्यंत ते आणि मृत्यू समोरासमोर नव्हतें असे कधी झाले नाही.

यानंतर देशद्रोही द्रवीड बंधूंना धाकट्या चाफेकरांनी आणि रानड्यांनी गोळ्या घातल्या आणि नंतर तेही फाशी गेले. त्यारात्री सावरकरांनी चाफेकरांवर पोवाडा रचला. या प्रसंगाने त्यांच्या कवित्वाला चांगला वाव मिळाला. हा पोवाडा त्यावेळी प्रसिद्ध झाला नाही, म्हणूनच तो जप्त झाला नाही. नाशिकलाच त्यांची म्हसकर आणि पागे यांच्याशी गाठ पडली. तें दोघे बाबाराव सावरकरांचे मित्र. ते 'एम्पी' या नावाने पुण्याच्या काळ साप्ताहिकात लेख लिहीत. तें राष्ट्रीय वृत्तीचे होते. त्या तिघात राष्ट्रभक्तीची चर्चा होत असे. नोव्हेंबर १८९९ मध्ये 'राष्ट्रभक्त समूह' या नांवाची गुप्तसंस्था या तिघांनी काढली. सावरकरांच्या 'अभिनव भारताचा' हाच उगम होय. या संस्थेचा 'रामहरी' हा परवलीचा शब्द ठरला.

या गुप्त संस्थेला सदस्य मिळावेत यासाठी एक प्रकट कार्यक्रम करणारी संस्था हवी म्हणून १९०० मधील वर्ष प्रतिपदेला 'मित्रमेळा' ही संस्था सावरकरांनी स्थापन केली. मित्रमेळा संस्थेच्या वतीने शिवजयंती, गणेशोत्सव यासारखे राष्ट्रीय अुत्सव नासिकला होऊ लागले.

म्हसकर आणि पागे हें धिम्या वृत्तीचे होते. सावरकर त्या मर्यादेत थांबतील असे त्यांना वाटेना. एक प्रसंग सांगतो. २२ जानेवारी १९०१ ला राणी व्हिक्टोरिया मरण पावली तेव्हा तिच्या मृत्यूविषयी दुःखप्रदर्शन आणि नव्या बादशहाला सहानुभूती प्रकट करावी, असें म्हसकर म्हणाले. त्यावर सावरकर म्हणाले, 'इंग्रजांची राणी म्हणजे आपली राणी नाही, आपल्या शत्रूची. अशा प्रसंगी राजनिष्ठा व्यक्त करणे म्हणजे राजनिष्ठा नव्हे तर ती गुलामगिरीची गीता आहे.' पुढे काही दिवसांनी सावरकर त्र्यंबकेश्वरला गेले. तेथे एडवर्ड बादशहाला शुभ चिंतण्याचा सोहळा सरकारधार्जिणे लोक करीत होते. त्या रात्री गावातल्या भिंतीवर सावरकरांच्या प्रेरणेने हस्तलिखित पत्रके लागली, "तुमची राष्ट्रमाता ज्याने बटिक केली त्या राजाचा उत्सव म्हणजेच तुमची स्वतंत्रता ज्या दिवशी मेली त्या दुर्दिनाचा वाढदिवस." तेंथील एक वकील सभेत म्हणाले, "एडवर्ड बादशहा हे खरोखरच आपले बाप आहेत." तेव्हा भिंतीवर पुन्हा पत्रके लागली, "एडवर्ड बादशहा हे आपले बाप आहेत तर मग आपले वडील आपल्या मातुश्रींचे कोण ?" या पत्रकामुळे गांवभर खळबळ उडाली. परकीय सरकारविरुद्ध सावरकरांच्या वृत्तीचा आणि कृतीचा हा पहिला प्रकट आविष्कार होता.

सावरकर नासिकला तिळभांडेश्वराच्या गल्लीत दातारांच्या वाड्यात राहत. विश्वामित्रांच्या वाड्यात गोविंद दरेकर राहायला आल्यावर त्यांचा सावरकरांशी परिचय झाला. तमाशासाठी पदे लिहिणाऱ्या दरेकरांचा सावरकरांशी परिचय होताच, सावरकरांनी त्यांना कवितांची वृत्ते, अलंकार, शब्दसंपत्ती यांची माहिती मुक्तपणे दिली. त्यांच्या तत्वज्ञानाने कवी गोविंदांच्या वृत्तीत पार पालट होऊन गेला. ते स्वातंत्र्य कवी झाले. 'रणाविण स्वातंत्र्य कोणा मिळाले.' ही कविता त्यांचीच आहे.'

१९०२ मध्ये सावरकर पुण्यास फर्ग्युसन महाविद्यालयात गेले. तेथे ते वसतिगृहात राहत. त्या वयातच ते वक्ते आणि कवी म्हणून प्रसिद्धी पावले. 'काळ' मध्ये परांजपे वक्रोक्तीपूर्ण परंतु स्वातंत्र्यप्रेम व्यक्त करणारे ओजस्वी लेख लिहीत. सावरकरांनी ती धाटणी लेखनात उचलली. इटलीचा स्वातंत्र्यसेनानी जोसेफ मॅझिनी याच्या जीवनाचा सावरकरांवर मोठा परिणाम झाला. त्यांनी गुप्तमंडळ्यांवर आणि सशस्त्र उठावणीच्या

पुरस्कारांवर भाषणे दिली. १९०५ मध्ये बंगालच्या फाळणीविरुद्ध तसेच स्वदेशीची व ब्रिटीश मालावरील बहिष्काराची जोरदार चळवळ देशभर झाली. त्यावर्षी दसऱ्याच्या दिवशी विदेशी कपड्यांची प्रचंड होळी करावी असे सावरकरांनी विद्यार्थ्यांच्या एका सभेत घोषित केले. टिळक, परांजपे यांचा या घोषणेला पाठिंबा मिळाला. त्या सायंकाळी गोळा केलेल्या गाडीभर विदेशी कपड्यांची 'बळी' म्हणून शेकडो विद्यार्थ्यांनी मिरवणूक काढली. लकडी पुलापलिकडे त्याची प्रचंड होळी केली. त्या होळीच्या प्रकाशात टिळक, परांजपे आणि सावरकर यांची स्वदेशीच्या पुरस्काराची स्फूर्तीदायक भाषणे झाली.

या आधी काही वर्षे ऑक्सफर्ड विद्यापीठाचे पहिले हिंदी पदवीधर आणि विद्वान बॅरिस्टर शामजी कृष्ण वर्मा हे इंग्लंडात स्थायिक झाले होते. त्यांनी स्वातंत्र्यलढ्याचे रोपटे तेथे लावले. तें टिळकांचे स्नेही होतें. बॅरिस्टर राणा यांनी घोषित केलेली 'शिवाजी शिष्यवृत्ती' मिळवून सावरकर बॅरिस्टरची पदवी मिळविण्यासाठी लंडनला गेले. तेथे शामजींनी राष्ट्रीय वृत्तीच्या हिंदी विद्यार्थ्यांसाठी बांधलेल्या 'इंडिया हाऊस' या वसतीगृहात ते राहू लागले. हिंदुस्थानातून इंग्लंडला उच्च शिक्षणासाठी आलेल्या सर्व तरुण विद्यार्थ्यांना क्रांतिसंस्थेत गोवण्याचा प्रयत्न सावरकरांनी तेथे जाताच सुरू केला.

जोसेफ मॅझिनीच्या आत्मचरित्राचे आणि लेखांचे सहा खंड प्रसिद्ध झाले होते. पारतंत्र्यात असतांना गुप्तमंडळ्या काढून मॅझिनीनें इटलीत स्वातंत्र्याचा लढा उभा केला होता. इटलीच्या तिन्ही बाजूंनी समुद्र व उत्तरेस आल्प्स् पर्वत होता. तेंव्हा तें वर्णन हिंदुस्तानला आणि येथील पारतंत्र्याला हिंदुस्तानचें प्रत्यक्ष नाव न घेता लागू पडणारे होते. 'परमेश्वरानें मनुष्याला स्वातंत्र्यासाठीच जन्माला घातले आहे,' यासारख्या अनेक वचनांनी आणि स्वातंत्र्याच्या जयघोषानें परिपूर्ण असे हे पुस्तक सावरकरांनी पुढील सहा महिन्यात लिहून पूर्ण केले. तें १९०७ मध्ये प्रसिद्ध झाले. त्याला सावरकरांनी सव्वीस पानांची जी प्रस्तावना लिहिली ती तर तरुणांनी अक्षरशः तोंडपाठ केली. ते पुस्तक प्रसिद्ध होताच सरकारने जप्त केले. तरीही गुप्तमार्गाने त्या पुस्तकाचा प्रसार होत राहिला. त्याच्या वाचनाने अनंत कान्हेरे यासारखे शेकडो तरुण क्रांतिकारक बनले.

यानंतर सावरकरांनी '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' हा ग्रंथ इंडिया ऑफिसच्याच ग्रंथालयात शेकडो पुस्तकें व कागदपत्रे वाचून १९०८ मध्ये पूर्ण केला. या ग्रंथातील इंग्रजांविषयीचा तिटकारा आणि देशाच्या स्वातंत्र्याचा जयजयकार हा वाचकाला स्फूर्ती देणारा होता. भगतसिंगा-सारख्यांनी त्यातील कित्येक परिच्छेद पाठ केले होतें. हा ग्रंथ प्रसिद्धीपूर्वीच जप्त झाला तरी जिवंत राहिला. नेताजी सुभाषचंद्रांनी तर आझाद हिंद सेनेचा तो धर्मग्रंथच ठरविला.

त्यावेळी इंग्लंडमध्ये पिस्तुले स्वैरपणे विकत मिळत. सावरकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या शस्त्राची विद्या हस्तगत केली. पिस्तुलाहून अधिक विध्वंसक असें शस्त्र म्हणजे बॉंब. हे बॉंब कसे बनवायचें याची विद्या हेमचंद्र दास व सेनापती बापट यांच्याकरवी त्यांनी हस्तगत केली. पुढे फेब्रुवारी १९०९ मध्ये गुप्त मार्गाने सावरकरांनी वीस ब्राउनिंग पिस्तुले मुंबईला पाठविली.

सावरकरांच्या वर्तुळात मोठमोठे पराक्रमी तरुण होते. त्यातच मदनलाल धिंग्रा होते. १० मे १९०८ ला ब्रिटिशांनी १८५७ च्या युद्धातील आपल्या विजयाचा पन्नासावा वर्धापन दिन साजरा करण्याचे ठरविले. तेव्हा तोंडीस तोड म्हणून सावरकरांनी इंडिया हाऊसमध्ये हा दिवस मोठ्या प्रमाणावर साजरा केला.

मदनलाल अतिशय पराक्रमी पण रंगेल होते. एकदा मदनलाल असेच नाचगाण्यात दंग होते. त्यामुळे त्याच वेळी दुसऱ्या खोलीत चालू असलेल्या सावरकरांच्या भाषणात व्यत्यय येऊ लागला. तेव्हा सावरकर धिंग्रांना म्हणाले, 'तू म्हणतोस भाषणात तुला रस नाही, पण इतरांच्या भाषणात तू व्यत्यय कां आणतोस ?' मदनलाल लज्जित होऊन निघून गेले. तीन-चार दिवसांनी परत आलेले मदनलाल वेगळ्याच मनःस्थितीत होते. त्यांनी सावरकरांना विचारले, 'Has time for martyrdom come?' (हौतात्म्याची वेळी आली आहे काय ?) सावरकरांनी उत्तर दिले, 'एखादा हुतात्मा तसा सिद्धच असेल तर ती वेळ आली असलीच पाहिजे.' त्यावेळेपासून धिंग्रा त्या दिशेने पावले टाकू लागले. ८ जून १९०९ ला बाबाराव सावरकरांना नासिक येथे जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली.

मदनलाल व सावरकर त्या बातमीनें प्रक्षुब्ध झाले. बंगालची फाळणी करणाऱ्या लॉर्ड कर्झनला त्याच दिवशी एका सभेत प्रतिशोध म्हणून उडविण्यास मदनलाल गेले. पण त्यांना तिथे पोचण्यास वेळ झाला आणि तो प्रयत्न असफल झाला. मग १ जुलै १९०९ ला भारत मंत्र्यांचा सहाय्यक सर कर्झन वायली याला एका समारंभात गाठून धिंग्रांनी गोळ्या घालून ठार केले. हिंदुस्तानातील फाशीच्या आणि जन्मठेपेच्या शिक्षांचा प्रतिशोध म्हणून मी हे कृत्य केंले असें त्यांनी न्यायालयात उघड उघड सांगितले. त्यासाठी फाशीची शिक्षा झाली तेव्हा १७ ऑगस्ट १९०९ ला पेंटेनव्हिले तुरुंगात तें धैर्याने फाशी गेले. त्यांचें तेजस्वी वक्तव्य सावरकरांनीच लिहून दिलें होते. ते पोलिसांनी दाबलें. पण दुसऱ्याच दिवशी डेली न्यूज पत्रांत हे वक्तव्य प्रसिद्ध करण्याची सावरकरांनी व्यवस्था केली होती. ते प्रसिद्ध होताच ब्रिटिश सरकारला हादराच बसला.

थोड्याच दिवसात सावरकरांना बाबांचे अपील फेटाळले गेले, घरची सारी चीजवस्तू जप्त झाली, असे दुर्दशेचे वृत्त वहिनींनी कळविले. त्याला उत्तर म्हणून सावरकरांनी 'सांत्वन' ही कविता त्यांना लिहिली. २१ डिसेंबरला नासिकच्या दडपशाहीचा प्रतिशोध म्हणून कलेक्टर जॅक्सनला नासिकचे अनंत कान्हेरे यांनी ठार मारले. त्यांचे पिस्तुल सावरकरांनी गुप्त मार्गानें धाडलेल्या पिस्तुलांपैकी एक होते. या प्रकरणाच्या चौकशीत नासिक कटाचा सुगावा लागून पोलिसांनी चाळीसपन्नास तरूणांना ठिकठिकाणी अटक केंली. सावरकरांना अटक करण्याचे आज्ञापत्र लंडनला धाडले. पण त्यावेळी ते पॅरिसला निघून गेलें होते.

जॅक्सन वधाचा अभियोग उभा राहिला. त्यातील आपल्या सहकाऱ्यांच्या छळाचे वृत्त त्यांना कळले तेंव्हा स्वतः मात्र सुखरूप पॅरिसला रहाणे सावरकरांना प्रशस्त वाटेना. इतर सर्वजण जाऊ नका असे निक्षून सांगत असतांनाच १३ मार्च १९१० ला सावरकर लंडनला परतले. त्यांना लंडनला व्हिक्टोरिया स्थानकावरच अटक करण्यात आली. एक जुलै पर्यंत या अटके-विरुद्ध त्यांच्या सहकाऱ्यांनी न्यायालयात असफल लढा दिला. १ जुलै १९१० ला 'मोरिया' बोटीने त्यांना हिंदुस्थानकडे धाडण्यात आलें. सात जुलैला सकाळी बोट मार्सेलिसला आली. लंडनला असतानाच सावरकरांनी पॅरिसला मॅडम कामा, अय्यर या आपल्या सहकाऱ्यांना सांकेतिक शब्दात आपण मार्सेलिसला

बोटीवरून निसटून जाण्याचा प्रयत्न करू असा निरोप पाठविला. आठ जुलैला सकाळी 'आत्ताच किंवा परत केंव्हाही नाही' (NOW OR NEVER) अशी वेळ आल्याचे त्यांना स्पष्ट दिसले. पहाऱ्यावर असलेल्या पोलिसांच्या हातावर तुरी देऊन सावरकर शौचकुपाच्या मॅनहोलमधून निसटून गेले. धक्क्यापर्यंतचे अंतर पोहून गेल्यानंतर ते फ्रान्सच्या किनाऱ्यावर पळू लागले. आंतरराष्ट्रीय कायद्याच्या आधारे आपल्याला अटक होऊ शकणार नाही असे त्यांना वाटले. पण बोटीवरील शिपायांनी पाठलाग करून सावरकरांना पकडले आणि कडेकोट बंदोबस्तात मुंबईला आणले.

मुंबईच्या उच्च न्यायालयात सावरकरांसह अडतीस जणांवर नासिक कटाचा अभियोग करण्यात येऊन सावरकरांना त्यांत जन्मठेपेची शिक्षा झाली. त्यानंतर जॅक्सन वधाला सहाय्य करण्याच्या आरोपावरून आणखी एक अभियोग सरकारने त्यांच्यावर भरला आणि त्यात २४ डिसेंबर १९१० साली सावरकरांना आणखी एका जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली. पण या पन्नास वर्षांच्या शिक्षेनेही सावरकर हादरले नाहीत. ठाण्याच्या तुरूंगात त्यांना एका दुष्ट अधिकाऱ्याने म्हटले, 'हरकत नाही, पन्नास वर्षांनी तरी तुम्ही सुटालच की.' तेव्हा तें त्याला म्हणाले, 'अरे इंग्रजांचे राज्य तरी इथे पन्नास वर्षे राहणार आहे का?' अशा दुर्दम्य आशावादाने त्यांनी तो तुरूंगवास भोगण्यास प्रारंभ केला.

अंदमानात सावरकरांना बैलाप्रमाणे कोलूला जुंपून ३० पौंड तेल गाळण्याची किंवा नारळाचा छिलका काढून दोर वळण्याचे छाती फोडणारे आणि हात रक्तबंबाळ करणारे काम देण्यात आले होते. पण तें काम करून त्या हाल अपेष्टा पचवून अन्यायाविरूद्ध तें तेथेही लढत राहिले. 'माझी जन्मठेप' या ग्रंथात सावरकरांनी अंदमानात त्यांना आलेल्या अनुभवांचें हृदयद्रावक वर्णन केले आहे. पुढे १९२१ साली त्यांना हिंदुस्तानात आणण्यात आले. १९२४ साली त्यांची सशर्त सुटका झाली. १९३७ अखेर रत्नागिरीला काही अटींवर त्यांना स्थानबद्ध करून ठेवण्यात आले होते. सारांश, 'क्रांतिकारक' हे सावरकरांच्या जीवनातील एक महत्त्वपूर्ण पर्व १९२४ अखेर बरेचसे संपलेलें दिसते.

★★★

# समाजसुधारक सावरकर

**प्रा. डॉ. अशोक मोडक**

स्वातंत्र्यवीर सावरकर, यांचे सामाजिक सुधारणांच्या क्षेत्रांतील कार्य सर्वांनी मान्य केले आहे. प्रा. अ. भि. शाह यांच्यासारखे रॉयवादी विचारवंत आणि हमीद दलवाईसारखे मुस्लिम सत्यशोधक सावरकरांना थेट राजा राममोहन रॉय यांच्या पंक्तीत बसवतात व भारताच्या सामाजिक प्रबोधनात सावरकरांचे स्थान बहुमानाचे आहे याची कबुली देतात. कॉम्रेड प्रभाकर वैद्य उजव्या कम्युनिस्ट पक्षाचे सक्रीय कार्यकर्ते आहेत. त्यांनी जोतिराव फुले यांच्या कार्याचा आढावा घेणारे पुस्तक लिहिले आहे. या पुस्तकांत कॉम्रेड वैद्यांनी सावरकरांच्या जहाल सामाजिक विचारांचा गौरव केला आहे. थोर विचारवंत प्रा. नरहर कुरुंदकर यांनीही "महाडचा मुक्तिसंग्राम" या पुस्तकाला प्रस्तावना लिहिली असून या प्रस्तावनेत सावरकरांच्या सामाजिक विचारसरणीची प्रशंसा केली आहे. उपरोल्लेखित चारही विचारवंत सावरकरांच्या हिंदुराष्ट्रवादाचे टीकाकार आहेत. पण यांपैकी कोणालाही सावरकरांच्या सामाजिक सुधारणांबावतच्या विचारावर आणि व्यवहारावर आक्षेप घ्यावासा वाटत नाही; उलटपक्षी सावरकरांच्या या विचारांचे आणि व्यवहारांचे मनमोकळे कौतुक करावेसे वाटले ही गोष्ट उल्लेखनीय म्हटली पाहिजे.

भारताच्या इतिहासांत एकोणिसाव्या शतकांतील उत्तरार्ध मौलिक घटनांनी नटलेला आहे. अर्थात या घटना सामाजिक सुधारणांच्या दृष्टीने मौलिक आहेत. जोतिराव फुले, लोकहितवादी, राजा राममोहन रॉय, दयानंद सरस्वती, केशवचंद्र सेन, न्यायमूर्ती रानडे, आगरकर, गोखले आदी महापुरुषांनी या काळांत सामाजिक सुधारणा व्हाव्यात या हेतूने जे विचार व्यक्तविले आणि जे व्यवहार केले ते नेहमीसाठीच प्रेरक ठरले आहेत. आपल्या समाजात अनेक अनिष्ट रूढी शिरल्या आहेत व या रूढींमुळेच आपला समाज विकलांग होऊन परतंत्र झाला आहे, याबद्दल या सर्व समाज-सुधारकांचे एकमत होतें. म्हणूनच पारतंत्र्य दूर करण्यासाठी या अशा रूढी संपुष्टांत आणल्या पाहिजेत हाही या मंडळींचा निष्कर्ष होता. अर्थात

जोतिराव फुले व इतर काही समाजसुधारक पारतंत्र्य घालविण्यास प्राधान्य देत नव्हते; प्रसंगी ब्रिटिश राजवटीला वरदान समजत होतें हा तपशील तूर्त बाजूला ठेवला पाहिजे. या सर्व माणसांनी सामाजिक सुधारणांच्या क्षेत्रात केलेली कामगिरी अजोड आहे हे विधान मात्र सर्वमान्य आहे. या सर्वांनी केलेल्या कामगिरीमुळेच हिंदू समाज युरोपीय इतिहासांतील प्रबोधन पर्वाचा जणू प्रत्यय घेऊ शकला हेही विधान सर्वमान्य आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी हे प्रबोधन पर्व मजबूत केले.

स्वत: सावरकरांना या सर्वांविषयी कमालीचा आदर आहे. सन १९५२ मधे अभिनव भारताच्या सांगता समारंभाच्या निमित्ताने क्रांतिकारकांच्या चित्रांचे प्रदर्शन योजिलें होते. या प्रदर्शनात जोतिराव फुल्यांचे चित्र प्रथम क्रमांकावर होतें, कारण त्यांनी आपल्या पूर्वायुष्यांत वासुदेव बळवंतांना सहाय्य केलें होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन करतांना सावरकरांनी जोतिबा फुल्यांच्या या क्रांतिकार्याची ओळख करून दिली व जोतिरावांच्या सामाजिक क्रांतिकारकत्वाचाही मुद्दाम गौरव केला. लोकमान्य टिळक हे सामाजिक सुधारणांचें विरोधक होते असा अपसमज मुद्दाम पसरविला जातो. सावरकरांच्या काळांत सनातनी बुजुर्ग, लोकमान्यांच्या लिखाणांतून सोयीस्कर, उतारे काढून आपले युक्तिवाद सिद्ध करीत असत. या अशा उपद्व्यापांना प्रत्युत्तरे देतांना वीर सावरकर लोकमान्य टिळकांनाही सामाजिक सुधारणा हव्या होत्या, असा दावा करीत असत व त्याच्या पुष्टचर्थ योग्य ते उतारे व व योग्य त्या घटनाही उद्धृत करीत असत. सामाजिक सुधारणेत रुचि बाळगणाऱ्यांनी आगरकर, गोखले, रानडे या महापुरुषांचे ऋण मानले पाहिजे हीच सावरकरांची श्रद्धा होती. सारांश, आपल्यापूर्वी होऊन गेलेलें सुधारक कुठे व कसे कमी पडले हे छिद्रान्वेषी बुद्धीने बघावे आणि लपून छपून आपलेच कार्य किती श्रेष्ठ आहें याचा डंका पिटावा ही रीत सावरकरांना कधीही मान्य नव्हती. अर्थात् स्वातंत्र्यासाठी जे जे प्रयत्न झालें त्यात तात्या टोपे, मंगल पांडें यांच्यापासून ते घरातल्या घरात गुपचूप अभिषेक करणाऱ्या व त्या मार्गाने स्वातंत्र्ययज्ञात नगण्य आहुती टाकणाऱ्या जनसामान्यापर्यंत सर्वांचे उपकार आपण मानले पाहिजेत हीच वीर सावरकरांची शिकवण होती. सामाजिक सुधारणेच्या क्षेत्रातही लहानमोठे प्रयत्न करणारे सर्वजण त्यांना वंदनीय वाटत असत. या अशा पूर्वसुरींकडून जणू त्यांनी एकेक गुण उचलला

म्हणून आपण म्हणू शकतो की सावरकरांजवळ जोतीराव फुल्यांची बंडखोरी होती, आगरकरांचा बुद्धिवाद होता, तर रानडे-गोखल्यांची सहृदय वृत्ती होती.

स्वातंत्र्यवीर सावरकर हिंदुराष्ट्राचें आग्रही समर्थक आहेत व हा त्यांचा पैलू सामाजिक सुधारणांच्या संदर्भात देखील ठळकपणे डोळ्यात भरतो. ज्या काळांत सावरकर वावरत होते त्या काळांत हिंदुत्वाचा आग्रह प्रतिगामित्वाचा सूचक ठरू पाहात होता. हिंदू धर्म म्हणजे वेडगळ समजुतींचे भांडार आहे. हिंदू धर्म म्हणजे परलोकाकडे नजर लावून ऐहिकाकडे दुर्लक्ष करणाऱ्या मंडळींचा धर्म आहे. या धर्मात उच्च तत्त्वज्ञान असेल, पण व्यवहार मात्र क्षुद्र व नादान आहे. या धर्माचे अभिमानी जुन्यापुराण्या जगांत रमतात व आधुनिक विज्ञानाशी वैर करतात अशा कित्येक समजुती रूढ होऊ पाहात होत्या. इंग्रजांना हाकलून स्वातंत्र्य मिळविण्यासाठी मुसलमानांशी एकी केली पाहिजे व म्हणूनही हिंदुत्वाचा अभिमान अडथळे उत्पन्न करणारा आहे अशी भूमिका राजकारणी पुढाऱ्यांमध्ये मूळ धरत होती. सारांश, सामाजिक व राजकीय अशा दोन्ही क्षेत्रांत हिंदू विचार त्याज्य ठरू पाहात होता. उलटपक्षी आर्थिक क्षेत्रातले वर्गसंघर्ष उत्साहाने पेटवत ठेवले तर सामाजिक रूढी दूर होतील हा समज कम्युनिस्ट मंडळीमधे लोकप्रिय होता, तर हिंदुत्वाऐवजी विश्वव्यापक मानवताच सर्वांना शिकविली पाहिजे म्हणजे सामाजिक रूढी संपुष्टांत येतील या विचाराने कम्युनिस्टेतर माणसे भारावलेली होती. स्वातंत्र्यवीर सावरकरांना आपल्या समाजात कैक दुष्ट रूढी शिरल्या आहेत हें मान्य होते पण या रूढी घालविण्यासाठी हिंदुत्वाचा अभिमान जागविणे ही मात्रा गुणकारी ठरेल असा विश्वास वाटत होता. म्हणजे हिंदू समाजाला कलंक ठरलेल्या कित्येक रूढी हिंदुत्वाच्या अभिमानातूनच घालविता येतील ही त्यांची श्रद्धा होती. हिंदू शब्दाचा त्याग करण्याऐवजी या शब्दाला बदनाम करणाऱ्या चालीरीतींविरुद्ध संगर मांडावा व जणू काही शुद्ध हिंदुत्वाचा साक्षात्कार घडविण्याचे महनीय दायित्व नियतीने आपल्यावर सोपविले आहे या श्रद्धेपोटी हिंदुराष्ट्राचा सर्वशक्तीनिशी पुरस्कार करावा हा सावरकरांचा विचार दिसतो. आपण हिंदू माणसे आपल्याच रक्ताच्या महारमांगाला घरांत घेत नाही, हा महारमांग बाटला व मुसलमान अथवा खिश्चन होऊन आपल्या घरात आला तर मात्र त्याचे कौतुकाने स्वागत

करतो व यामुळे आपण हिंदूंची संख्या घटवितो ही सावरकरांची व्यथा आहे. समुद्रपर्यटन करणे म्हणजे धर्म बुडविणे अशा अजागळ समजुतीपोटी आपण आपल्याच भावाला मुस्लिम धर्माचा स्वीकार करू दिला हे मंगलोरच्या किनाऱ्यावरचे ऐतिहासिक उदाहरण प्रस्तुत करून सावरकर, सिंधुबंदीची शृंखला तोडून टाकण्याचा आग्रह धरतात. जातिभेद, प्रांतभेद अशा कित्येक भेदांमुळे आपण हजारो वर्षे मोगलांचे गुलाम राहिलो याची सावरकरांना तीव्र खंत वाटते म्हणूनच अंदमानच्या तुरुंगात त्यांनी शुद्धीकरणासाठी प्रयास केले. सारांश, सावरकरांच्या सामाजिक सुधारणांचें अधिष्ठान म्हणजे हिंदु राष्ट्राचा अभिमान हे समीकरण ध्यानांत ठेवले पाहिजे. एका लेखांत ते स्वतःची तुलना साक्षात् भगवान श्रीकृष्णाशी करीत आहेत. पार्थसारथी श्रीकृष्णाने अर्जुनाची निर्भत्सना केली. 'कुतस्त्वां कश्मलमिदं विषमे समुपस्थितं । अनार्यजुष्टमस्वर्ग्यमकीर्तिकरमर्जुन ।" या शब्दांत अर्जुनाला छेडले. पण अशी हेटाळणी व निर्भत्सना करताना भगवान श्रीकृष्णाच्या मनात अर्जुनानें पौरुष प्रकट करावे व शत्रूवर तुटून पडावे हीच एकमेव भावना होती. सावरकर जणू काही सांगत आहेत की हिंदू समाजावर टीका करताना हा समाज पराक्रमी आणि वैभवसंपन्न व्हावा हीच आपली इच्छा आहे.

स्वातंत्र्यवीरांच्या सामाजिक सुधारणांचा हिंदुराष्ट्राविषयीची भक्ती हा पैलू जर पहिला विशेष असेल तर क्रान्तिकारकता हा दुसरा विशेष आहे. क्रान्तिकारक माणूस अभिनिवेशासाठी प्रसिद्ध असतो, उत्कटता, हट्टीपणा, भांडखोर वृत्ती आदी लक्षणांसाठीही विख्यात असतो. आश्चर्य वाटतें ते या गोष्टीचे की स्वातंत्र्य लढ्यात या सर्व लक्षणांमुळे व सशस्त्र प्रयत्नांच्या आग्रहामुळे सच्चे क्रांतिकारक ठरलेले वीर सावरकर, सामाजिक सुधारणांच्या लढ्यांतही क्रांतिकारक आहेत. वयाची विशी उलटण्यापूर्वीच म्हणजे सन १९०२ मध्ये त्यांनी विधवा स्त्रीच्या दुःखाला वाचा फोडणारी कविता लिहिली होती. हिंदुत्वाचा अभिमान, क्रांतिकारकत्व आणि सामाजिक सुधारणांचा आग्रह हें तीन पैलू सावरकरांच्या जीवनाचे वैशिष्ट्यपूर्ण गुणविशेष मानले जातात. वस्तुस्थिती अशी आहे की हे तिन्ही पैलू पूर्णतः अविभाज्य आहेत. प्रभाकर वैद्यांसारखे काही विचारवंत सन १८८३ ते १९२४ या काळांत सावरकर क्रांतिकारक होतें, तर सन १९२४ तें १९३७

या काळांत सावरकर समाजसुधारक होतें आणि त्यापुढच्या काळांत मात्र सावरकर हे केवळ हिंदुराष्ट्रवादी होते असा दावा करतात. वरच्या ओळीत उल्लेखिल्याप्रमाणे सन १९०२ मध्येही सावरकर समाजसुधारक होते हे स्पष्टपणे दिसते. देश स्वतंत्र झाल्यावर घटनासमितीची नेमणूक झाली व या समितीने तयार केलेली घटना प्रसिद्ध झाल्यावर म्हणजे सन १९५० मध्ये वा त्या सुमारास सावरकरांनी मुंबईला ब्राह्मणसभेत जे भाषण केले ते या संदर्भात आठवले पाहिजे. वीर सावरकरांनी कायद्याने अस्पृश्यता घालविण्यात आली या गोष्टीचे तोंड भरून स्वागत केले व एका उपमेच्या मदतीने राखीव जागांच्या तत्वाचे देखील जोरदार समर्थन केले. कुणी एखादा दांडगा गुंड मरण पावला तर त्याच्या मृत्युनंतर दहा दिवस तरी काही विधी वगैरे करावेत, असें म्हणे रूढी सांगते, अन्यथा हा मेलेला गुंड सैतान वा समंध बनतो. तद्वतच अस्पृश्यतेचा समंध पुनः जागा होऊ नये, म्हणून घटना स्वीकारानंतर किमान दहा वर्षे तरी आरक्षणाचे विधी केले पाहिजेत ही सावरकरांची शिफारस होती. केवळ कायदे करून भागत नाही, या कायद्यांच्या प्रामाणिक अंमलबजावणीसाठी अनुरुप लोकव्यवहार आवश्यक असतो हाही सल्ला सावरकरांनी आपल्या भाषणात दिला होता. म्हणजे सन १९३७ नंतरही सावरकर समाजसुधारक होते हें लक्षात ठेवले पाहिजे. तात्पर्य, हिंदुराष्ट्राच्या सर्वांगीण उत्कर्षासाठी क्रान्तिकारक स्वरुपाच्या सामाजिक सुधारणा केल्या पाहिजेत ही सावरकरांची शिकवण होती व या अर्थानें त्यांच्या आयुष्याचे तिन्ही पैलू एकमेकांपासून अविभाज्य होते.

आपल्या देशाचे स्वातंत्र्य हे सामाजिक समतेच्या प्रस्थापनेतील एक महत्वाचे पाऊल आहे ही सावरकरांच्या मनाची खूणगांठ होती. म्हणजे सामाजिक सुधारणा आणि राजकीय स्वातंत्र्य ही साधने आहेत तर समता व न्याय यांनी युक्त असलेले वातावरण निर्मिणे हें साध्य आहे याबद्दल सावरकरांच्या मनांत संदेह नव्हता. सन १९०६ मध्ये मॅझिनीच्या लेखांच्या मराठी भाषांतराला त्यांनी प्रस्तावना लिहिली ती या अर्थाने वाचनीय आहे. मॅझिनी या इटालियन देशभक्तानें राष्ट्रीय एकात्मता आणि स्वातंत्र्य या उद्दिष्टांप्रमाणेच सामाजिक समतेच्या उद्दिष्टाचाही ध्यास घेतला होता व म्हणून मॅझिनी हा महापुरुष पूजनीय आहे हे सावरकरांचे वाक्य महत्वपूर्ण आहे. "आज पेशवाई असती तर?" या शीर्षकाच्या एका निबंधात

सावरकरांनी पहिल्या बाजीरावासारखा मुत्सद्दी राजधुरंधर, कोणत्या सामाजिक सुधारणा घडवून आणू शकतो याचे विवेचन केले आहे. बडोद्याचे सयाजीराव गायकवाड आणि कोल्हापूरचे शाहू छत्रपती या दोघांनी आपापल्या संस्थानांतून केलेल्या प्रयासांची प्रशंसाही सावरकरांनी केली आहे.

आपल्या देशांत समाजसुधारणांचा समग्र विचार झाला पाहिजे हे वैशिष्टच आता स्पष्ट केले पाहिजे. सावरकरांच्या पूर्वी स्त्रीशिक्षण, विधवा-विवाह, हरिजनोद्धार, जात्युच्छेदक मंडळ, क्षात्रजगद्गुरुच्या पीठाची स्थापना वगैरे प्रयत्नातून सामाजिक सुधारणांचा जणू अलगअलग, सुटा विचार झाला होता. या सर्व प्रयत्नांना आणि विचारांना एकत्रितपणे पुढे नेलें पाहिजे व म्हणूनच सातही शृंखला तोडल्या पाहिजेत हा सावरकरांचा आग्रह होता. १) वेदोक्तबंदी, २) व्यवसायबंदी, ३) स्पर्शबंदी, ४) सिंधुबंदी, ५) शुद्धी-बंदी, ६) रोटीबंदी आणि ७) बेटीबंदी अशा सातही बेड्या लौकरांत लौकर, तोडल्या पाहिजेत व हिंदू समाज मुक्त झाला पाहिजे यासाठी सावरकर तळमळत होतें.

सावरकरांनी केलेल्या सामाजिक सुधारणेच्या प्रयत्नांना एक विशेष पार्श्वभूमी होती. सन १९२० तें सन १९४० ही दोन दशके समाजसुधारणांच्या संदर्भात खूप महत्वाची मानली पाहिजेत. महात्मा गांधींनी जहाल व मवाळ चळवळींना एका झेंड्याखाली आणण्यात सिद्ध केलेलें कसब, उत्तर भारतात महामना पंडित मालवीयजींनी केलेले प्रयास, दक्षिण भारतात केरळमध्ये नारायण गुरुंनी सार्वजनिक रस्ते सर्वांना मोकळे व्हावेत म्हणून केलेला सत्याग्रह, महाराष्ट्रात डॉक्टर आंबेडकरांच्या नेतृत्वाचा उदय व महाड, नाशिक इत्यादी ठिकाणी झालेले लढे, गोलमेज परिषदेत व नंतर पुणे कराराच्या निमित्ताने महात्मा गांधी आणि डॉक्टर आंबेडकर यांच्यात झालेंले वादविवाद, डॉक्टर आंबेडकरांनी येवला मुक्कामी केलेली धर्मांतराची घोषणा, गाडगे महाराजांनी पशुवधाच्या आणि अस्वच्छता व विषमता यांच्याही विरुद्ध चालविलेले जनजागरण आदी कित्येक घटना सावरकरांच्या सामाजिक सुधारणांना पार्श्वभूमीसारख्या ठरल्या आहेत. काळाची दिशा दाखविणाऱ्या या साऱ्या घटना आहेत. या दिशेकडचा हिंदू समाजाचा प्रवास सुखरुप व्हावा या हेतूनेच जणू सावरकरांनी लेख लिहिले, भाषणे दिली व प्रत्यक्ष कृतीही केल्या.

ब्रिटिश सरकारने सावरकरांवर रत्नागिरी जिल्ह्यातच राहिले पाहिजे अशी बंदी केली होती. जोडीला राजकारणावर बोलायचे वा लिहायचें नाही अशीही बंदी घातली होती. सावरकरांनी या प्रतिबंधांना स्वीकारले व सारी शक्ती–बुद्धी सामाजिक सुधारणांच्या सिद्धीसाठी खर्चिण्याचें ठरवून टाकले. सावरकरांनी महाराष्ट्राच्या कोपऱ्यातून–रत्नागिरीहून किर्लोस्कर, केसरी, बलवंत, निर्भीड, श्रद्धानंद आदी नियतकालिकांकडे लेख पाठविण्याचा सपाटा चालविला. हे लेख उत्तरेकडे भाई परमानंदांनी हिंदी भाषेतून अनुवादिले, तर दिल्लीच्या ‘ डेली तेज ’ नामक दैनिकानें इंग्लिश भाषेतून प्रसिद्धीले. म्हणजे सावरकरांनी आरंभिलेले प्रबोधन देशाच्या फार मोठ्या भागात जाऊन पोचलें हे दिसून येते.

या लेखांमधून सावरकरांनी जणू त्रिसूत्री मांडली. १) कालबाह्य रुढींवर कठोर प्रहार केले पाहिजेत, २) विवेकनिष्ठा रुजविली पाहिजे आणि ३) प्रयत्नवादाचा प्रसार केला पाहिजे हीच ती त्रिसूत्री होय.

जातिभेद, हुंडा घेण्याची प्रथा, नवस बोलण्याची पद्धती, पशुवधाची चालरीत, इत्यादी अनेक रूढी बेडीप्रमाणे अडथळे आणीत आहेत. तेव्हा या रूढींविरुद्ध जणू युद्धच केले पाहिजे हा सावरकरांचा आग्रह होता. जन्मसिद्ध विषमतेऐवजी गुणसिद्ध विषमता असावी ही सावरकरांची शिकवण होती. ब्राह्मणाने काहीही वर्तन केले तरी त्याला डोक्यावर घ्यावे आणि शुद्राला तो गुणवान असूनही पायातळी तुडवावे ही जन्मसिद्ध विषमता अन्यायाची आहे या ऐवजी जो कुणी स्वकर्तृत्वाने पुढे येत असेल त्याला पूर्ण संधी द्यावी व त्याबद्दल पारितोषिक देऊन गुणसिद्ध विषमता निर्माण करावी ही विचारसरणी व्यक्तीच्या आणि समाजाच्याही हिताची आहे. कोणत्याही माणसाने दुसऱ्या जातीच्या माणसाला केवळ त्याच्या जन्मावरून उच्च वा नीच समजू नये, प्रत्येकानें आपल्या जातीत होऊन गेलेल्या श्रेष्ठ पुरुषांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवावा व या आदर्शाचे अनुकरण करावे आणि समजा, आपल्या जातीची असे कर्तृत्वसंपन्न घटक पैदा करण्याची क्षमता संपुष्टात आली आहे असा निष्कर्ष निघत असेंल तर, ही जात बुडवून टाकावी असा सावरकरांचा संदेश आहे. आपल्या व्यक्तित्त्वाचा जातीत, जातीचा राष्ट्रात व राष्ट्राचा त्रैलोक्यात लोप व्हावा हाच तर आपला आदर्श आहे.

सावरकरांनी धर्मभोळेपणावर क्रूर हल्ले चढविले आहेत. आपण आपल्या धर्माच्या मूळच्या उदात्त कल्पनांना विसरलो व विशिष्ट काळात काही कारणामुळे रूढ झालेल्या चालीरीतींना सनातन समजू लागलो हे आपल्या अधोगतीचे कारण आहे. मनुस्मृती काय वा याज्ञवल्क्य स्मृती काय यापुढे ऐतिहासिक चिजा मानल्या पाहिजेत. धर्म म्हणजे अवघ्या समाजाची धारणा करणाऱ्या तत्त्वांचा समुच्चय. तेव्हा या समाजधारणेच्या आड येणाऱ्या रुढींना कवटाळणे हा अधर्म आहे, तर अशा रुढींना नष्ट करून समाजातल्या चैतन्याला प्रवाही बनविणे हाच धर्म आहे.

विवेकनिष्ठेचा प्रसार ही सावरकरीय त्रिसूत्रीतली महत्त्वाची बाब आहे. देशाच्या विकासप्रक्रियेत लोकांची मनोभूमी विकासाला अनुकूल बनविणे आणि अशा स्वागतशील मनोवृत्तीच्या मशागतीतून सर्व कालोचित परिवर्तने घडवून आणणे फार महत्त्वाचे असते. अन्यथा सरकारनें लादलेल्या सुधारणा व केलेले तंत्रात्मक आणि संस्थात्मक बदल अल्पजिवी ठरतात हा अनुभव आहे. म्हणूनच जाणती, कर्ती माणसे लोकांच्या मनोभूमीची मशागत करण्यासाठी बुद्धिपुरस्सर प्रयास करतात. श्रृतिस्मृतींचा दाखला देऊन भूतकाळात रमलेल्या समाजाला आधुनिक काळात आणावे हे सावरकरांचे उद्दिष्ट होतें. तेंव्हा या समाजाला ग्रंथप्रामाण्याऐवजी बुद्धिप्रामाण्य शिकवावे हा मार्ग या उद्दिष्टाला अनुरुप होता. "दोन शब्दांत दोन संस्कृती" या मथळ्याचा निबंध या दृष्टीने वाचनीय म्हटला पाहिजे. आपण यापुढे अद्ययावत बनले पाहिजे. आपलें आचार विचार, आपली शस्त्रास्त्रे, आपली उपकरणे सारे सारे अद्यतन झाले पाहिजे, कारण अशा अद्ययावत बनण्याच्या हट्टातूनच आपले राष्ट्र जगात अग्रेसर ठरेल व इतरांना मागे टाकील. तेव्हा जर क्ष देशाने ॲटमबॉंब बनविला तर आपण हैड्रोजन बॉम्ब बनविला पाहिजे. तात्पर्य, जे जे समाजोपयोगी ते ते स्वीकारार्ह अशी विवेकनिष्ठा आपण रुजविली पाहिजे. मग ते सारे भूतकालीन पोथीत होते की नव्हतें याची चौकशी करण्याचे प्रयोजन व्यर्थ आहे.

यंत्राकडे एक वरदान म्हणून बघितले पाहिजे ही सावरकरांची सूचना आहे. थोडक्यात झपाट्याने आधुनिक तंत्र व यंत्र स्वीकारावे आणि आपल्या देशाला समृद्ध करावे हाच सावरकरांचा हट्ट आहे.

सावरकरांनी आपल्या लेखातून व भाषणातून प्रयत्नवादाचा पुरस्कार चालविला होता. जेव्हा माणसे दैववादी बनतात तेव्हा सर्व प्रगतीच खुंटते. मग लोक तथाकथित पापांना वर्तमानकालीन दुःखांबद्दल उत्तरदायी समजतात व या जन्मीच्या पुण्यकृत्यांचे फळ भावी जन्मात मिळेल, अशीही समजूत बाळगतात. दुर्दैवाने आपला समाज इतरांच्या मागे राहिला याचे कारण आपण दैवावर विसंबून राहाण्याची संवय लावली. साहजिकच इतर युरोपीय देश आपल्या हातातल्या शक्तीच्या जोरावर पराक्रम करीत होते, आपण मात्र हातावरच्या रेषा बघून भविष्याचे आडाखे बांधण्यात मश्गुल होतो. इतर देश वेगवेगळ्या ग्रहांवर समक्ष जाण्यासाठी धडपडत आहेत, आपण या ग्रहांची कृपा संपादन करता यावी म्हणून जपजाप्य करीत आहोत. वेगवेगळे नवस–सायास, धूपदीप जाळण्याची प्रथा, मंत्रतंत्राची पद्धती हे सर्व प्रकार, म्हणजे प्रयत्नवादापासून दूर जाणाऱ्या पळवाटा आहेत. समर्थ रामदासांच्या एका श्लोकाचा पुरावा देऊन आळशी माणसे ईश्वराच्या अधिष्ठानाचा गौरव करतात. वास्तविक पाहाता आपल्या अपयशाला आपला आळस जबाबदार आहे असे स्वच्छपणे मान्य न करता भगवंताचें अधिष्ठान नव्हते वगैरे ढाल पुढे करणे म्हणजे शुद्ध ढोंग आहे. सावरकरांनी 'ईश्वराचें अधिष्ठान म्हणजे काय ?' या शीर्षकाच्या एका निबंधात अशा वृत्तीवर आसूड ओढले आहेत. मानवी प्रयत्न अगदी पराकोटीला जाऊन केले, कसलीही कसूर ठेवली नाही, तरी अपयश मिळाले तर कदाचित भगवंताची कृपा नव्हती असे म्हणणे समर्थनीय ठरेल. पण कुणाही ऐदी व आळशी माणसाने समर्थ रामदासांच्या या श्लोकाचा सोयीस्कर अर्थ लावून बुजगावणे उभे करू नये हा सावरकरीय निष्कर्ष सदैव लक्षात ठेवण्याच्या योग्यतेचा आहे. सत्यनारायणाची पोथी असेल वा कोणत्याही देवदेवतेचे स्तोत्र असेल, या पोथीत व स्तोत्रात ईश्वरी कृपेमुळे झालेल्या चमत्काराचा महिमा गायीलेला असतो. सावरकरांना या चमत्काराचा तिटकारा आहे. जो सत्यनारायण बुडत्या बोटीला वाचवितो तो मुळात बोट बुडवितोच का ? आणि विशिष्ट पूजाविधी केल्यावरच बुडत्याला कां म्हणून आधार देतो ? म्हणजे आपण ज्याप्रमाणे लाच घेऊन काम करतो, तद्वतच आपला परमेश्वर देखील भ्रष्टाचार करून मदत देतो असे म्हटले पाहिजे. मग अशा परमेश्वराला सत्यनारायण न म्हणता असत्यनारायण म्हणणेच युक्त ठरेल. सारांश, आपण परमेश्वरासारखे निष्कलंक व परिपूर्ण होण्याऐवजी परमेश्वरालाच कलंकित व अपूर्ण होण्यास भाग पाडावे, ही खरी शोकांतिका

आहे. सावरकरांनी 'साधुसंतांचे बोलपट कसे पाहावे' या मथळ्याचा एक लेख लिहिला आहे. अशा बोलपटातून जनाबाईच्या मदतीला परमेश्वर येतो व दळण दळून देतो किंवा तुकारामाचे अभंग परमेश्वरी कृपेमुळे इंद्रायणी नदीत तरु लागतात वगैरे चमत्कार दाखविले जातात. वास्तविक पाहता तुकाराम, ज्ञानदेव, नामदेव, जनाबाई, रोहिदास आदी साधुसंतांना आपण श्रेष्ठ मानतो याचे कारण त्यांच्याजवळ अलौकिक गुण होते, जनसेवेची जिद्द होती, शील होते इ....... त्यांनी निष्कलंक आयुष्याचे आदर्श उभे केलें व आपणही या आदर्शांचे अनुकरण केलें पाहिजे. उगीच चमत्कारांचें स्तोम माजवू नये व धर्मभोळेपणाहीं वाढवू नये, हा सावरकरप्रणीत संदेश लाखमोलाचा आहे.

★★★

ग्रंथालय ठाणे
३०१३
निबंध २४०९४

# सावरकरांचा राष्ट्रवाद

**ज. द. जोगळेकर**

१८८५ मध्ये काँग्रेसची स्थापना होऊन तिच्या मंचावरून हिंदी राष्ट्रवादाचा उद्घोष झाला. या काँग्रेसला रानडे, गोखले, टिळक, गांधी अशा थोर नेत्यांचा पाठिंबा होता. त्यामुळे ती संस्था प्रभावी बनली नि तिच्याबरोबर तिचे हिंदी राष्ट्रवादाचे तत्त्वज्ञानही बऱ्याच प्रमाणात सर्वमान्य झाले. याला मोठ्या प्रमाणातील अपवाद हा मुसलमान समाजाचा होता. त्याने आपले पृथकपणाचे राजकारण सतत चालू ठेवले. तेंव्हा काँग्रेस प्रतिपादित असलेले राष्ट्रवादाचे तत्त्वज्ञान बरोबर नाही असे वाटणारे नि म्हणणारे काही अग्रणी होते. पण या विचारसरणीला सर्वांगाने शब्दरूप केले ते फक्त वीर सावरकरांनी. मात्र त्यांना आपली राष्ट्रवादाची स्वतंत्र विचारसरणी प्रकटपणे सांगण्यास १९३७ सालापर्यंत थांबावे लागले. त्या वर्षीच ते विनाअट रत्नागिरीच्या स्थानबद्धतेतून मुक्त झाले.

परंतु सावरकरांच्या राष्ट्रवादाचा विचार करण्यापूर्वी प्रथम काही संज्ञांची नि ऐतिहासिक घटनांची निदान तोंडओळख करून घेणे उपयुक्त ठरेल. तेव्हा राष्ट्रवाद या संज्ञेपासून प्रारंभ करू. राष्ट्रवाद म्हणजे काय ? सोप्या भाषेत सांगावयाचे तर राष्ट्र या कल्पनेचे तत्त्वज्ञान. मग पुढचा प्रश्न येतो. राष्ट्र म्हणजे काय ? या प्रश्नाचे उत्तर असे की, एकत्वाची जाणीव असलेला विशिष्ट सामाजिक गट. धर्म, संस्कृती, भाषा, भौगोलिक एकता, परंपरा, समान शत्रू यापैकी एक किंवा अनेक घटकांनी कोणत्याही विशिष्ट सामाजिक गटात एकत्वाची जाणीव निर्माण होते.

राष्ट्र या विचाराची जी कल्पना आज आपल्या डोळ्यासमोर येते ती प्रामुख्याने पाश्चिमात्य युरोपातून आलेली आहे. इंग्लंडच्या इतिहासात 'शंभर वर्षांचे युद्ध' या नावाचा कालखंड आहे. या कालखंडात इंग्लंड नि फ्रान्स या दोन देशात अधूनमधून युद्धे झाली. या युद्धाचा अंतिम परिणाम म्हणजे, या दोन देशांवर भिन्न राष्ट्रीयत्वाचा ठसा उमटला, हा होय. या युद्धाच्या शेवटी फ्रान्सच्या कॅलेवर फक्त इंग्लंडचे स्वामित्व राहिले नि इंग्लंडमधून फ्रेंच भाषेची राजभाषा म्हणून हकालपट्टी झाली. या बाबतीतील सविस्तर माहिती

जिज्ञासूला जी. एम्. ट्रॅव्हेलियन यांच्या 'ए शॉर्टेड हिस्टरी ऑफ इंग्लंड' या पुस्तकात मिळेल.

मात्र राष्ट्रवादाला खरा जोर फ्रेंच राज्यक्रांतीनंतरच आला. फ्रेंच राज्यक्रांतीच्या मुशीत फ्रेंच राष्ट्राची एकात्मता निर्माण झाला. पुढे फ्रान्सचे उदाहरण इतर देशांनी गिरविले. १८६१ मध्ये इटलीची बरीच मोठी एकात्मता साधली गेली. १८७१ मध्ये जर्मनी एकात्म झाला, नंतर पुढील पन्नास वर्षांत युरोपातील इतर देशही हळुहळू राष्ट्रपदी चढले. परंतु या सबंध घडामोडीचा इतिहास वाचल्यावर आपल्याला असे दिसते की, अमूक एक घटक राष्ट्रीय एकात्मतेच्या निर्मितीला आवश्यक नाही. पुढील काही उदाहरणांवरून हे स्पष्ट होईल.

आपण 'एक भाषा' हा घटक घेऊ. आपणाला असे आढळते की, स्वित्झर्लंडातील समाजात आपण स्वीस असल्याची प्रखर जाणीव असते. पण त्या देशात फ्रेंच, जर्मन, इटालिअन नि रोमानिक या भाषा बोलल्या जातात. दुसरे उदाहरण कॅनडा नि युनायटेड स्टेट्स्चें घेता येईल. दोन्ही राष्ट्रे सलग भूमीवर असून त्यांच्यात इंग्रजी भाषा बोलली जाते. तरीही तें दोन्ही देश पृथक राष्ट्रे म्हणून उभी आहेत. आता आपण 'एक धर्म' हा घटक घेऊ. आपल्याला असे दिसते की, अर्धा जर्मनी प्रॉटेस्टंट आहे नि अर्धा कॅथॉलिक आहे. तरीही जर्मनी एकात्म राष्ट्र म्हणून उभे आहे. अमेरिका हा अनेक धर्मांचा देश आहे. प्रॉटेस्टंट इंग्लंडमध्ये कॅथॉलिक गट आहे तर कॅथॉलिक फ्रान्समध्ये प्रॉटेस्टंट गट आहे. तरीही हें देश स्वतंत्र व्यक्तिमत्व असलेली राष्ट्रे म्हणून उभी आहेत. आणखी एका उदाहरणाने हा मुद्दा अधिक स्पष्ट होईल. स्पेन नि पोर्तुगाल हे देश घ्या. दोन्ही देशांचे भूप्रदेश एकमेकांना लागून आहेत. दोन्हीही देशांत कॅथॉलिक धर्म आहे, दोन्हीही देशावर सुमारे ६० वर्षे एक शासनसंस्था राज्य करीत होती. तरीही या दोन्हीही देशांना आपण पृथक राष्ट्रे आहोत असे वाटलें नि ती दोन स्वतंत्र राष्ट्रे झाली. तेव्हा आपणास या निर्णयाप्रत यावे लागते की, ज्या समाजात एकत्वाची जाणीव आहे, मग ती एक किंवा अनेक घटकांनी निर्माण झालेंली असो, त्या समाजाचा राष्ट्र होण्याचा अधिकार सिद्ध होतो. या सामाजिक एकत्वाच्या तत्त्वज्ञानाला राष्ट्रवाद म्हणतात.

आता आपण हिंदुस्थानकडे वळू. परंतु हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासाकडे जाण्यापूर्वी प्रथम अर्वाचिन इतिहासावर आपण दृष्टिक्षेप टाकू. विषय सहज नि चांगला समजण्याच्या दृष्टीनें ते आवश्यक आहे. मराठ्यांच्या पराभवानंतर सबंध हिंदुस्थानवर ब्रिटिशांचे राज्य सुरू झाले. मराठ्यांच्या कालखंडाची चिकित्सक मीमांसा न्या. रानडे यांनी केली आहे. त्यांनी ‘राइज ऑफ द मराठा पॉवर’ हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथाच्या उपोद्घातात तें म्हणाले, “हा प्रबंध पुढील दोन धडे स्पष्ट करू इच्छितो : १) मराठी सत्तेचा उदय हा योगायोगाच्या संयोगाने निर्माण झालेला अपघात नव्हता; २) तसेच हिंदू राष्ट्रीयत्वाचा (हिंदू नॅशनॅलिटी) केवळ स्वातंत्र्य मिळविण्याचा उद्देश नव्हता, तर यापूर्वी जे साध्य करण्याचा प्रयत्न झाला नव्हता तो प्रयत्न, म्हणजे देशभक्तीच्या उद्दिष्टाने भारले गेलेल्या संस्थानांचे राज्य स्थापन करणे हा होता........”. परंतु कालांतराने न्यायमूर्तींचा राष्ट्रीयत्वासंबंधीचा हा अत्यंत महत्त्वाचा विचार त्यांनी स्वतःच सोडून दिला.

ब्रिटिशांच्या राज्याविरूद्ध सशस्त्र संघर्ष करणे कठीण आहे असे दिसल्यावर या देशात सनदशीर चळवळीची आवश्यकता भासून कॉँग्रेसची स्थापना झाली. या कॉँग्रेसचे अग्रणी हे पाश्चात्य विद्याविभूषित होते. त्यांच्या डोळ्यासमोर युरोपचा इतिहासही होता. त्यातून प्रेरणा घेऊन त्यांनी आपली हिंदी राष्ट्रवादाची विचारप्रणाली प्रसृत केली. या राष्ट्रवादाची रेखीव नि आटोपशीर मांडणी न्या. रानडे यांनीच केली आहे. ते म्हणालें, ‘उद्याच्या हिंदी राष्ट्रात कुठल्याही प्रकारच्या वंश, धर्म वा वर्णभेदाला स्थान असणार नाही. इतर कोणत्याही गोष्टीस महत्त्व न देता आम्ही सर्व स्वतःला प्रथम हिंदी समजतो, आणि चिरकाल असेच समजणार. इतके दिवस हे ज्ञान आम्हाला न झाल्यामुळे आम्ही एक संघटित हिंदी राष्ट्र निर्माण करू शकलो नाही.

हिंदुस्थानातील भिन्न संप्रदायी लोकांत एकात्मता निर्माण व्हावी आणि त्यांचे अखंड राष्ट्र व्हावे या दृष्टीने ही हिंदी राष्ट्रवादाची विचारधारा अत्यंत संयुक्तिक नि उपयुक्त होती. पण तिला पहिलाच अपशकून अलिगड मुस्लिम युनिव्हर्सिटीचे संस्थापक सर सय्यद अहंमद यांनी केला. ते म्हणाले की, हिंदुस्थान हें एक राष्ट्र आहें या कल्पनेला माझा विरोध आहे. त्यांचें म्हणणे होतें की, हिंदू नि मुसलमान हे एका सिंहासनावर बसू शकणार

नाहीत. एकाने दुसऱ्याचा पराभव करणे आवश्यक आहे. यातून मुसलमानांच्या पृथकपणाच्या चळवळीला प्रारंभ झाला.

मुसलमानांची ही पृथकपणाची भूमिका पाहून काँग्रेसच्या हिंदू नेत्यांनी न्या. रानडे यांच्या 'हिंदू राष्ट्रीयत्वाच्या' कल्पनेकडे परत वळणे आवश्यक होते; परंतु तसे घडले नाही. उलट मुसलमानांच्या मनधरणीच्या राजकारणाचा त्यांनी जोराने पुरस्कार केला आणि हिन्दी राष्ट्रवादाचा पुरस्कार करणाऱ्या काँग्रेसवर जातीयतेचा आरोप कधीही येऊ नये म्हणून त्यांनी 'हिंदू' हा शब्द राजकीयदृष्टचा बहिष्कृत केला. स्वातंत्र्याची विलक्षण ओढ लागलेल्या सुशिक्षित समाजावर या हिंदी राष्ट्रवादाचा विलक्षण प्रभाव पडला आणि आपण सर्व हिंदी आहोत असे तो समजू लागला. या सुशिक्षित वर्गात हिंदू बहुसंख्य असल्याने त्यांचे हिंदीकरण वेगाने झाले. आरंभीच्या काळातील काही मुस्लिम नेत्यांनाही या विचाराने आकर्षित केले; परंतु अल्पकाळच. थोडचा समयातच मुसलमान समाज पृथक आहे या विचाराचा प्रभाव पडू लागला, आणि कालौघात त्याचें स्वतंत्र विचारसरणीत परिवर्तन झाले.

हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यानंतर मुसलमानांच्या पृथकपणाची वृत्ती दाखवणारे अनेक पुरावे आहेत. अर्थात जगभर पसरलेला मुसलमान समाज हा अधुनिक राष्ट्रवादाच्या प्रवाहात अद्यापही आलेला नाही. अधुनिक राष्ट्रवादाचा उगम युरोपमध्ये झाला. त्यात भूमिनिष्ठेला प्राधान्य असते. मुसलमानी समाजातील बुद्धिवादी नेत्यांना ही गोष्ट अजून समजलेली नाही किंवा पटलेली नाही. त्यांचा अजूनही विश्वास 'मिलत'च्या जगभर पसरलेले मुसलमान हें एक राष्ट्र आहेत, या विचारावर आहे. त्यामुळे भूमिनिष्ठेचे आकर्षण त्यांना अजिबात नसतें. परिणामतः कुठल्याही भूमीवर आपला निवास असला तरी त्या भूमीवरच्या इतर समाजापेक्षा आपण पृथक आहोत असे समजणे हा त्यांचा स्वभाव झाला आहे. त्यामुळेच चीनमधला मुसलमान स्वतःला चिनी लोकांपेक्षा निराळा समजतो. त्यामुळेच फिलिपाइन्समध्ये ख्रिश्चन व मुसलमान यांच्यात यादवी युद्ध होते. त्यामुळेच थायलंड, नेपाळ, सिलोन, ब्रह्मदेश या देशांतील मुसलमान पृथक वृत्ती दाखवितात हे अनुभव विसरून चालणार नाही.

राष्ट्रवादाची आणखी एक विचारसरणी आहे तिचाही हिंदुस्थानचे संबंधात विचार करणे आवश्यक आहे. या विचारसरणीनुसार प्रत्येक प्रांतिक भाषेचे राष्ट्र होते. म्हणजे बंगाली, तामिळ, तेलगू, मराठी, कन्नड ही सर्व स्वतंत्र राष्ट्रे आहेत. या विचारसणीला हिंदी राष्ट्रवादी नि हिंदू राष्ट्रवादी या दोघांचाही विरोध असणे अपरिहार्य आहे. पण मुसलमानदेखील तिला मान्यता देणार नाहीत. कारण बंगाली, मराठी या राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेंत त्यांचे मुसलमानी पृथकत्व नष्ट होते.

आता देशाचे अखंडत्व टिकविण्यात जर हिंदी राष्ट्रवाद यशस्वी झाला नाही. भाषिक राष्ट्रीयत्वाला जर बहुसंख्य लोकांचा पाठिंबा मिळणार नसेल तर मग हिंदुस्थानातील लोकांचे एकत्व साधणारा, ठेवणारा, दाखविणारा राष्ट्रवाद कोणता ? या प्रश्नाचे सोपे उत्तर आहें 'हिंदू राष्ट्रवाद' आणि या राष्ट्रवादाची सुंदर मांडणी केली आहे वीर सावरकरांनी.

हिंदुस्थानातील लोकांना प्राचीन काळापासून हिंदू म्हणण्यात येते नि त्या शब्दाबद्दल त्यांना ममत्वही आहे. याची तीन-चार प्रातिनिधिक उदाहरणे देता येतील. हिंदी भाषेचा आद्यकवी चंदबरदाई हा हिंदु, हिंदवान्, नि हिंद हें शब्द आपल्या काव्यात सहज वापरतो. रामदासांनी एक ठिकाणी, 'बुडाले सर्वही पापी । हिंदुस्थान बळावले । अभक्तांचा क्षयो झाला । आनंदवन भुवनी' असे म्हटले आहें. शिवाजीने जयसिंगास लिहिले होते, 'आम्ही लोकांनी यावेळी हिंदू, हिंदुस्थान नि हिंदू धर्म यांच्या संरक्षणार्थ फार जोराचे प्रयत्न केले पाहिजेत ? गोविंदराव काळ्यांनी नाना फडणवीस नि महादजी शिंदे यांचे ऐक्य झालें हे ऐकल्यावर लिहिले, 'अटक नदीचे अलिकडे दक्षिण समुद्रापावेतो हिंदूंचे स्थान तुर्कस्थान नव्हें.' २३ ऑगस्ट १८०३ मध्ये रघुजीस यशवंतराव लिहितो, 'हिंदू धर्म सर्वांनी मिळून राखावा; स्वराज्यातून इंग्रजांस काढावे हे सर्वपरी चांगले आहे म्हणून लिहिले.' बडोदे संस्थानाचे अधिपती कै. सयाजीराव गायकवाड हे चालू शतकाच्या आरंभी अमेरिकेंस गेलें असतांना त्यांना असें आढळले की, अमेरिकेंतील लोक या देशाला हिंदुस्थान म्हणतात नि त्यातील जनतेला हिंदू म्हणतात.

या हिंदुस्थान देशातील लोकांचे एकत्व व्यक्त करणारा एक सुंदर शब्द आहे आणि तो म्हणजे 'हिंदुत्व' हा होय. याच नावाच्या ग्रंथात

सावरकरांनी हिंदू समाजाला एकत्वाने बांधणारे कोणते रज्जू आहेत याचे छान विवेचन केले आहे आणि नंतर आपली हिंदुत्वाची व्याख्या देऊन तिची चर्चा केली आहे. पण व्याख्या केल्यानंतरही सावरकरांचे भविष्याकडे लक्ष आहे. समाज एका जागी थांबत नाही. निरनिराळ्या परिस्थितीतून गेल्यामुळे समाजात बराच बदल होण्याची शक्यता असते. असा बदल झाला तर पुण्यभू शब्दाचे महत्त्व कमी होऊन पितृभू शब्द महत्त्वाचा ठरेल ही शक्यता गृहित धरून ते लिहितात, 'कदाचित पुढे-मागे हिंदू म्हणजे हिंदुस्थानचा केवळ नागरिक आणि अन्य कोणीही नाही, अशा प्रकारची गोष्ट घडून येणारच नाही असे नाही.' म्हणजे भविष्यात मुसलमान, ख्रिस्ती, ज्यू वगैरे संप्रदायी समाजांतील लोकांना हिंदू म्हणण्यास सावरकर तयार आहेत. प्रश्न इतकाच आहे की, हे समाज स्वतःला हिंदू किंवा भारतीय म्हणवून घेण्यास तयार आहेत का ?

हिंदुस्थानचे विभाजन इस्लाम नि हिंदू या धर्मभेदावर झालें. पण काँग्रेसने तात्त्विकदृष्टया ते मानले नाही आणि आपला हिंदी राष्ट्रवादाचा जप नि हिंदू राष्ट्रवादाची निंदा चालू ठेविली. परंतु या हिंदी राष्ट्रवादाचा पुरस्कार करणारी काँग्रेस 'अल्पसंख्यांकांच्या हितांचें रक्षण' असें शब्द सातत्यानें वापरते. आता एकरसी हिंदी समाजात अल्पसंख्य येतात कुठून ? आणि असे अल्पसंख्य कोणी असल्यास बहुसंख्य कोण आहेत ? तसे कोणी बहुसंख्य असल्यास त्यांचें राष्ट्र आहे असे का म्हणू नये ? म्हणूनच सावरकरांनी पं. नेहरूंना एका पत्रकाद्वारे पुढील प्रश्न केला होता : 'ज्याला लीग ऑफ नेशन्स राष्ट्रीय बहुसंख्यांक – नॅशनल मेजॉरिटी – म्हणते त्या लोकांच्या नावानेच बहुतेक सर्व शासनें नि राष्ट्रे ओळखली जातात ही वस्तुस्थिती नाही का ?' (हिस्टॉरिक स्टेटमेंटस् – पृ. २१६) म्हणूनच सावरकरांचे म्हणणे होतें की, लीग ऑफ नेशन्सच्या तत्त्वाप्रमाणे हिंदुस्थानातील 'नॅशनल मेजॉरिटी' हिंदू असल्याने या देशाला हिंदू राष्ट्रच म्हणावयास हवे.

इतक्या सोप्या विवेचनानंतर कोणाचीही समजूत पटेल की, राष्ट्रीयत्व याचा अर्थ समाजातील एकत्वाची जाणीव हा होय. ही एकत्वाची जाणीव प्राचीन काळापासून हिंदू समाजात आहे. या देशात त्या समाजाची बहुसंख्या आहे. त्यामुळेच तो हिंदुस्थानात राष्ट्र आहे आणि त्याचे राष्ट्रीयत्व

हिंदुत्व या शब्दातून व्यक्त होते. जाती, उपजाती, प्रांतिक भाषा, धर्म या सर्वांच्या अभिमानांवर मात करून हिंदुस्थानला एकात्म ठेवण्याचे सामर्थ्य केवळ हिंदुराष्टवादातच आहे.

हा राष्ट्रवाद जातीय नाही, तसेच निधर्मी शासनाच्या विरुद्ध नाही. राष्ट्र कल्पना ही समाजातील एकात्मता दाखवते. शासनसंस्था त्या समाजाचा राज्यव्यवहार चालवते. धर्म हा सामाजिक एकात्मता निर्माण करण्यास सहाय्यभूत ठरतो किंवा मारकही ठरतो. समाजाच्या ऐतिहासिक परिस्थितीवर या घटकाचें सहाय्य अवलंबून असते. पण शासनसंस्थेचा व्यवहार चालविण्यासाठी धर्माची आवश्यकता नसतें. कोणत्याही शासनाला त्याने काहीही भूमिका घेतली तरी, यांत्रिक युगाच्या जीवनात निधर्मी शासनाची वाट चालावी लागते. या अधुनिक शासनाच्या निर्मितीला किंवा त्याचा व्यवहार चालविण्याला कोणत्याही संप्रदायाची वा धर्माची जराही आवश्यकता लागत नाही. यावरून हे स्पष्ट व्हावे की, हिंदू राष्ट्रवाद नि निधर्मी शासन या दोन भिन्न कल्पना असून त्यांच्यात विरोध येण्याचें कारण नाही. त्या दोघींची क्षेत्रे भिन्न आहेत. एक समाजाची एकात्मता जोपासते तर दुसरी समाजाचा व्यवहार चालवते.

इतक्या विवेचनानंतर सावरकरांचा राष्ट्रवाद, ज्याला हिंदू राष्ट्रवाद या नावाने संबोधिले जाते तो राष्ट्रवाद, अद्ययावत, निधर्मी, नि पुरोगामी आहे, असे म्हणावयास हरकत नाही.

★★★

# हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व

– सुधीर फडके

'हा हिंदुस्थान आहे, इंडिया नाही. हिंदुत्व हेच या देशाचे राष्ट्रीयत्व आहे. हा देश जर देश म्हणून राहायचा असेल, राहावा असे वाटत असेल तर या देशाचे बरेवाईट ते माझे बरेवाईट असे मानणारा जो नागरिक आहे तो केवळ हिंदूच आहे या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. म्हणून हा हिंदूंचा देश आहे, हे हिंदुराष्ट्र आहे.' हे सत्य स्वातंत्र्यवीर सावरकरांनी खणखणीतपणे आयुष्यभर मांडले. त्यासाठी ते प्राणपणाने झगडले. त्यांनी अप्रियता पत्करली, बंदिवास भोगला, असंख्य शारीरिक व मानसिक यातना सोसल्या. अगणित संपत्ती मिळविण्याचे बुद्धीवैभव असूनही आयुष्यभर वनवास पत्करला. कोणत्याही ऐहिक गोष्टीची पर्वा न करता एक मंत्र, एक सत्य सांगत सांगत आपले आयुष्य संपविणारा हा महापुरुष होता.

इ. स. १८८० पासून सावरकरांच्या विचारांचा उदय या देशात होईपर्यंत 'हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व' हें सत्य जाणून बुजून डावलण्यात येत होते. हा सिद्धांत प्रतिगामी आहे, जातीय आहे आणि अशा सत्याचा विचार समाजात पसरला तर सर्व देशाचे नुकसान होईल, हा समाज रसातळाला जाईल असा प्रचार सातत्याने करण्यात येत होता. किंबहुना हिंदुत्वाच्या या आग्रहामुळे या देशाच्या अस्तित्वालाच धोका आहे, असे सांगण्यापर्यंत मजल गेली होती. हे एक राष्ट्रच नव्हे; जरी तसे ते वाटत असले तरी ते इंग्रजांमुळे अस्तित्वात आले आहे; इंग्रज येण्यापूर्वी हे राष्ट्र नव्हते; म्हणजेच हा देश हिंदुस्थान नसून इंडिया आहे, असा विकृत प्रचार त्याकाळात केला जात होता. या पार्श्वभूमीवर स्वातंत्र्यवीरांनी उद्घोषिलेल्या सत्याचा आणि त्यांच्या जीवितकार्याचा विचार होणे आवश्यक आहे.

प्रतिभासंपन्न महाकवी, श्रेष्ठ निबंधकार, अजोड वक्ता, द्रष्टा इतिहासकार, प्रखर क्रांतिकारक, कडवा समाजसुधारक, निःस्वार्थ देशभक्त असे सावरकरांचे व्यक्तिमत्व पाहिले म्हणजे एकच मनुष्य हें सारे कसे करू शकतो याचे आश्चर्य वाटते. सामान्य कोटीतील माणूस असामान्य कार्य

करू शकतो याचे सावरकर हे एक उत्तम उदाहरण आहे. प्रभु रामचंद्र, छत्रपती शिवाजी विजयी झाले. त्यांनी केलेल्या कार्यामुळे त्यांना देवत्व प्राप्त झाले. सावरकर तात्पुरते पराजित झाले म्हणून आपण त्यांना देव मानत नसलो तरी काही पिढ्यानंतर, काही शतकांनंतर ते देवत्व पावणार आहेत हे नक्की.

★★★

आज परिस्थिती अत्यंत गंभीर बनली आहे. काळ अत्यंत वाईट येतो आहे. आमच्या पिढीच्या आयुष्यात कदाचित काही बरेवाईट घडणार नाही, कारण आमचे आयुष्यच थोडे उरले आहे. परंतु तरूण पिढीच्या आयुष्यात काय घडणार आहे याची कल्पना करवत नाही. माझ्या नातवंडांची मुले कोण असतील हे मला सांगता येणार नाही.

या देशात ८५ टक्के हिंदू आहेत. अल्पसंख्यांक १५ टक्के आहेत असे असूनही ८५ टक्के लोकांच्या मनात भीतीची, असुरक्षिततेची भावना आहे. भवितव्याबद्दल चिंता आहे. याचें कारण काय ? आपण हिंदू अत्यंत स्वार्थी व स्वयंकेंद्रित आहोत. आयुष्यात काही त्याग करावा लागतो, ज्या समाजात आपण रहातो, त्या समाजाचे आपण काही देणे लागतो, ही जाणीव आपल्या मनात नाही. आजुबाजूचा समाज आहे, म्हणून मी आहे तेव्हा या समाजाकरता मला काही केले पाहिजे या भूमिकेतून विचार होताना आज दिसत नाही. बहुसंख्यांक असणाऱ्या हिंदूंच्या मनात विचारांची जागृती नाही ही चिंतेची बाब आहे.

पुढेमागे हा देश हिंदू राहिला नाही तरी माणसें तीच राहतील, भौगोलिक सीमा त्याच राहतील. कदाचित वाढतीलही. पण या देशाचें नाव काय असेंल, या देशातील समाजाचा धर्म कोणता असेंल, माणसांची विचारसरणी कोणती असेंल, ते सांगता येणार नाही. या आपत्तीवर मात करावयाची असेल तर आपण जागृत झाले पाहिजे. अशी विपरीत परिस्थिती येऊ देणार नाही असा निर्धार केला पाहिजे. या देशाचे हिंदुत्व, हिंदुराष्ट्र हे बिरूद प्राणपणाने जतन करू व या देशाचा भाग्योदय आम्हीच घडवून आणू अशी प्रतिज्ञा आपण केली पाहिजे.

एका गोष्टीचे आश्चर्य वाटते. जगातील सर्व इस्लाम राष्ट्रे या देशाला हिंदुस्थान म्हणून ओळखतात. इंडिया किंवा भारत म्हणून ओळखत नाहीत. आपण मात्र आपल्या देशाला हिंदुस्थान म्हणत नाही, हिंदुस्थान या नावाची आठवण राहू नये म्हणून आपल्या राज्यघटनेत या देशाचा उल्लेख 'इंडिया यानें भारत' असा केला आहे. हिंदुस्थान म्हटलें तर हे हिंदूंचे स्थान आहे, तें त्यांचेच राहिले पाहिजे असा विचार मनात येतो. या विचारातून जो स्वाभिमान निर्माण होईल तो नष्ट व्हावा हा देश हिंदुस्थान राहू नये, म्हणूनच जणू 'इंडिया दॅट इज् भारत' असा निर्देश राज्यघटनेंत आढळतो.

हिंदुस्थानचें अस्तित्व ज्यांच्या डोळ्यात खुपते असे इतर राष्ट्रातील लोक या देशाला हिंदुस्थान म्हणतात. हे हिंदुस्थान त्यांना नष्ट करावयाचे आहे. नुसते नाव नष्ट करुन चालणार नाही, तर येथील समाजच नष्ट करावयाचा आहें. त्यानंतर या देशाचें काय होईल ते सांगता येत नाही. या सगळ्या परिस्थितीचा सावरकरांना सुस्पष्ट अंदाज असल्यामुळे त्यांनी त्याविरुद्ध लोकप्रियतेची पर्वा न करता सतत लढा दिला. लोकप्रियता मिळविणे हे माझे काम नाही तर अंतिमतः समाजाच्या हिताचे जे असेल ते करणे माझे काम आहें हेंच त्यांनी आपले जीवितकार्य मानले.

★★★

१९५२ साली पुण्यांत अभिनव भारत या क्रांतिसंस्थेचा सांगता समारंभ झाला. त्यावेळी सावरकरांनी भावपूर्ण भाषण केले. सिंधू आज आपल्या देशात नाही. आपण ती कारण नसतांना पाकिस्तानला देऊन टाकली. आपल्या भ्याडपणामुळे देऊन टाकली याची तीव्र खंत त्यांनी व्यक्त केली. ते म्हणाले, 'हे सिंधू आम्ही तुला कधीही विसरणार नाही. तुला आम्ही परत मिळवू. ज्या ठिकाणी आमची पुण्यकृत्ये होतात, स्नानसंध्या करावयाची असते, देवांनाही दुर्लभ अशी धर्मकृत्ये करावयाची असतात, यज्ञ करावयाचे असतात अशा तुझ्या सान्निध्यात आम्ही परत येऊं. तुझी गणना आमच्या देशात होईल असे आम्ही पाहू.'

सिंधूचा ध्यास घेत घेत हा मनुष्य संपला. सिंधू तिथेच आहे. आपणही तिथेच आहोत. गेलेला भाग परत मिळविण्याची गोष्ट दूरच राहिली, पण

असलेला भाग तरी आपल्यात राहातो की नाही अशी शंका येण्याजोगी परिस्थिती आज निर्माण झाली आहे. तरीसुद्धा आम्ही शांत आहोत. आसामचे काय होणार आहें ? आसामातील परिस्थितीची आपल्याला चिंता वाटते कां ? आसाम हा आपल्या देशाचा भाग आहें असे असूनही आसामातील घटनांबाबत आपला दृष्टीकोन 'मला काय त्याचे' असाच दिसतो. अटकेपर्यंत आपलें झेंडे पोहोचलें होते असे आपण मोठ्या दिमाखाने सांगतो. पण तो इतिहास झाला. आज मात्र स्थिती अशी आहे की, सिंध गेला, वायव्य सरहद्द प्रांत गेला. आपण वेळीच जागृत झालो नाही तर आसामही जाण्याचा धोका आहें. आज आसामसह ईशान्य भारतातील सर्व भाग फुटिरप्रवृत्तींनें पोखरला आहे. घूसखोर मुसलमान व इतरेजनांबरोबरच आपला नादानपणाही या परिस्थितीला कारणीभूत आहे. सिंध प्रांत भारताचाच एक प्रांत 'होता' असे म्हणण्याची पाळी आज आपल्यावर आली आहे. आसाम नावाचा एक भाग आमच्या देशात होता खरा, असे म्हणण्याची पाळी उद्याच्या पिढ्यांवर आली तर त्याची जबाबदारी आपल्यावर आहे. आपण जागरुक राहिलो तर तसे म्हणण्याची पाळी पुढील पिढ्यांवर येणार नाही.

आमचा देश कसा घडवायचा हा आमचा अधिकार आहे. अमेरिका, रशिया, इंग्लंड वा जपान काय म्हणतात याचा विचार आम्हाला करण्याचे कारण नाही. सावरकरांचा हाच दृष्टीकोन होता. उलट अशी परिस्थिती निर्माण व्हायला हवी की अमेरिका रशियादी लोकांना विचार करणे भाग पडावे की 'हिंदुस्थान काय म्हणतो.' कोणत्याही घटनेच्या संदर्भात हिंदुस्थानची प्रतिक्रिया काय होईल याची चिंता या सर्व देशांना वाटली पाहिजे. हें घडवून आणण्यासाठी आपल्याजवळ पुरेसे संख्याबळ आहे, शक्ती आहे, पण इच्छा मात्र नाही. ही इच्छा मनात बाळगली आणि आपणांस जे जे जेवढ्या प्रमाणात शक्य आहे ते तें प्रामाणिकपणे करण्याचे ठरविले, प्रत्येक जण योग्य दिशेनें कार्य करू लागला, तर सावरकरांचे स्वप्न साकार होण्यास वेळ लागणार नाही.

सावरकरांची एकच इच्छा होती की या देशाचे, या समाजाचे भलें व्हावे. खऱ्या अर्थानें हा जगातील सर्वोत्कृष्ट समाज, सर्वोत्कृष्ट आणि सामर्थ्यसंपन्न देश व्हावा. या देशातील प्रत्येक माणूस सर्वार्थाने सुखी व्हावा, येथील दारिद्र्य, विषमता, जातीयता व बेकारी नष्ट व्हावी, हेंच त्यांचे स्वप्न होते.

समाजाच्या पायांत अडकविलेल्या सप्तशृंखला तोडण्याचा सावरकरांनी आपल्या वाणीने, घणाघाती लेखनाद्वारे व प्रत्यक्ष कार्यातून प्रयत्न केला. स्वतःचे आयुष्य जाळून समाजाला प्रकाश मिळावा असा सावरकरांचा त्याग. आपल्या आयुष्याला त्यांनी समिधेचे रूप दिले. अशा सावरकरांचे विचार व तत्त्वज्ञान हे आपले आहे असे ठरवून, त्यावर श्रद्धा ठेऊन आपण वागायचे ठरविले तरच या जन्मशताब्दी वर्षाचे सार्थक होईल.

★★★

आणखी एका दुर्दैवी घटनेचा उल्लेख करतो. आपल्याच देशातील एका भागाचे नाव 'नागालँड' असे कसे असू शकते? नागभूमी, नागप्रदेश असे म्हणायला काय हरकत आहे? इंग्रजी शब्दाने भारतीय प्रदेश ओळखला जाण्याचे कारण काय? या प्रदेशातील बहुसंख्य हिंदूंचे ख्रिस्तीकरण करण्यात आले. या ख्रिस्ती लोकांच्या हट्टासाठी आपल्या देशाच्या हिंदू पंतप्रधानाने या प्रदेशाला नागालँड हें इंग्रजी नाव बहाल केले.

नागालँडमध्ये आपले सैन्य आहे. १९६५ साली, त्या सैन्याच्या करमणुकीसाठी चित्रपट कलावंतांचे पथक घेऊन मी गेलो होतो. आम्ही आसामात प्रवेश केला. मरियानी नावाचे एक मजबूत लष्करी ठाणे आहे, तेथे थांबलो. त्याठिकाणी आणि नंतर नागभूमीमध्ये भेटेल त्याला मी विचारले की नागालँडमध्ये एकंदर लोकसंख्येपैकी हिंदू किती व ख्रिश्चन किती? मला भेटलेल्या सेनाधिकाऱ्यांसह सर्वांनी असे उत्तर दिले की There are 80% Christians and others are non-Christians. किती शरमेची बाब आहे ही. हिंदुस्थानच्या एका भागांत ख्रिश्चन्स आणि नॉनख्रिश्चन्स आहेत, दुसऱ्या भागात मुस्लिम आणि आणि नॉनमुस्लिम आहेत. हे जे नॉनख्रिश्चन व नॉनमुस्लिम आहेत, ही परिस्थिती किती वर्षात तयार झाली याचा आपण विचार करा.

१९४०–४१ साली याच नागभूमीत सावरकर गेले होते. त्यावेळी हजारो नागांनी 'हमारा हिंदुओंका राजा आया' असे म्हणून त्यांचें प्रेमानें स्वागत केलें. १९४० ते १९६५. पंचवीस वर्षे झाली. १९४० साली बहुसंख्य नागा हिंदू होते. आज त्याच प्रदेशात ८० टक्के ख्रिश्चन्स आणि उरलेले

नॉनख्रिश्चन्स आहेत. आपला देश नॉनख्रिश्चन, नॉनमुस्लिम व्हायला नको आहे. आसाम, नागभूमी हे जर नॉनमुस्लिम, नॉनख्रिश्चन व्हायला नको असतील, हिंदुस्थान हिंदूच रहावा असे वाटत असेल तर आपण जागृत होण्याची आवश्यकता आहे. हा इशारा प्रथम सावरकरांनी दिला. हे अप्रिय सत्य बेडरपणाने त्यांनी आयुष्यभर सांगितले.

★★★

सावरकरांच्या जीवनाचा व कर्तृत्वाचा हा विचार दीपस्तंभाप्रमाणे नित्य मार्गदर्शन करीत रहाणारा विचार आहे. त्या विचारांचा परिणाम मनन चिंतन आणि आचरणरूपाने आपल्या जीवनात सतत मूर्तिमान व्हावा, ही इच्छा. सावरकरांनी देशगौरवाची, विशुद्ध हिंदुत्वाची आणि जातपातविरहीत, विज्ञाननिष्ठ, जागृत समाजाच्या निर्मितीची इच्छा मनात बाळगली व ती इच्छा सफल व्हावी यासाठीच आपलें आयुष्य वाहिले. सावरकरांची ही इच्छा पूर्ण करणे हीच त्यांना खरीखुरी श्रद्धांजली होय.

★★★

# विज्ञाननिष्ठ सावरकर

**प्रा. भालबा केळकर**

विज्ञाननिष्ठ सावरकर या विषयाचा विचार करण्यापूर्वी आपण काही शब्दांचे थोडेसे विवरण करून घेऊ. काही व्याख्या नव्याने करण्याची आवश्यकता वाटते. त्यानंतर या विषयाकडे जाणे सोपे होईल. आपल्या वापरात काही शब्द सातत्याने येतात. धर्म आणि विज्ञान हे ते शब्द. आपल्याकडील बुद्धिवादी मंडळी 'धर्माकडून विज्ञानाकडे सरका' असें सातत्यानें सांगत असतात. हे विधान फारसे बरोबर नाही. दुसरे म्हणजे वस्तुनिष्ठा, वस्तुवाद, विज्ञाननिष्ठा, विज्ञानवाद हें सगळे शब्द आपण एकत्र मिसळल्यासारखे वापरतो ते तसे वापरू नयेत.

धर्म म्हणजे रिलिजन नव्हे, तसेंच विज्ञान म्हणजे सायन्स नव्हे. हे दोन्ही शब्द मोकळे करून घ्यावे लागतील. " Religion is a doctrine followed by a set of people and a doctrine led by one." म्हणजे रिलिजन याचा खरा अर्थ पंथ असा आहे. धर्म हा पंथ असू शकत नाही. धर्माची व्याख्या 'धारयति इति धर्मः ।' म्हणजे समाजधारणा करणारा तो धर्म अशी आहे. व्यक्तिगत जीवनाचे महत्व लक्षात ठेऊनही माणसामाणसांतील नाती आणि सौहार्द यांची जोपासना म्हणजे समाजधारणा होय. विज्ञान आणि सायन्स यातील फरक कोणता ? सायन्स म्हणजे to scire म्हणजे to know माहिती असणे. विज्ञान म्हणजे विशेषण ज्ञानम् म्हणजे मर्म जाणणे. सायन्स म्हणजे विज्ञान नव्हे. वस्तुची माहिती असणे वेगळे आणि त्याचे मर्म जाणणे वेगळे. एक उदाहरण घेऊन हा मुद्दा स्पष्ट करता येईल. बोलत असतांना माईक बंद पडला म्हणून जर वक्ता बोलायचेच थांबला तर त्याला माईकचें मर्म समजले नाही असेच म्हणावे लागेल. पृथ्वी, आप, वायु आणि आकाश या चार महाभूतांचा धनी असलेल्या निर्जीव माईकचा, तेजासह पाच महाभूतांचा धनी असलेला माणूस गुलाम होणे हे वाईट. सजीवाने निर्जीवाचा गुलाम होणे यासारखी अधोगती नाही. याचा अर्थ वक्त्याला माईकचे विज्ञानच कळले नाही. माणसाला त्याची शक्ती राखून जास्त वेळ बोलता यावे याकरिता माणसाने तयार केलेली माईक ही सुविधा

आहें, हे समजणे म्हणजे माईकचें विज्ञान समजणे होय. ही सुविधा माणसाच्या आड येऊ लागली तर ती बाजूला ठेऊन स्वत:चा आवाज चढवून बोलणे म्हणजे त्या सुविधेवर मात करणे होय.

विज्ञानाचा हा अर्थ लक्षात न घेता सावरकरांचे विज्ञाननिष्ठ निबंध वरवर वाचले तर गैरसमज करणारे सुद्धा वाटतील. त्यांचे लेख केवळ Between the lines वाचून चालणार नाही तर Behind the lines वाचलें पाहिजेत, म्हणजेच त्यांचे मर्म कळू शकेल. वेद वाचत असतांना वेदात काय सांगितलें आहे हें लक्षात घ्यावे लागते. त्यात केंवळ सृष्टीची वर्णने नाहीत तर मनुष्यजीवन आणि निसर्ग यांच्यातील लागेबांधे स्पष्ट केलेंले आहेत. वेद अपौरुषेय आहेत याचा अर्थ ते एकाने रचलेले नाहीत तर अनेकांनी रचलेंले आहेत हे समजावून घेतले पाहिजे. गार्गी मैत्रेयी यासारख्या विद्वद्मान्य विदुषींनी वेदांचे शिक्षण घेतले होते. म्हणजेच स्त्रियांनी वेद वाचू नयेत हा चुकीचा अन्वयार्थ मधल्या काळात लावला गेला. समजूतीचा हा आवाका म्हणजे Reading behind the lines.

विज्ञान म्हणजे नक्की काय याचा शोध घेणारे आणखी एक उदाहरण पाहू. दोन शाळकरी मित्र आहेंत. एकाजवळ दोन पेन्सिली आहेंत आणि दुसऱ्याजवळ एकही नाही. "तुझ्याजवळची एक पेन्सिल मला दे," असे म्हणणाऱ्या मित्राला दुसऱ्याने पेन्सिल दिली नाही आणि उलट आपल्या मित्राला शिक्षा झालेली पाहून आनंद झाला, तर त्याला पेन्सिलीचे सायन्स कळले म्हणजे वस्तुज्ञान झालें आहें एवढेच म्हणता येईल. पेन्सिल माझी आहें असे म्हणता म्हणता तो पेन्सिलीचा गुलाम झाला. वस्तु माझी आहे असे म्हणता म्हणता मनुष्य वस्तुचा गुलाम केव्हा बनतो, हें माणसाला कळत नाही. येथे माणसामाणसांतील सजीवाचे सौहार्द संपतें व निर्जीवाची सत्ता सुरू होते. येथे सायन्स पलिकडे आपल्याला काहीही कळलेले नाही. पाश्चात्य जीवन पद्धतीत हे आपणास दिसून येईल. वरील उदाहरणात दोन पेन्सिली असणाऱ्या मुलाने 'सर, आज त्याने पेन्सिल आणली नाही हे खरे पण त्याला शिक्षा करू नका. माझ्याजवळील एक पेन्सिल मी त्याला देतो.' असें म्हटले आणि मित्राला शिक्षा होऊ नये म्हणून स्वत:जवळची एक पेन्सिल मित्राला दिली तर दोन पेन्सिली आणणाऱ्या त्या मित्राला पेन्सिलीचें विज्ञान कळले असें म्हणता येईल. सायन्स म्हणजे वस्तुज्ञान आणि विज्ञान म्हणजे

वस्तुज्ञानाचे जीवनविषयक माणुसकीचे तत्त्वज्ञान. या दोन संकल्पना समजल्या तरच सावकरांची विज्ञाननिष्ठा आपणास कळू शकेल.

आज विज्ञान म्हणून आपण ज्याचा पाठपुरावा करतो आणि धर्म म्हणून ज्याला फेकून द्यायला बघतो तेच घोटाळ्याचे होत आहे. विज्ञान म्हणून ज्याचा आपण पाठपुरावा करतो तो वस्तुज्ञानाचा आणि धर्म म्हणून फेकून द्यायला बघतो ते कर्मकांड. अर्थात कर्मकांड फेकायलाच हवे. त्यांत गुंतून राहणे योग्य नव्हे. कर्मकांडात गुंतले म्हणजे माणुसकी संपली. भारतीय जीवनात वस्तुज्ञान, विज्ञान आणि अध्यात्म या तिन्ही गोष्टींना महत्व आहे. भारतीय जीवनातील अध्यात्म आपण विसरू शकत नाही. खऱ्या अर्थाने निरीश्वरवादी कोणीही नसतो. अर्थात अध्यात्माची आपली जी मूळ कल्पना आहे ती मधल्या काळातील कर्मकांडात लुप्त झाली.

वस्तुज्ञान हे माणसाला जन्मापासून असते. वस्तुज्ञान म्हणजे वस्तुचा तावा आणि उपभोग. येथेच पाश्चात्य संस्कृती थांबते. लहान मूलसुद्धा कुठलीही गोष्ट हाताशी आली की प्रथम ती तोंडात घालते व त्याचा तावा सोडत नाही. हे जन्मदत्त–स्वाभाविक–वस्तुज्ञान होय. मात्र या वयातही वस्तुज्ञान, विज्ञान आणि अध्यात्म यांची नकळत पण उपजत जाणीव असू शकते. एका उदाहरणाने हा मुद्दा स्पष्ट करतो. सुंदर दिसणाऱ्या ज्योतीकडे लहान मूल धावत जाते. त्या ज्योतीचा ताबा मिळावा, उपभोग घ्यावा असे त्याला स्वाभाविकपणे वाटते. याचा अर्थ मुलाला ज्योतीचे वस्तुज्ञान झाले. ज्योतीच्या जवळ हात नेल्यानंतर तो भाजतो याचा त्याला अनुभव येतो. आजूबाजूचा अंधार नाहीसा करून आपल्याला वावरायला, खेळायला प्रकाश देणे हे ज्योतीचे कार्य याची त्याला जाणीव होते. म्हणजे त्याला ज्योतीचे विज्ञान कळले. मात्र ज्यावेळी दुसरे अज्ञानी मूल ज्योतीजवळ जाण्याचा प्रयत्न करते तेव्हा ते मूल त्याला परावृत्त करते. ही उपजत बुद्धी म्हणजे अध्यात्म. स्वतःच्या पलिकडे बघायला शिकणे म्हणजेच अध्यात्म. सावरकरांनी प्रत्यक्ष जीवनात या तिन्ही पायऱ्यांचा विचार केला आहे. किंबहुना त्यांच्या जीवनाच्या मांडणीतच हा दृष्टिकोन व्यवस्थितपणे दिसून येतो म्हणून ते पूर्णतया भारतीय होते. पूर्णतया हिन्दू होते. हिन्दू या शब्दाला बिचकण्याचें किंवा हिन्दू म्हटले म्हणजे जातीय वगैरे वाटण्याचें काहीही कारण नाही. धर्म या संज्ञेला खऱ्या अर्थाने हिन्दू धर्मच पात्र आहे, असें स्पष्टपणे म्हटले पाहिजे.

वस्तुवाद आणि वस्तुनिष्ठा, विज्ञानवाद आणि विज्ञाननिष्ठा, बुद्धिवाद आणि बुद्धिनिष्ठा या वेगळ्या गोष्टी आहेत, हे लक्षात ठेवले पाहिजे. वाद जिथे आला तिथे फेनॅटिसिझम आला. माणूस वादाला उभा राहिला म्हणजे आपोआप एकांतिक झाला. मी जर पुनर्जन्म नाही असे म्हणालो तर मी वादाला उभा राहिलो. त्यावेळी पुनर्जन्म आहे असे मला वाटत असले तरी मी पुनर्जन्म नाही असेच म्हणणार. पण पुनर्जन्म नाही या गोष्टीवर माझी निष्ठा असेल तर मी त्या समस्येचा शोध घेण्याचा प्रयत्न करीन आणि माझ्या जर असे लक्षात आले की पुनर्जन्म आहे तर माझे मत सुधारून घेईन. माझे म्हणणे खोटे ठरले ही वस्तुस्थिती मी मान्य करीन आणि खुल्या मनानें नवे ज्ञान, जाणीव स्वीकारीन. (बुद्धिवादी मंडळी भावनेंचे अस्तित्वच नाकारतात हे असेच दोषास्पद आहे.) म्हणून वस्तुवाद नको. वस्तुनिष्ठेला आपल्या विचारात कधीच डावललेले नाही. वैभवाला कधी नाही म्हटले आहे का ? पण लिप्तालिप्त वृत्ती हवी. कर्मप्रवृत्ती आणि श्रेयनिवृत्ती हे गीतेत सांगितले ते खरे आहे. सावरकरांना वस्तुनिष्ठा मान्य होती. वैभव पाहिजे असे त्यांनी म्हटले आहे. राष्ट्राच्या सीमा कुठपर्यन्त ? तर जिंकत जाऊ तेथपर्यन्त असे त्यांचे उत्तर होते. प्रत्येक गोष्ट बुद्धीने पारखून घ्यावी, आहारी जाऊ नये असे सावरकरांचे मत होते. या अर्थाने ते बुद्धीनिष्ठ होते. तसेच सावरकर हे विज्ञानवादी नव्हे तर विज्ञाननिष्ठ होते. विज्ञानवादी मंडळी नेहमी धर्माकडून विज्ञानाकडे सरका असे म्हणतात तेव्हा ते विसरतात की मुळात विज्ञानात माणुसकीचा भाग गृहित आहे. माणसाच्या विकासाच्या संदर्भात धर्म आणि विज्ञान यांना सारखेच महत्व असून या गोष्टी परस्पर पूरक आहेत हे विसरून चालणार नाही.

सावरकरांनी आपल्या विज्ञाननिष्ठ निबंधात कर्मकांडावर कठोर प्रहार केले आहेत. हे करीत असताना समाजाला वैज्ञानिक दृष्टी देण्याचाच त्यांचा प्रयत्न होता. गायीसंबंधी त्यांनी जे विवेचन केले आहे त्याचा या दृष्टिकोनातून विचार केला पाहिजे. गोपालन आणि गोपूजन यात त्यांनी फरक केला आहे. त्यांचा भर गोपालनावर असून गोपूजन त्यांनी गौण मानले आहे. गायीच्या पोटात पचनाची बायोकेमिकल फॅक्टरी आहे. त्यातून जे जे मिळते ते उपयुक्त आणि औषधी असते. केरोटिनयुक्त दूध, गोमूत्र, गोमय यांच्यात औषधी गुणधर्म आहेत. शेतीप्रधान असणाऱ्या आपल्या देशात मशागतीसाठी

बैलाची मोठीच गरज असते. या सर्व गोष्टी गायीपासून आपल्याला मिळू शकतात. पण त्यासाठी गाय कशी असली पाहिजे ? मरतुकडया, हडकलेल्या आजारी गायीचे मल, मूत्र उपयुक्त नसते. अशा गायीची पूजेसाठी पूजा का करायची असे ते विचारतात. हिरवा चारा खाणारी, अत्यंत पुष्ट असलेली स्वच्छ व निरोगी गाय असेल तरच तिच्यापासून मिळणाऱ्या सर्व गोष्टी उपयुक्त ठरतील. गाय कशी पाळावी याचे शास्त्रशुद्ध तंत्र लक्षात घेऊन केलेले गोपालन हेच खरे गोपूजन असे त्यांनी स्पष्ट म्हटले आहे. आई–वडिलांचे पूजन म्हणजे धूपदीपाने आरती करणे नव्हे. त्यांना योग्य वेळी खाणे पिणे देणे त्यांची व्यवस्था नीट ठेवणे, औषधोपचार करणे, धर्मकार्य व मनोरंजनासाठी सोयी उपलब्ध करून देणे, त्यांचे म्हातारपण ममत्वाने सुसह्य करणे हे त्यांचे खरे पूजन. उत्तम पालन व संगोपन याशिवाय निव्वळ पूजन म्हणजे कर्मकांड होय.

समाजाच्या धारणेसाठी काही व्यवस्था उत्पन्न कराव्या लागतात. 'चातुवर्ण्यम् मया सृष्टम गुणकर्म विभागश: ' असे गीतेत म्हटले आहे. पुढील व मागील संदर्भ लक्षात न घेता गीतेंमध्ये चातुवर्ण्याचा पुरस्कार केला आहे असे विधान करणे योग्य होणार नाही. चार वर्ण तयार केले आणि त्यात माणसे कोंबली असे झालेले नाही. समाज व्यवस्थेकरता लागणाऱ्या गोष्टी म्हणून त्या काळात वर्णव्यवस्थेचा विचार केला गेला. ज्ञानाच्या आदान प्रदानासाठी ब्राह्मण. ब्रह्म म्हणजे ज्ञान, त्याचा विचार ब्राह्मणांनी करावा. ते करतांना त्यांनी दारिद्रय सोसले पाहिजे. रक्षणाची जबाबदारी क्षत्रियांची, त्यासाठी त्यांनी कर्जबाजारी राहिले पाहिजे. त्याशिवाय संरक्षणाची जबाबदारी ते नीट पार पाडणार नाहीत. व्यापार उदीम करणारांजवळ पैसा आहे पण सत्ता नाही. ज्यांच्याजवळ भौतिक कलाकौशल्य आहें, बांधणीचें कौशल्य आहे त्यांना भौतिक संस्कृति उभारण्याचे काम मिळाले. समाजाच्या धारणेसाठी ही रचना तयार झाली असणार. पण या रचनेत अभिसरण– इकडून निकडे जाणे येणे नव्हते असे कोणी सांगितले ? ही आपली समजूत असेल तर ते चूक आहे. वेदांमध्ये किती तरी ऋचा शूद्रांनी रचल्या आहेत. अलिकडील काळात सर्वच खात्यात Efficiency Bar असतो. गुणवत्तेंनुसार त्या बार पलिकडे कोणालाही जाता येते. हीच व्यवस्था त्या काळात वेगळ्या स्वरुपात होती. त्यामध्ये कितीतरी सरमिसळ झाली आहे. आता पूर्वीच्या स्वरुपातील वर्णव्यवस्था अस्तित्वात तरी आहें का ? जसे जसे आदान–प्रदान

वाढले, भौतिक संस्कृति वस्तूच्या वैभवाने वाढू लागली तसे समाजव्यवस्थेची ही चौकट खिळखिळी झाली. ज्यांच्याजवळ शस्त्र आणि सामर्थ्य जास्त होते ते जेते झाले. आणि जित आणि जेते यांच्यात सरमिसळ झाली. गेल्या दोन हजार वर्षांचा भारताचा इतिहास बघितला तर आर्य, अनार्य, शक, कुशाण, हूण हे सगळे जित–जेतें एकमेकात मिसळून गेलेले दिसतात. मध्यंतरीच्या काळात कर्मकांडाला महत्व आले. कर्मकांडामुळे आपल्या समाजात प्रचंड फाटाफूट होईल अशा तऱ्हेची अवस्था निर्माण झाली. या अवस्थेमुळे असे वाटायला लागलें की समुद्रपर्यटन निषिद्ध. अनेक प्रकारची बंधने समाजानें हळुहळु स्वतःवर लादून घेतली. समाज जगायची, अस्तित्व टिकविण्याची धडपड करू लागला. काही आक्रमकांनी, "तुम्ही आमच्या धर्माचें–पंथाचे–नाही ना, मग तुम्हाला जगायचा अधिकार नाही," असे म्हणायला सुरुवात केली. सुरक्षिततेसाठी समाजाने आपल्या भोवती कुंपणे उभी केली. कर्मकांडालाच महत्त्व दिले गेले. जगायचें आहे यापेक्षा वेगळा विचारच नाहीसा झाला. म्हणजे धर्मविचार नाहीसा झाला. अनेक पंथोपपंथांनी आपल्याला कर्मकांडात अडकवून घेतले. संपूर्ण समाजच जणू आक्रसला.

हिंदू धर्म खूप जुना आहे. लांबून वहात आलेले पाणी गढूळ असते किंबहुना लांबून वहात येते म्हणूनच गढूळ असते. सावरकरांचा आग्रह असा होता की, बुद्धीची आणि विज्ञाननिष्ठेची तुरटी फिरवून आपण हा प्रवाह स्वच्छ ठेवला पाहिजे.

कर्मकांडात गुंतू नका, त्यामुळे समाजाचे तुकडे होतील असा इशारा त्यांनी दिला. जन्मावर मनुष्य आणि त्याचे जगणे हे मूळ विचारात अभिप्रेत नाही. समाजरचनेकडे ते केवळ ऐतिहासिक नव्हे तर वैज्ञानिक दृष्टीकोनातून पाहतात. त्यांच्यावर टीका करण्यापूर्वी त्यांची ही विज्ञाननिष्ठा समजावून घ्यावी लागेल.

ज्ञान आणि स्वच्छता यांची जोपासना म्हणजे माणूस. त्याच्या आड कर्मकांड येत असेल तर ते मोडून टाकलें पाहिजे. कर्मकांड हे वस्तुवादी आहे. निखळ विज्ञानवाद माणुसकी सोडतो, एकांगी होऊन बसतो. वस्तुनिष्ठेतून वैभव निर्माण होते. बुद्धिनिष्ठेने प्रत्येक गोष्ट पारखून व्यवस्थित असेल तर घेता येते. तर विज्ञाननिष्ठेने दुसऱ्या माणसाच्या अस्तित्वाचा विचार

करून त्यालाही चांगले जगण्याचा अधिकार आहे या दृष्टीनें विचार करून जीवनाची वाटचाल करता येते. विज्ञाननिष्ठेत माणुसकीचा अंतर्भाव आहे तो याच अर्थाने. देवाच्या अस्तित्वाबद्दल सावरकर काय म्हणतात ? त्यांच्या मतें माणसांतील सद्भावना म्हणजेच देव. वस्तुवस्तूत देव आहे असे आपण म्हणतो. मग त्या वस्तुंचा माणुसकीसाठी कसा उपयोग करून घेता येईल याचा शोध म्हणजेच देवाचा शोध असे त्यांनी म्हटलें आहे.

कर्मकांडावर कठोर प्रहार करणारे सावरकर हिंदुत्वावर मात्र अत्यंत तळमळीने, आत्मीयतेनें बोलतात: कारण ते विचारांचे पूजक होते, तसेच भावनाशील होते. ते क्रांतिकारक होते. क्रांतिकारक भावनाहीन असूच शकत नाही. त्याला भावनेची तीव्र झळाळी असते. सावरकर हे विचार व भावना यांचा उत्कृष्ट समन्वय साधत असत. या अर्थानें ते पूर्ण मनुष्य होते. तात्यासाहेब केंळकर मूलत: विचार करणारे गृहस्थ होते तर शि. म. परांजपे यांच्या स्वभावात भावनेची प्रचंड तिडीक होती. भावना व विचार यांचा समन्वय साधणारे सावरकर विचारपूर्वक क्रांतिकारक होते. ते भावनाशील होते म्हणूनच त्यांना अस्पृश्यांच्या अवस्थेबद्दल आस्था आणि कळवळा होता. अस्पृश्य हा माणूस आहे. त्याला तुम्ही स्वच्छता शिकवा. त्यांच्या धंद्यामुळे—व्यवसायामुळे जर त्यांना स्वच्छता पाळता येत नसेल तर ती कशी पाळायची हे त्यांना शिकवा. त्यांना जवळ घ्या, ढकलू नका असे दूर त्यांचे आवाहन होते.

त्यांच्या जीवनातील एक प्रसंग त्यांची विज्ञाननिष्ठा स्पष्ट करतो. सावरकर जातीभेद मानत नव्हते. एकदा ते मित्रांबरोबर गप्पा मारीत होतें. एक मुलगा चहा घेऊन आला. तेव्हा त्यांच्या एका सहकाऱ्याने चहा देणारा मुलगा मांग आहे म्हणून चहा प्यायचे नाकारले. त्याच्या वागण्यातील विसंगती आणि माणुसकीशून्य व्यवहार सावरकरांनी मित्राला चटकन लक्षात आणून दिला. ग्रहणाच्या दिवशी दान मागायला आलेल्यातील एकजण म्हणाला, 'मला आधी द्या.' सावरकर म्हणाले, 'तुला कां आधी ? तो देखील आला आहे तुझ्याच बरोबर.' त्यावर तो म्हणाला, 'मी महार आहे आणि तो मांग आहे.' अस्पृश्यांतसुद्धा अस्पृश्यता किती खोलवर रुजली आहें ते येथे दिसते. अशी ही खोलवर रुजलेली अस्पृश्यता नाहीशी करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. माणूस हा प्रथम माणूस आणि मग बाकी

काही. म्हणून जन्मानें माणसाचा लहानमोठेपणा ठरविता कामा नये, हा जो त्यांचा दृष्टिकोन होता त्याला विज्ञानवादी दृष्टिकोन म्हणता येईल. निर्जीव वस्तुचा, त्या वस्तुमध्ये जरूर ते बदल करून, उपयोग करण्याची बुद्धी माणसामध्ये आहे. तेव्हा अशा प्रत्येक वस्तुचा उपयोग सर्वांना निश्चितपणे सारखाच झाला पाहिजे. यासाठी आवश्यक असणारी सामाजिक समता जन्माने येणारे जातीभेद काढून टाकले म्हणजेच येईल. येथेही पुन्हा त्यांची विज्ञाननिष्ठा वस्तुचे जीवनाविषयक माणुसकीचें तत्त्वज्ञान सांगणारी होती.

सत्य, असत्य वगैरे बाबत सुद्धा त्यांचा दृष्टीकोन विज्ञाननिष्ठ होता. परिणामी सत्य ते सत्य, परिणामी अहिंसा ती अहिंसा, परिणामी न्याय तो न्याय, परिणामी धर्म तो धर्म. या परिणामापर्यंत पोहोचण्यापूर्वीची हिंसा, अन्याय वा अधर्म यांचे वर्णन तथाकथित असेच करावे लागेल. असत्य याचा अर्थ वाईट. जे परिणामी दुःखकारक होते ते. श्रीकृष्णानें हे सर्व अन्वयार्थ लावलेले दिसतात. श्रीकृष्ण हा पूर्णतया विज्ञाननिष्ठ होता.

आपले कार्य झाल्यानंतर; अन्यायाची, अधर्माची शक्यता असताना त्यांचा निःपात केल्यानंतर माणसाने शांतपणे व अलिप्तपणे निघून गेले पाहिजे हीच गीतेची शिकवण आहें. सावरकरांनी आत्मसमर्पण केले आहे. आपले कार्य संपले आहे हे स्पष्ट झाल्यानंतर हळुहळू शांतपणे उपोषणाच्या मार्गाने ते मृत्यूला सामोरे गेले. त्यांच्या कृतार्थ मृत्यूचा अर्थ लावणे त्यांच्या विज्ञाननिष्ठेकडे पाहिले म्हणजे सोपे जातें. जन्मभर शस्त्रवादाचा, अन्याया-विरूद्ध शस्त्र उगारायला हरकत नाही या मताचा आग्रही पुरस्कार करणाऱ्या सावरकरांचा मृत्यू आत्मसमर्पणाने व्हावा हें अतिशय लक्षणीय आहे.

राष्ट्रबद्दलचा त्यांचा अभिमान वस्तुनिष्ठ होता. हे राष्ट्र स्वतंत्र झाल्यावर त्यांनी आपल्या घरावर अशोकचक्र असलेला तिरंगी झेंडा लावला आणि मग त्याच्याखाली भगवा झेंडा लावला. सर्वतोपरी लोककल्याणासाठी झटणाऱ्या धर्माचे प्रतीक असलेला भगवा झेंडा त्यांनी अभिमानाने फडकविला. राष्ट्राला त्यांनी मोठे मानले. तिरंगी झेंड्यावर अशोकचक्र आहें याचा त्यांना आनंद झाला. त्या रूपाने धर्मचक्रच आले अशी प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली. ही मनाची विशालता सावरकरांच्या बुद्धिनिष्ठेचेच प्रत्यंतर आहे. बुद्धीची

कक्षा ओळखून त्याच्या पलिकडे शोध घेत जाणे – ज्याला माणुसकीचा शोध असे म्हणता येईल, असा शोध सावरकरांनी आयुष्यभर घेतला.

सावरकरांचे विज्ञाननिष्ठ निबंध वरवर वाचले तर असे वाटेल की त्यांनी चांगले कोरडे ओढले आहेत. पण ते कर्मकांडावरचे, रूढींवरचे आहेत. रूढी ही थिजलेली कृती असते. परंपरा ही नेहमी प्रवाही असते. ती काळातील चांगले घेते आणि वाईट बुडवून टाकते. या अर्थाने आपण भारतीय परंपरेचे आहोत. त्यांनी वस्तुवादावर हल्ला केला आहे. वस्तुत गुंतलेली भीती काढून टाकली पाहिजे असे त्यांचे स्पष्ट प्रतिपादन आहे. अशी निर्भय वस्तुनिष्ठा, विज्ञाननिष्ठा आणि बुद्धिनिष्ठा प्रत्यक्ष आचरणात आणून जीवनात माणसाचे कल्याण कसे करावे, अस्मिता जागवून कसे जगावे, याचा वस्तुपाठ सावरकरांनी घालून दिला. या अर्थाने त्यांची विज्ञाननिष्ठा इतर कोणाही विज्ञानवाद्यापेक्षा वेगळी आहे. म्हणूनच ती अतिशय लक्षणीय आहे.

★★★

# सावरकरांचा महामंत्र

दि. वि. गोखले

सावरकरांचें महत्त्व किंवा योग्यता भारतातील अनेक लोकांना अद्यापही समजलेली नाही. यात सावरकरांविषयीच्या अज्ञानाचा भाग मोठा आहे. याचे एक कारण असे की सावरकरांनी जे लिखाण केले ते बरेचसे मराठीत केले, त्यामुळे त्यांचा वाचकवर्ग महाराष्ट्रापुरता मर्यादित राहिला. महात्मा गांधी किंवा पं. नेहरु यांनी जे ग्रंथलेखन केले ते प्राय: इंग्रजीत केलें. महात्मा गांधींचे वृत्तपत्र देखील इंग्रजीच होते. त्यामुळे त्यांची प्रसिद्धी सबंध हिंदुस्थानभरच नव्हे तर जगभर झाली. दुसरे असे की, सावरकरांची जेव्हा प्रदीर्घ कारावासातून सुटका झाली तेव्हा ते वयाने फार मोठे म्हणजे ५४ वर्षांचें झाले होते. प्रदीर्घ व क्रूर कारावासामुळे प्रकृतीवर अनिष्ट परिणाम झाले होते. अधूनमधून ते आजारी पडत. तरीही १९३७ साली सुटका झाल्यानंतर भारतात ज्या ज्या ठिकाणी सावरकर गेले त्या ठिकाणच्या वृत्तपत्रानी म्हणून ठेवलें आहे की स्वातंत्र्य प्राप्तीनंतर नेंहरुंना जर कोणी प्रतिस्पर्धी ठरणार असेल तर ते वीर सावरकर होत. पण ते होऊ शकले नाही याला कारण आपल्या समाजाची स्वप्नाळू वृत्ती हेच होय.

सावरकरांच्या व्यक्तिमत्वाचे रसायन इतके अद्भुत आहे की त्याचा शोध अजूनही घेतला गेला पाहिजे. हा मनुष्य जहाल क्रांतिकारक होता. लहानपणीच ते बॉम्बची विद्या शिकले. त्यांचे वयाने कनिष्ट मित्र कर्वे, कान्हेरे यांनी १७ व्या वर्षी पिस्तुले चालविली. त्यांच्या या कृत्यानंतर पोलिसांनी त्यांना पकडलें. डॉक्टरने त्यांची नाडी पाहिली तर नाडीचे ठोके वाढलेलें नव्हते. अशी शूर माणसे सावरकरांनी निर्माण केली. हा उग्र क्रांतिकारक भावकोमल कवीही होता. सावरकर अंदमानात होते. तेथे कोणताही ग्रंथ त्यांना उपलब्ध नव्हता. लिहायला कागद पेन्सिलही नव्हती. कविता रचायची आणि भिंतीवर ती खिळचाने लिहायची किंवा मुखोद्गत करायची. कवी असणारी माणसे सामान्यत: गद्य फारसे चांगले लिहू शकत नाहीत. निबंध लिहू शकत नाहीत. तें इतिहासकार नसतात. पण हा कवी मात्र इतिहासकार होता, अत्यंत उत्तम निबंधकार होता. राजकारणी होताच

पण त्याचबरोबर समाजसुधारक होता. बोलका नव्हे तर कर्ता समाजसुधारक होता. अशा या महापुरुषाचे तत्त्वज्ञान लोकांच्यासमोर यायला पाहिजे.

सावरकर संरक्षणाचा विचार करतात तेव्हा त्यांच्या डोळयासमोर देशाचे संरक्षण आहे. जागतिक शांतता त्यांना अभिप्रेत नाही. हे शांततावादी लोक जगाचे भले करायला गेले आणि देशाचे मात्र वाटोळे झाले. सावरकरांच्या डोळयासमोर मात्र राष्ट्र होते. त्यांना जग कळत नव्हते असे नव्हे. ते तरुण-पणीच युरोप हिंडून आले होते. जगात हिंडायला त्यांचा विरोध नव्हता पण संरक्षण याचा अर्थ देशाचे संरक्षण ही त्यांची भूमिका पक्की होती.

सावरकर हे क्रांतिकारक होते. येथील गोऱ्या अधिकाऱ्यांवर क्रांति-कारकांचा डोळा होता. मात्र हजारभर गोऱ्यांचे खून पाडून देशाला स्वातंत्र्य मिळणार नाही याची क्रांतिकारकांना कल्पना होती. तरीही त्यांनी हा मार्ग कां पत्करला हे समजावून घेणे आवश्यक आहे. आपला समाज ब्रिटिश राज्य येथे आल्यानंतर घाबरलेला होता. हे जगावेगळे असे विलक्षण राज्यकर्ते असून त्यांच्यावर आपण कधीही मात करू शकणार नाही, अशी न्यूनगंडाची भावना समाजमनात घर करून होती. इंग्रजांच्या तुलनेत आपण दुय्यम दर्जाचे आहोत असे लोकांना वाटे. लोकांच्या मनातील ही भीती काढून टाकण्यासाठी व आपण प्रथम दर्जाचें लोक आहोत हे सिद्ध करण्यासाठी क्रांतिकारकांनी गोऱ्या लोकांवर पिस्तुले चालविली. त्यांना आम्ही मारू शकतो हें दाखवून देणे व लोकांच्या मनात विश्वास निर्माण करणे यासाठी हा मार्ग क्रांतिकारकांनी पत्करला. त्यावेळच्या क्रांतिकारकांचे नेतृत्व सावरकरांकडे होते. सावरकर हे अत्यंत बुद्धीमान असल्याने त्यांना या मार्गाच्या मर्यादांची जाणीव होती. लो. टिळक व म. गांधींची चळवळ, सुभाषबाबूंनी स्वातंत्र्यासाठी केलेले प्रयत्न, इतर क्रांतिकारकांच्या चळवळी यासारखीच ही ही एक चळवळ होती. ब्रिटिशांबद्दलची भीती क्रांतिकारकांनी नाहीशी केली, म्हणून पुढे लोक तुरुंगात जायला तयार झाले. राज्यक्रांतीसाठी झालेली चळवळ हा एक अखंड प्रवाह असतो. तो अधेमधे तोडता येत नाही. त्याच्यात अनेक लोक आपापले कर्तृत्व गाजवून जातात. दुर्दैवाने स्वातंत्र्योत्तर काळात सत्ताधाऱ्यांनी क्रांतिकारकांच्या कार्याविषयी मुळीच आस्था ठेवली नाही. नव्हे भल्याभल्यांनी या कार्याची कुचेष्टाच केली. वीरेन्द्र चट्टोपाध्याय वगळता बाकीचे सर्व क्रांतिकारक वेड झाले हे नेहरुंचे विधान आहे. वरवर पाहता त्यांचे हे विधान खरे आहे. पण

ते वेडे कशामुळे झाले? ज्यांनी मनावर ताबा मिळविला होता, ती सावरकरांसारखी माणसेच फक्त मनाने शाबूत राहिली. बाकीची वेडी झाली ती देशासाठी, ध्येयासाठी. देश स्वतंत्र होईना म्हणून त्यांच्या मनावर परिणाम झाला, सत्ता किंवा पैशाच्या लोभापायी नव्हे. क्रांतिकारकांच्या राजकारणाचा हा अन्वयार्थ समजावून घेतला पाहिजे.

क्रांतिकारकांच्या फुटकळ प्रयत्नांनी देशाला स्वराज्य मिळणार नाही याची सावरकरांना कल्पना होती. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी सैनिकी शिक्षण अपरिहार्य आहे हे त्यांचे तत्वज्ञान होते. आपले सैन्य ब्रिटिश सैन्याशी लढून विजयी झाले तरच या देशाला स्वातंत्र्य मिळेल असे त्यांचे प्रतिपादन होते. अशा प्रकारे ब्रिटिशांविरूद्ध लढण्याचा एक देशव्यापी प्रयत्न १८५७ साली झाला होता. त्या लढ्याचे महत्व लोकांना पटावे म्हणून त्यांनी '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' हा ग्रंथ इंग्लंडमध्ये लिहून प्रसिद्ध केला. त्यावेळी त्यांचे वय अवघे २३–२४ वर्षांचे होते. याचा अर्थ याबावत त्यांच्या मनात खूप आधीपासून विचार चालू असला पाहिजे. सर्व प्रकारचे सर्जनशील लेखन करण्याची क्षमता असणाऱ्या सावरकरांनी '१८५७ चें स्वातंत्र्यसमर' हा ग्रंथ लिहिण्याचा ध्यास कां घेतला याचें कारण ग्रंथ वाचल्यावर कळून चुकते. १८५७ साली भारतीय सैनिक जेव्हा ब्रिटिशांच्या विरूद्ध लढले तेव्हा ब्रिटिश सत्तेच्या तोंडाला फेस आला होता. १८५७ सालच्या शेवटी शेवटी तर ब्रिटिशांना असे वाटत होते की आता हिंदुस्थानातील आपली सत्ता नाहीशी होणार. सैनिकीकरणाच्या परिणामांचे बीज या घटनेत सावरकरांना दिसले. त्यांनी आपल्या पुस्तकात नमूद करून ठेवले आहे की, इंग्रजांनी भारतात सैन्य उभारले आहे, त्यात ९० तें ९५ टक्के भारतीय लोक आहेत. त्यांनी लढाईचें अधुनिक व अद्ययावत शिक्षण घेतले पाहिजे. त्याचबरोबर त्यांच्यात एवढी मोठी जागृती उत्पन्न केली पाहिजे की त्यांनी वेळ आली की ब्रिटिशांविरूद्ध लढायला उभे रहावे. सैन्य, संरक्षण आणि युद्ध या विषया–संबंधीचे मूलभूत विचार हेच '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' या ग्रंथाचे क्रांतिकारकत्व आहे.

दुसऱ्या महायुद्धात सावरकरांनी "सैन्यात जा" असा प्रचार केला. त्यामुळे नेताजी सुभाषचंद्र बोस यांना आझाद हिंद फौजेसाठी ब्रिटिश सैन्यातून फुटलेले भारतीय सैनिक आयते मिळाले. सावरकरांचे हे ऋण

सुभाषबाबूंनी मान्य केले आहे. जेव्हा अन्य पुढारी आमच्या सैन्याला दोष देत होते, सैन्यात जे गेले ते नोकरीसाठी, पोटाची खळगी भरण्यासाठी, अशी त्यांची संभावना करीत होते, तेव्हा फक्त सावरकरच सैन्य भरतीचें समर्थन करीत होते. तें म्हणत, तुमच्या मनात स्वातंत्र्येच्छा असेल तर सैन्यात जाऊन शिक्षण घ्या. मग बंदूक कोठे वळवायची हे तुमच्या मनावर अवलंबून आहे. बंदूक चालविता येणे महत्त्वाचे. तुमच्या हातात प्रथम बंदूक-आली पाहिजे आणि मनात इच्छा पाहिजे की या देशाला स्वातंत्र्य मिळायलाच हवे. ब्रिटिशांच्या हाताखालील हिंदी सैन्य फितवावे, अधिकाधिक लोकांना लष्करी शिक्षण मिळावे ही दृष्टी त्या काळात फक्त सावरकरांनाच होती.

रशियन क्रांतीच्या वेळी काय झाले ? रशियात लेनिनने क्रांती केली म्हणजे काय केले ? ती क्रांती रशियन सैन्यानें केली. लेनिन हा रशियन क्रांतीचा व कम्युनिझमचा उद्‌गाता होता. राज्यक्रांती घडवून आणण्याचा पहिला प्रयत्न लेनिनने १९०७ साली केला. त्यात त्याला अपयश आले व जीव मुठीत घेऊन स्वित्झर्लंडला पळून जावे लागले. १९१७ साली पुन्हा संधी मिळाली. जर्मन सैन्याने रशियन सैन्य जवळ जवळ नेस्तनाबूत केले. ह्यावेळी लेनिन रशियात गेला व त्याने क्रांतीचा झेंडा उभारला. रशियातील ही क्रांती खऱ्या अर्थाने स्थिर केंव्हा झाली ? झारनें सैन्याला पुन्हा सांगितले की फिरून एकवार जर्मनांशी लढा. तेव्हा सैन्याने स्पष्ट नकार दिला. त्यावेळी रशियात कम्युनिस्ट क्रांती झाली. त्याची मीमांसा करताना लेनिनने असे म्हटले आहे की, "The Soldiers voted with their legs." सर्व रशियन सैन्य रणांगणावरून माघारी पळून आले. सैन्य म्हणालें, " जो शांतता देईल त्याच्या बाजूने आम्ही आहोत." झारचे काहीच चालेना. लेनिननें शांतता देण्याचे कबूल केले आणि रशियन क्रांती स्थिर झाली. सगळ्या देशांचा इतिहास जवळपास असाच आहे. जेव्हा सैन्य फितते व आक्रमक देशाच्या सैन्याचा पराभव होतो तेव्हाच त्या देशाला स्वातंत्र्य मिळते. दुसऱ्या महायुद्धाचा संपूर्ण इतिहास याला साक्षी आहे. युगोस्लाव्हियाच्या सैन्याने हिटलरवर विजय मिळविला तेव्हाच ते राष्ट्र स्वतंत्र झाले.

चीनचा कम्युनिस्ट नेता माओ त्से तुंग म्हणत असे की, " Power flows out of the barrel of a gun." सत्ता ही बंदुकीच्या नळीतून येतें. त्याने हे तत्वज्ञान सांगण्यापूर्वीच सावरकरांनी त्याचा उद्‌घोष करून

ठेवला आहे. त्यांचे कवी मित्र गोविंद यांनी आपल्या कवनांत, " रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले " असा सवाल केला तेव्हा हा देश स्वतंत्र नव्हता. स्वातंत्र्य चार दशकें दूर होते. सारांश, केवळ कोणावर बाँब टाकून वा कोणावर पिस्तुले चालवून नव्हे तर सैन्य फितवून व त्यांच्यात राष्ट्रभक्तीची भावना उत्पन्न करूनच स्वातंत्र्य मिळवता येईल, हेच सावरकरांचे तत्वज्ञान होतें.

१९३७ साली सावरकरांची विनाअट सुटका झाली. १९३८ साली मुंबईत जे साहित्य संमेलन झाले त्याचे अध्यक्षपद सावरकरांना देण्यात आले. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी संदेश दिला की, तरुणांनो लेखण्या मोडा आणि बंदुका हाती घ्या. त्यावर महाराष्ट्रात प्रचंड खळबळ माजली. आपल्या व्याख्यानात सावरकरांनी आपल्या संदेशाचें स्पष्टीकरण केले आहे. ऑस्ट्रियावर हिटलर चालून आला तेव्हा तेथे कवी कमी नव्हते. लेखक होते, सांस्कृतिक कार्यक्रम चालू होते. काहीही कमी नव्हते परंतु सैनिकी ताकती कमी होती, म्हणूनच हिटलरची स्वारी करण्याची हिंमत झाली. आपल्या देशावर दिवस कोणते आले आहेत, याचे ज्यांना भान नव्हते अशांनी सावरकरांवर टीका केली. योगायोग असा की लेखण्या मोडून बंदुका घेण्याचा आदेश सावरकरांनी ३८ साली दिला आणि ३९ साली दुसरे महायुद्ध सुरू झाले. मग अनेकांना पटायला लागले की, सावरकर म्हणताहेत तेच बरोबर आहे.

सुप्रसिद्ध फ्रेंच लेखक आंद्रे मोरवा आणि चर्चिल यांच्या एका संभाषणाची आठवण करून देतो. आंद्रे मोरवा चर्चिल यांना असे म्हणाले होते की, पहिले महायुद्ध संपल्यानंतर आणि दुसरे महायुद्ध सुरू होण्यापूर्वीच्या काळांत फ्रान्समध्ये नाटक, नृत्य, काव्य वगैरे सांस्कृतिक गोष्टींना ऊत आला होता. सरकारसह सगळे तिकडेच लक्ष देत होते. त्यामुळे सैन्याकडे दुर्लक्ष झाले. परिणामी जगज्जेत्या नेपोलियनच्या फ्रांसला पराभव पत्करावा लागला. उत्तम नाटककार आणि कवी असणाऱ्या सावरकरांना लेखणीचे महत्त्व माहित नव्हते असे कोण म्हणू शकेल ? पण देशाची स्थिती काय आहे, देशासमोर वेळ कोणती आहे याचे भान ठेवून योग्य तोच व्यवहार झाला पाहिजे असा त्यांचा आग्रह होता.

१९६२ साली काकासाहेब गाडगीळ हे साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले. ते उत्तम लेखक होते. त्यांची निवड झाल्यानंतर लोकांना त्यांनी काय सांगावे ? एका सत्काराला उत्तर देताना ते म्हणाले, " मी लेखण्या मोडा आणि बंदुका हाती घ्या असा संदेश देणार नाही." वस्तुतः त्यांना हवा तो संदेश द्यायला मोकळीक होती. सावरकरांनी जो संदेश दिला तो मी देणार नाही, असे सांगण्याचे काही कारण होते कां ? त्यांचे दुर्दैव असे की काकासाहेबांच्या वरील उद्गारानंतर बरोबर पंधरा दिवसांनी चीनने भारतावर स्वारी केली आणि पं. नेंहरुंपासून प्रत्येकजण सांगू लागला की, " सैन्यात चला."

आपलें सैन्य, देशाचें संरक्षण आणि युद्ध व्यवहार यांचे राज्यकर्त्यात किती अज्ञान होते याला काही सीमाच नाही. चीनचें आक्रमण किती दिवस चालणार याची कोणालाच कल्पना नव्हती. त्यावेळी कृष्ण मेनन हे देशाचे संरक्षण मंत्री होते. त्यांनी एकें ठिकाणी असे सांगितले की, " या वेगाने जर चिनी आले तर बहुतेक महिन्या दीड महिन्यात ते मद्रासला येतील." संरक्षण मंत्र्यांच्या अकलेचे कौतुकच केलें पाहिजे. चिनी आले तें नेफामध्ये. १६००० ते २०००० फूट उंचीवर हिमालयात. त्याखाली ब्रह्मपुत्रेचे अजस्त्र खोरे. तेथून मद्रास १००० मैल दूर. मध्यंतरीच्या काळात पंजाबातील सैन्य तिकडे नेता आले असतें, वाटेत अडवता आले असते. अनेक मार्गांने प्रतिकार करुन चिन्यांना रोखणे शक्य होते. परंतु संरक्षण मंत्रीच सांगू लागलें की, चिनी महिनाभरात मद्रासला येतील. जणू त्यांना तिथे बसेस घेऊन जाण्याचेच काम दिलेले होतें. दिसले चिनी की चला घेऊन त्यांना मद्रासला.

पं. नेहरूंनी आकाशवाणीवरील आपल्या भाषणांत सांगितले की, " My heart goes to the people of Assam." याचा अर्थ आसाम चिन्यांच्या हाती गेला. चिनी सैन्य अद्याप तेंजपूरपर्यंत पोहोचलेले नाही आणि तरी नेंहरुंचे हे उद्गार ! ज्या नेंहरुंकडे आसामची जनता मोठ्या आशेने पाहत होती त्या नेहरुंचे संरक्षणाबद्दलचे हें अज्ञान. देशाच्या संरक्षणाचा आमच्या नेतृत्वानें गांभीर्याने कधी विचारच केला नाही. " रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले " या प्रश्नाला कॉंग्रेसजन " आम्हा मिळाले " असे उत्तर देत. खरे म्हणजे दुसऱ्या महायुद्धाचा अपरिहार्य परिणाम म्हणून इंग्लंडला भारताचे राज्य सोडून द्यावे लागले. १९६२ साली

चिन्यांना विजय मिळाला याचें कारण "Power flows out of the barrel of a gun," हें तत्त्वज्ञान त्यांनी जोपासले. पं. नेहरुंचे पंचशील करार व शांततेचें तत्त्वज्ञान त्यांनी आपल्या आक्रमणाने हास्यास्पद बनवून टाकले. कबुतरे उडवल्याने जगात शांतता नांदते या भ्रमाचा भोपळा फुटला. पं. नेहरुंची देशभक्ती कमी लेखण्याचा माझा उद्देश नाही. तो फार मोठा मनुष्य होता. पण एकूणच आपण भारतीय स्वप्नाळू. आपल्याला फक्त गोमटी स्वप्ने पहावीशी वाटतात. याउलट सावरकर अत्यंत वास्तववादी होते.

१९४७ साली आपल्याला स्वातंत्र्य मिळाले. सावरकरांना फाळणीचे अतिशय दुःख झाले. तरी त्यांनी आपल्या घरावर तिरंगा फडकाविला. 'तीन चतुर्थांश देश स्वतंत्र होईल, असें कुणाला स्वप्नात तरी वाटलें होते का ? आम्ही अंदमानात गेलो तेव्हा वाटलें होतें का की हा देश आपल्या हयातीत स्वतंत्र होईल ? आमचे आयुष्य संपल्यानंतर स्वातंत्र्य मिळेल असे वाटले होते. परंतु याचि देही हा देश स्वतंत्र झालेला पहायला मिळाला याचा आनंद आहे,' अशी त्यांची प्रतिक्रिया होती. देशाचा एक तृतीयांश भाग गेल्याचे दुःख आहे पण देशातील तरुण लोक पराक्रम करून तो भाग परत मिळवतील असा विश्वास त्यांना होता. स्वातंत्र्य मिळालें तेव्हा सावरकरांनी सांगितले की, देशाच्या सीमा शोधून काढा, त्यांचा तपास करा. एक कोटी सैन्य उभारा व या सीमांचे संरक्षण करा.

१९६२ साली चीनने भारतावर स्वारी केली. १९४७ ते १९६२ या पंधरा वर्षात आपल्या देशाच्या सीमा लडाखमध्ये कुठे आहेत याचा कोणालाही पत्ता नव्हता. १२००० चौरस मैलांचा आपला प्रदेश चीनने बळकावला. चीनने त्या भागातून एक पक्का रस्ता काढला. त्याच्या उद्घाटनाला आपल्या वकीलाला बोलावलें. आपला पेकिंगमधील वकील तेंथे टाळ्या वाजवायला हजर होता. तो रस्ता भारतीय प्रदेशातून गेलेला आहे याचा सरकारला पत्ताच नव्हता. नेंफामध्ये हीच परिस्थिती. तेथेही आपल्या सीमा माहीत नव्हत्या. नेफामध्ये आपली सीमा नेमकी कोठपर्यंत आहे ते पहायला भारतीय लष्करातील एकही अधिकारी १९५८–५९ सालापर्यंत आपल्या सीमेपर्यंत गेलेला नव्हता. देश आपला आहे, पण देशाच्या

संरक्षणाची जबाबदारी ज्यांच्यावर त्यांनाही देशाच्या सीमा माहीत नाहीत. या पार्श्वभूमीवर देशाच्या सीमा शोधा हा सावरकरांनी दिलेला सल्ला त्यांचे द्रष्टेपण स्पष्ट करतो.

देश स्वतंत्र झाला तेव्हा देशाचे सैन्यदल अडीच ते तीन लक्ष एवढे होते. "एवढे सैन्य कशाला हवे, सैन्य कमी करा," असा उपदेश आचार्य कृपलानींनी केला. राजेन्द्रबाबूंनी त्याला पाठिंबा दिला. आपला देश शांततावादी असतांना एवढे सैन्य कशाला असा त्यांचा सवाल होता. पोलिस यापेक्षा जास्त होते, तें वाढवले तरी चालतील पण सैन्य कमी करा, असे त्यांचें प्रतिपादन होते. आपलें अर्थशास्त्रीसुद्धा विचारत की सैनिकी सामर्थ्यावर एवढा खर्च कशाला ? रणगाडा बनवायचा तर त्याचा उपयोग काय ? असा ते प्रश्न विचारीत. मोरारजी देसाई लोकसभेत असे म्हणाले की, आपल्याजवळ शस्त्र असायला हरकत नाही, पण ती बचावात्मक हवीत, आक्रमक नकोत. ही काय भानगड आहे ? शस्त्रे दुसऱ्याला मारण्यासाठीच असतात. ती केवळ बचावात्मक कशी काय असू शकतील ? आज आपल्याला कदाचित हास्यास्पद वाटेल पण असें दुधखुळे वादविवाद त्याकाळी पार्लमेंट-मध्ये गंभीरपणे चालत असत व "We should not have aggressive weapons but only defensive weapons," या सारख्या वाक्याला टाळ्या पडत. देशाच्या नेतृत्वाचा संरक्षणविषयक जाणीवेचा आवाका किती सुमार होता हेच यावरून स्पष्ट होते. चिनी, पाकिस्तानी आक्रमणानंतर आता आपले सैन्यदल १०–११ लक्षापर्यन्त जाऊन पोहोचले आहे. संरक्षणा-विषयी निकोप व वास्तववादी दृष्टीकोन असणाऱ्या सावरकरांचा हा एक प्रकारे विजयच आहे. सैन्यदलात वाढ झाल्यामुळे अर्थव्यवस्थेवर काहीही विपरीत परिणाम झालेला नाही, विपरीत परिणाम भ्रष्टाचारामुळे होतो, अव्यवस्थेमुळे होतो.

सावरकरांच्या तत्त्वज्ञानात आणि चिंतनात देशाचें संरक्षण या विषयाला सर्वाधिक महत्त्व आहें. देशाचे संरक्षण प्रथम, बाकी साऱ्या गोष्टी दुय्यम असे त्यांचे मत होतें. सावरकरांनी जे जे या संदर्भात सांगून ठेवले ते भारत सरकारला पुढेमागे करावे लागले. त्यांच्या दूरदृष्टीची झेप फार मोठी होती.

दोन जन्मठेपेची क्रूर शिक्षा भोगण्यासाठी सावरकरांनी अंदमानच्या किनाऱ्यावर पाऊल ठेवले. अंदमानातील त्यांच्या थरारक अनुभवांचे वर्णन त्यांनी 'माझी जन्मठेप' मध्ये करून ठेवले आहे. त्यात त्यांनी अंदमान बेटांचेही तपशीलवार वर्णन करून ठेवले आहे. या बेटावरील लोक कसे आहेत, भारतीयांनी त्यांच्याशी कसा व्यवहार करायला हवा याचे सविस्तर वर्णन त्यांनी केले आहे. अंदमान हा युद्धशास्त्राच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा द्वीपसमूह आहे. तो स्वतंत्र भारताचा नाविक तळ झाला पाहिजे हे त्यांनी १९२७ सालीच सांगून ठेवले. अंदमान हा उत्तम नाविक तळ झाला तर पूर्वेकडून येणाऱ्या आक्रमक नाविकदलाला प्रथम टक्कर घ्यावी लागेल ती अंदमानपाशी. जगले वाचले तर मग त्याला पुढे जाता येईल. जन्मठेप भोगतांनासुद्धा त्यांच्या मनात विचार कोणता, तर या बेटांचा देशाच्या संरक्षणासाठी उपयोग होऊ शकेल याचा.

अगदी अलिकडील एक प्रसंग. १९६० साली संयुक्त महाराष्ट्र झाला त्यावेळची गोष्ट. त्यांची मुलाखत घेण्यासाठी गेलो होतो. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीच्या संदर्भात सावरकरांची प्रतिक्रिया जाणून घ्यावयाची होती. सावरकर म्हणाले, "मला या घटनेंचे मुळीच महत्व वाटत नाही. या गोष्टी क्षुल्लक आहेंत. आपला अर्धा देश गेला आहे आणि तुम्ही कसले भाषेचे वाद घेऊन बसला आहात. जे गमावले त्याबद्दल चिंता दिसत नाही आणि काही भूप्रदेश इकडचा तिकडे गेला तर आपण मारामाऱ्या करतो. जी देवाणघेवाण होईल ती भावाभावातच होईल ना ? मला चिंता वेगळीच आहे, जे विभाजनात गेले त्याबद्दल काय ?" दुसऱ्या दिवशी संयुक्त महाराष्ट्र स्थापनेचा सोहळा होता, त्यामुळे हे प्रसिद्ध करण्याची हिंमत झाली नाही. पण त्यानिमित्ताने त्यांनी जो संदेश दिला तो महत्वाचा आहे. ते म्हणाले, "आता संयुक्त महाराष्ट्र झाला आहे. आपला लढा संपला आहे. यापुढे **महाराष्ट्र हा भारताचा खड्गहस्त झाला पाहिजे.** पंजाबी लोक तिकडे आपल्या सीमांचे रक्षण करीत आहेत आणि आपण शिवाजीचे वंशज मात्र साखरेचे आणि गादीचें राजकारण करण्यात दंग आहोत. लष्कराकडे वळतोय् कोण ? लक्षात ठेवा, देशाच्या संरक्षणाची जबाबदारी महाराष्ट्रावर आहे म्हणून महाराष्ट्र हा देशाचा खड्गहस्त झाला पाहिजे."

सावरकर नावाच्या एका द्रष्टया पुरूषाने संरक्षणाचे तत्त्वज्ञान आयुष्यभर सतत सांगितले. या देशातील तरूणांचीही काही जबाबदारी आहे. युद्धशास्त्रातील सर्व शाखांचा अभ्यास आपण केला पाहिजे. आपल्या व जगाच्या इतिहासातील लढायांची वर्णने वाचतांना संरक्षणाचे शास्त्र आणि तंत्र यांचा बारकाईने अभ्यास केला पाहिजे. प्रत्येकाला असा अभ्यास करता येतो. इतिहास वाचताना नीट लक्ष दिले तर अनेक गोष्टींचा उलगडा होऊ शकतो. लढाईत विजय अथवा पराभव झाला असेल तर तो कां झाला, त्या लढाईत कोणती तंत्रे वापरली गेलीत, कोणत्या शस्त्रांचा वापर केला गेला, फसगत कोठे झाली, या साऱ्या तपशीलाचा अभ्यास झाला पाहिजे. देशाचे संरक्षण ही गोष्ट सर्वात महत्वाची, या भूमिकेतून नव्या पिढीने अत्यंत जागरुकपणे विचार करणे ही आजची सर्वात मोठी गरज आहे. सावरकरांचा संरक्षणविषयक विचार तरूणांना नक्कीच प्रेरणा देऊ शकेल.

★★★

# सावरकरांची कविता – दोन टिपणे

## ( १ )

**प्रा. शंकर वैद्य**

स्वा. सावरकरांच्या कवितेचा विचार करताना दोन टोकाची मते ऐकायला मिळतात. सावरकरांचा विशेष अभिमान असणारी मंडळी त्यांचा उल्लेख महाकवी म्हणून करतात तर एक वर्ग असा आहे की जो सावरकरांना प्रचारकी कवी मानून त्यांच्या कवितेतील कलात्मकतेकडे दुर्लक्ष करतांना आढळतो; कवी म्हणून त्यांचे योग्य मूल्यमापन करीत नाही. या दोन्ही टोकाच्या भूमिका बाजूस ठेऊन आणि कोठलाही पूर्वग्रह मनात न ठेवता सावरकरांच्या कवितेचा विचार करावयास हवा. हे करतांना या कवितेत काही चांगल्या गोष्टी आढळून येतील, तशाच काही मर्यादाही आढळून येतील.

या विवेचनाच्या ओघात येथे अगदी सहजपणे रामदासांचीही आठवण होते. तुकाराम महाराजांना ज्या सहजतेने कवी म्हणून गौरविले जाते त्या सहजतेने रामदासांचा गौरव रसिकांकडून होत नाही. त्यांचा विचार प्रामुख्याने एक उपदेशक, तत्त्वचिंतक आणि प्रचारक या दृष्टीनेच केला जातो. याला काही सबळ कारणे आहेतही, परंतु समर्थांचे कवित्वही वाखाणण्यासारखे आहे ही गोष्ट मात्र लक्षात घेतली जात नाही. तसेंच रामदासांबाबत आणखी एक विकल्पही आढळतो. इतर संत कवी उदार, मानवताप्रेमी, पुरोगामी विचारसरणीचे होते अशी त्यांची प्रतिमा समाजमानसात, निदान समाजातील काही मंडळींच्या मनात आहे आणि याच्याचबरोबर रामदासांची प्रतिमा मात्र, त्या तुलनेने ते प्रतिगामी विचारांचे संत आहेंत अशी आहे. याची कारणे अनेंक आहेत. विठ्ठल या दैवताऐवजी रामदासांनी कोदंडधारी राम ही देवता प्रधान मानली; समाजाला लढण्यास प्रवृत्त केले. महाराष्ट्रधर्म सांगितला, समाजाला ‘व्यवहारा’ची शिकवण दिली; तसेच वर्णाश्रमधर्माची चौकटही त्यांच्या मनात होती. ही कारणे मनात धरून रामदासांच्या लेखनाकडे व कवित्वाकडेही बघितले जातें; आणि त्यांच्या मनातील उदार भूमिका ही दुर्लक्षिलीच जाते. सावरकरांच्या बाबतीतही असेच काहीसे घडते.

मला अनेकदा असे वाटते की रामदास व सावरकर यांचा अनेकांना धाक वाटत राहतो याचे एक कारण म्हणजे त्यांचे लेखन आरामखुर्चीवर बसून व गादीवर पडून आरामात वाचता येत नाही. ज्या पद्धतीने आपण बालकवी वाचू शकतो तितक्या निर्धास्तपणे या कवींचे लेखन वाचता येत नाही. कारण रामदास व सावरकर हें दोघेही तुम्हाला लागलीच कर्तव्याची जाणीव करून द्यायला लागतात, तुम्हाला धोक्याचा इषारा देतात, प्रसंगी कामाला जुंपतात आणि हेच रसिकाला नको असते. त्याला अनेकदा निर्भेळ मनोरंजन हवे असते. ते येथे फारसें घडत नाही. या दोघा कवींची श्रेष्ठ व कलात्मक कविताही मनाला कुठेतरी कर्तव्याची जाणीव करून देत राहते आणि 'आरामशीर आस्वाद' घेऊ पाहणाऱ्या व्यक्तीला हें ओझे नकोसे वाटते. आपण सुखास्वादाची अपेक्षा करायची व त्यांनी यज्ञ, बलिदान, ऋकचतीक्ष्ण (करवतीसारखे तीक्ष्ण) कर्तव्य, बद्धता–संग्राम या भाषेत बोलत राहायचे हे अनेकांना परवडत नसावे ! तेव्हा विषय–आणि विचार यांचे वावडे सोडून या दोन्ही कवींच्या काव्याकडे वळायला हवे. तसेच हे कितपत प्रतिगामी आहेत याचाही एकदा न्याय्य विचार व्हायला हवा. सावरकर तर कित्येक बाबतीत पेलवणार नाहीत व पचणार नाहीत एवढे क्रांतिकारक पुरोगामी आहेत असे आपणास आढळून येईल.

अखिल विश्वाच्या योगक्षेमाचा विचार सावरकरांनी केला आहे. 'विश्वाचिया अखिल मंगल धारणाला ! बोला हवे कवण भक्ष्य हुताशनाला?' असे त्यांनी विचारले आहे. 'मरणोन्मुख शय्येवर' या कवितेत मृत्यूला आवाहन करतांना, त्याला उद्देशून त्यांनी म्हटले आहे की जन्माबरोबर येणारी अनेक ऋणे मी फेडली आहेत. वेद आणि संत–ततींच्या 'चरणां'चे तीर्थ घेऊन मी ऋषिऋण फेडले; अंदमानात एक तप तपस्या करून देवऋण फेडले आणि पितृऋणातून मुक्त होण्यासाठी व निपुत्रिक अवस्थेतून सुटण्यासाठी मी शास्त्राला अनुसरून दत्तविधान करून हे अखिल अभिनव भारत दत्तक घेतले आहे. आता जेथे जेथे पाळण्यात बालक दिसते तेव्हा तेव्हा सृष्टीचे कुतुहल मीच पाहात असतो. त्याच्या भाळावर जेव्हा नव उन्नती, शील, उदयोन्मुख तेज यांचे दर्शन घडते तेव्हा आमच्या वंशाच्या भावी गौरवाच्या नव आशा, उच्च आकांक्षा माझ्या मनात उदित होऊ लागतात. सावरकर पुढे सांगतात की, 'केवळ भारताच्या गौरवासाठी हे घडत नाही. हे मानवी

वंशाच्या गौरवासाठी घडते!' आणि याही पुढे जाऊन सावरकर म्हणतात, 'अखिल मानवांच्या यौवनात मी माझे यौवन अनुभवीन.' सावरकरांचे या संबंधातले शब्द असे आहेत :

फेडाया पितृ–ऋणासि आजि अहो मीं
शास्त्राते अनुसरोनि, दत्तविधानें,
निपुत्रिकत्व वरियलें : पुत्र अखिल हें
अभिनव भारतची मम ! जेथ जेथ कीं
पाळण्यांत विकसतसे नयन–कमल तें
तेथ तेथ मीच बघें सृष्टि–कुतुहला.
नव उन्नति शील भालपटलिं दिसत जै
उदयोन्मुख तेज तरुण, तैं पुनः पुन्हा
माझ्याही उदयोन्मुख होति हृदीं या
आशा नव, आकांक्षा उच्च, भावि त्या
आमुचिया वंशाच्या गौरवाचिया–
भारतीय केंवल ना, मानवीय ही
वंशाच्या गौरवार्थ ! अखिल मानवी
यौवनांत अनुभवीन यौवनास मी

याच कवितेत ते पुढे सांगतात की, मानवाच्या आत्यन्तिक आत्महिताच्या धारणासाठी सज्जनांना जी कार्ये अनुकूल वाटली ती मी धर्म्य मानली आणि त्या अनुसारे माझा जो कर्तव्याचा वाटा होता तो मी यथाशक्ती व यथापरिस्थिती उचलला आहे. सावरकरांनी मानवी सुखाचा, मानवी हिताचा विचार कसा केला आहे हे स्पष्ट दिसते.

पण सावरकर जगाचा सर्व व्यवहार पाहूनही स्वतःच्या देशाचा व्यावहारिक दृष्टीने विचार करणारे आहेत. हा देश माझा आहे आणि त्याच्याशी माझे भवितव्य निगडीत आहे. या देशाची संस्कृती, परंपरा माझी आहे. यांत काही गौरवास्पद आहे आणि यांत काही लांच्छनास्पदही आहे. मला नीट जगायचे असेल तर मला माझ्या भोवतालची परिस्थिती बदलली पाहिजे हा विचार करताना सावरकर एका राष्ट्रवादी भूमिकेवर स्थिर होतात. सावरकरांचा हा राष्ट्रवाद अनेकांना मानवतेच्या विचारापुढे सीमित स्वरूपाचा, संकुचित स्वरूपाचा वाटू लागतो.

सावरकरांनी आपल्या देशाच्या स्वातंत्र्याला आणि राष्ट्राच्या उभारणीला अग्रक्रम आणि अनन्यसाधारण महत्त्व दिले. आपले सर्वस्व त्यांनी त्या कार्यालाच लावले. आपले वक्तृत्व आणि वाग्विभवही भरतभूमीलाच अर्पून तिच्या कार्यास लावले. हे करताना कवितेचा एक साधन म्हणून उपयोग केला गेला ही गोष्ट खरी आहे. परंतु त्याबरोबर हेही तितकेंच खरे आहे की या बंदिस्तपणातून सुटून मुक्तपणे आविष्कृत झालेली सावरकरांची कविताही बरीच आहे. तिच्या काही वेगवेगळ्या परी आहेत. एक म्हणजे राष्ट्रीय हेतूने लिहिलेल्या पण उत्तम जमून गेलेल्या अशा त्यांच्या कविता आहेत. ज्यांत त्यांच्या पोवाड्यांचा उल्लेख करता येईल; 'आकांक्षा' या दीर्घ कवितेचा उल्लेख करता येईल. यातच त्यांचे 'कमला' हे दीर्घकाव्य आणि 'विरहोच्छ्वास' हे खंडकाव्य यांचाही अंतर्भाव करता येईल. दुसरा प्रकार म्हणजे तें जे आयुष्य जगले त्या अनुभवाचे रूपच राजकारण, बंदिवास यांच्याशी निगडीत अशा स्वरूपाचे असेच आहे. 'सागरास' (१९०९) ही कविता हा त्यांचा या स्वरूपाचा अनुभव. 'स्वतंत्रतेचें स्तोत्र' अशा ध्यासातून स्फुरलेलें आहे. 'सायंघंटा' (अंदमान १९१३), 'निद्रे' (१९१४), 'आत्मबळ' (१९१० समुद्रमार्गात लिहिलेली कविता), 'मरणोन्मुख शय्येवर' या त्यांच्या कविता हा त्यांचा स्वतःचा अनुभवच आहे. 'मूर्ति दुजी ती', 'चांदोबा चांदोबा भागलास कां' या कविताही अशा अनुभवाशी निगडीत अशाच आहेत. तिसरा प्रकार याहून वेगळा : ज्यात 'जगन्नाथाचा रथ', 'अज्ञेयाचे रूद्धद्वार' अशा कवितांचा समावेश करता येईल. शिवाय त्यांच्या काही प्रेमकविता आहेतच. मुद्दा असा की, कवितेचा साधन म्हणून उपयोग केला असल्यामुळे त्यांच्या कलागुणांना काही ठिकाणी बाध निर्माण झाला आहे हे खरे असले तरी या पलिकडे असलेली सावरकरांची कविता आहे जी कलादृष्टयाही मानावी लागते. त्यातील काही चांगल्या कवितांचा उल्लेख वरती केला आहे. सावरकरांच्या दीर्घ रचनेत (ज्यात गोमंतक, कमला, महासागर, विरहोच्छ्वास यांचा प्रामुख्याने समावेश होतो) विशेषतः गोमंतकात जे दोष निर्माण होतात ते केवळ तें काव्य प्रचार हेतूने राबवले जाते यामुळे नव्हे. कथेसाठी अवश्य असलेली बांधणी, व्यक्तीचे व्यक्तित्व फुलू देऊन घडविलेले त्यांच्या मनाचे सूक्ष्मदर्शन यांत कोठेतरी कमतरता राहात जाते. त्यांची व्यक्तिचित्रणे एकदेशीय ठरतात. सावरकरांच्या या काव्यात अशा उणीवा निर्माण होत जातात. मात्र 'कमला' व 'विरहोच्छ्वास' ही दोन काव्ये या तुलनेनें बरीच यशस्वी

ठरतात. कमला या काव्यात एका मुग्ध मुलीच्या मनाचा आणि शरीराचा विकास निसर्गक्रमानुसार कसा घडतो आणि पुढे पतीशी होणाऱ्या पहिल्या समागमाचा प्रसंग पुढे येऊन कसा ठाकतो हाच मुख्य विषय आहे. सावरकरांनी त्याची पुढे राष्ट्रकारणाशी सांगड घालून दिली आहे खरी; परंतु तोवर जे कथानक घडत गेले तिथेच त्या काव्याचे श्रेय त्याला मिळून जाते. सावरकरांमधला कलावंत एखादा नाजूक विषय कसा रसास्वाद घेत, धिटाईने चितारतो याचे हृद्य दर्शन येथे घडते. या दृष्टीने कमला हे एक वेगळ्या विषयावरील मराठीतील दीर्घ काव्य आहे. विरहोच्छ्वासाची रचना स्वतंत्र स्वरूपाची आहे. अनेक गीतांतून त्याची गुंफण झालेली आहे. त्यातील कितीतरी गीते सुंदर अशी आहेत. त्यांत येणारे प्रेमाचे माहात्म्य अतिशय वेधक असे आहे. मराठी प्रेमकवितेतही स्वतंत्रपणाने उमटून दिसावे अशा मोलाचें आहे. पण संपूर्ण काव्य एक कलाकृती म्हणून तडीस न्यावे हे येथेही घडत नाही. मात्र ही सर्व दीर्घ काव्ये–खंडकाव्ये वाचली; त्याच्याच जोडीला 'आकांक्षा'सारखी सुंदर, रूपकात्मक दीर्घ कविता वाचली की ही प्रतिभा महाकवीची होती यात शंका राहात नाही. तिला मूर्त रूप जे मिळाले आहे त्यात यशस्वी महाकाव्याच्या दृष्टीने उणिवा राहून गेल्या आहेत हे पाहून हळहळ वाटते. कला ही सर्वस्व मागणारी आणि राष्ट्रनिष्ठा हीही सर्वस्व मागणारी हा एक पेच काही प्रतिभावान कवींच्या बाबतीत निर्माण होतो. याबाबतीत राष्ट्राच्या बाजूने कौल देऊन सावरकरांनी हा पेच स्वतःपुरता सोडविला असे आढळून येते.

## (२)

**प्रा. डॉ. द. दि. कुलकर्णी**

मी सावरकरांच्या साहित्याचे दोन ठळक भाग मांडतो. सावरकरांची कविता आणि त्यांचे निबंध वाङ्मय. त्यांची कविता ही मी रत्नागिरीपूर्व कालखंडातील गृहित धरलेली आहे. तिचा स्वतंत्र अभ्यास व्हायला पाहिजे. तसेंच त्यांच्या निबंध वाङ्मयाचा सखोल विचार झाला पाहिजे. या वाङ्मयात त्यांचें विचार अनेक तपशीलासह आलेंले आपल्याला दिसतील कारण ते

Applied Form मध्ये आहेत. सावरकर जेव्हा राजकारणात उतरले तेव्हा आपलें तत्त्वज्ञान राजकारणात कसे लावून दाखवायचे, आपली कृतिशीलता प्रत्यक्षात आणायची तर काय केलें पाहिजे, याचा तपशील त्यांच्या निबंधात येतो.

सावरकरांची कविता मात्र केवळ वाचून कळत नाही. त्यातील रचना (छंदोबद्धता) वेगळी आहे. सावरकरांचें वैनायक वृत्त आपल्या कानांवर कधीच पडलेले नसल्यामुळे ते वाचतांना अडचण होते. त्यात भर म्हणजे त्यांच्या कवितेत संस्कृत शब्द, तसेंच त्यांनी स्वत: तयार केलेलें शब्द येतात. सावरकर फापटपसारा कधीही मांडत नाहीत. कवितेतसुद्धा इतके अचूक, मोजके, नेमके, तर्कशुद्ध शब्द ते वापरतात की वाचकाला प्रत्येक शब्दाकडे सावधपणे पाहावे लागते. याचा अर्थ त्यांची कविता दुर्बोध आहें वा त्यांच्या आविष्कारात दुर्बोधता आहे असे नव्हे. वाङमयातील दुर्बोधता हे वेगळे प्रकरण आहे. कधी कवीला आपण जो अनुभव घेतो तोच समजलेला नसतो म्हणून कविता दुर्बोध होते, तर कधी आलेल्या अनुभवाचें आकलन होऊनही अभिव्यक्तीसाठी प्रतिभा वा शब्दप्रभुत्व नाही म्हणून ती दुर्बोध होते. सावरकरांच्या कवितेबाबत असे काहीही म्हणता येणार नाही. त्यांच्या कवितेत व्यक्त झालेली भावना स्पष्ट आहे, त्यामागचा विचार त्याहून ठाम आहे आणि अभिव्यक्तीमाध्यम स्वनिर्मित असल्यामुळे अडचण नाही. कदाचित आजच्या पिढीच्या भाषेपासून ही कविता वेगळी असल्यामुळे ती सुबोध करण्याचे काम करावे लागेल.

कवितेत सावरकर तत्त्वरूप आहेत. त्यात सावरकरांचा जीवनविषयक दृष्टीकोन अत्यंत अचूकतेने आणि तीव्रतेनें, सर्व खोली आणि व्यापकता घेऊन आलेला आहे. मी त्यांच्या 'आत्मबल', 'मूर्ति दुजी ती' आणि 'मरणोन्मुख शय्येवर' या तीन कविता वेगळ्या काढतो. यामध्ये सावरकर एक एक पाऊल टाकत तत्वज्ञानाच्या स्तरावर गेलेले दिसतात.

सावरकरांचे तत्त्वज्ञान अथपासून इतिपर्यंत एकच आहे, भक्कम आहे. त्यामागे भगवद्गीता उभी आहे. भगवद्गीतेच्या शब्द योजनेतून ते आपले विचार व्यक्त करतात. गीतेतील कितीतरी श्लोक त्यांनी चरणरूपानें आपल्या कवितेत घातलेले आहेत. मंडालेच्या तुरुंगात लो. टिळक गीतारहस्य

लिहीत होते त्यावेळी ते जीवनात उतरविण्याचा सावरकर प्रयत्न करीत होते, हे ध्यानात घेतले पाहिजे. तो निष्काम कर्मयोग सावरकरांच्या कवितेत आहे. सावरकरांच्या कवितेंची बैठक ही लोककल्याणाची व निष्काम कर्मयोगाची आहे.

मरणाची कल्पना त्यांच्या कवितेत कां येतें ? सामान्यत: प्रत्येक कवी आईवर आणि मृत्यूवर कविता करतो. पण सावरकर जेव्हां मृत्यूवर लिहितात तेंव्हां ते मृत्यूशी सतत मुकाबला करीत असतात. जे हौतात्म्य त्यांनी पत्करलेलें आहे त्याचे स्तवन करणाऱ्या या कविता आहेत. नव्हे, अखिल भारतीय हौतात्म्याचे ते स्वतन आहे. त्यांनी असे म्हटले आहे –

पूजितसे मी कवणाला
पूजितसे मी अपुल्याला
अपुल्यामाजी विश्व पाहूनी
पूजितसें मी विश्वाला.

‘ तसे जेथे जेथे हौतात्म्य आहें त्या सगळ्याचें मी स्तवन करतो, केवळ माझेच नव्हे,’ असे ते म्हणतात. हे हौतात्म्य काय आहें ? मरण काय आहे ? मदनलाल धिंग्राने मृत्यूचे आव्हान स्वीकारले. फाशी जाण्यापूर्वी त्यानें न्यायालयात जे वक्तव्य दिले त्यामागे सावरकर आहेत, त्यांचे तत्त्वज्ञान आहे. हे सर्व तत्वज्ञान ‘ मरणोन्मुख शय्येवर ’ या कवितेत वाचावयास मिळते. आपल्या असे लक्षात येईल की, सावरकर हा क्रांतिशील, अत्यंत आक्रमक पवित्रा घेणारा मनुष्य आहे. मृत्यूपुढेसुद्धा तसा तो नमलेला नाही. मृत्यूलासुद्धा, ‘ ये, मी तुझं स्वागत करायला उभा आहे,’ असे तो म्हणतो. ‘ मी कां स्वागत करूं शकतो ? तर जन्माला आल्यानंतर जी जी ऋणं फेडायची असतात, ती मी फेडलेंली आहेत. देशऋण, देवऋण, पितृऋण फेडलेले आहे. मुलगा नाही, पण अभिनव भारत माझ्या मुलासारखे आहे. नव्हे, जेथे जेथे पाळण्यात मूल आहे तेंथे तेथे मीच त्या रूपाने सृष्टीचे कुतूहल पाहातो आहे. माझ्या यौवनाची राख झाली असे म्हणायला मी तयार नाही.’ पुढे ते असें सांगतात, ‘ मृत्यो, तुला असं वाटत असेल की मी सगळं गमावलं आहे, तर ते बरोबर नाही. माझ्याजवळ अशा अनेक गोष्टी आहेत की ज्यांच्या आधारे मी तुझ्याशी मुकाबला देऊ शकतो.’ ‘ मृत्युची जी अंधारलता आहे, तिला उद्याचे फूल फुलणार असेल तर त्या पुनर्जन्माची मी वाट पाहीन. ज्याने आपला प्रत्येक

क्षण लोककल्याणासाठी घालविला आहे, असा मी हे बोलतो आहे. श्रीकृष्णाने गीतेत आम्हाला एक ओळखपत्र देऊन ठेवले आहे. ते असें की, ज्यानें ज्यानें लोककल्याण केले आहे त्याला दुर्गती कधीच लाभणार नाही.'

वयाच्या विशीपासून बोलणारे हे सावरकर आहेत. या वयात आपण कोणते विचार करतो याचे जरा स्मरण करा. या वयात सावरकर मोठ्या हिंमतीने मृत्युशी बोलतात. ते म्हणतात, 'समजा तुम्ही असें मानत असाल की जन्म म्हणजे काही देहतत्वांचें संघटन, आणि मरण म्हणजे देहाचे विघटन, तर हें विघटन होऊ दे, ते सर्वांत विलीन होऊ दे.' हा फार मोठा विचार आहे. 'मी देहरूपाने लहान होतो तो मृत्युमुळे विश्वरूपात विलीन झालो.' हे मृत्युचे स्वरूप सावरकर पाहतात. पुढे जाऊन ते असे म्हणतात, 'राजकीय स्वातंत्र्य एवढेच मला अभिप्रेत नाही, तर मानव मुक्त झाला पाहिजे. माझ्यातील मी जेव्हा मुक्त होऊन विश्वातील मी मध्ये विलीन होईन तेंव्हांच खरे स्वातंत्र्य, मुक्तता लाभेल. सावरकरांच्या या विचाराचा उल्लेख सहसा कोणी करीत नाही. पण मृत्यूला साक्षी ठेवून लिहिलेल्या त्यांच्या कवितेंत हे उल्लेख वारंवार येतात.

शेवटचा एक मुद्दा. एवढी मोठी अध्यात्मिक झेप असलेला हा वेदांती जेव्हा राजकारणात पडतो तेव्हा तो असे सांगतो की अध्यात्म महत्वाचे आहें, पण तेच ज्यांना करावयाचे आहे त्यांच्यासाठीच ते महत्त्वाचे आहे. राजकारण हें भौतिक किंवा ऐहिक स्तरावरचे आहे. या स्तरावरचे प्रश्न याच स्तरावर सोडवायचें असल्याने मला शस्त्र राजकारणात महत्त्वाचे वाटते. कृष्णाने किंवा रामाने ज्या कारणासाठी शस्त्र हाती घेतले त्यासाठीच मी शस्त्रवादी आहे. रामकृष्णांचे तत्त्वज्ञानच मी शस्त्ररूपाने वापरतो आहे.

सावरकरांच्या तात्त्विक भूमिकेंतील हे बारकावे नीट लक्षात घेतल्याशिवाय सावरकरांचे जीवितकार्य आणि त्यांचें वाङमय – विशेषतः त्यांची कविता साकल्यानें समजू शकणार नाही.

★★★

# निबंधकार सावरकर

प्रा. डॉ. व. दि. कुलकर्णी

आजकाल काही लेखक आणि त्यांचे साहित्य यांची उपेक्षा करणे ही एक फॅशन झाली आहे. त्यांत सावरकरांचा समावेश करण्यात येतो. परंतु खऱ्या अर्थानें जे महत्वाचें साहित्यिक आहेत त्यात सावरकरांची गणना करणे आवश्यक आहे. सावरकरांच्या साहित्याचा जो अभ्यास करील तो अभ्यास करण्यापूर्वी जसा होता तसा त्यानंतर राहणार नाही. कारण त्यांचे साहित्य हें विचार करायला लावणारे साहित्य आहे. तुम्ही कोण आहात आणि तुम्ही कोण असायला पाहिजे याचा विवेक करायला लावणारे हे साहित्य आहे. साहित्याने मनोरंजन करावे यात वावगे काही नाही. साहित्याने असे उदात्त मनोरंजन करावे आणि तसे मनोरंजन करणारे साहित्यही मोठे असू शकते. परंतु जे साहित्य अंतर्मुख बनविते आणि आपल्या जीवनाचा दृष्टिकोन तपासून घ्यायला लावते ते साहित्य श्रेष्ठ आहें असे मला वाटतें. वैयक्तिक आणि राष्ट्रीय जीवनातही अशा साहित्याचें महत्व मोठे आहे. सावरकरांचे साहित्य हें अशा स्वरूपाचे आणि दर्जाचे आहे.

निबंधकार सावरकर हा सरळ सरळ त्यांच्या वाङ्मयाशी जोडला गेलेला विषय आहे. मनुष्य आपले विचार निबंधातूनच व्यक्त करतो. निबंध हे सर्जनशील साहित्य नसून वैचारिक वाङ्मय आहे. ज्या वाङ्मयाचा आत्मा विचार आहे आणि विचाराची अभिव्यक्ती जेथे तर्कशुद्ध रीतीने केली जाते ते वाङ्मय म्हणजे निबंध वाङ्मय होय. निबंधात एक मूलभूत विचार असतो त्या विचाराची साधक–बाधक चर्चा करीत एका निर्णयाकडे लेखक जात असतो. ही पद्धती शास्त्रीय आणि तर्कनिष्ठ अशी आहे. त्यामुळे सावरकरांच्या जीवनाचा आणि साहित्याचा आत्मा जर कुठे शोधायचा असेल तर तो निबंध वाङ्मयांत शोधावा लागेल.

मराठीतील निबंध वाङ्मय विपुल आहे, महत्वाचे आहे आणि ज्याच्या विषयी खूप अभिमानाने बोलावे असे आहे. अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा प्रारंभच निबंधापासून झाला. एकेक विचारवंत आणि सामाजिक व राजकीय कार्यकर्ते हे निबंधरुपातूनच आपल्यापुढे प्रकट झाले आहेत. अगदी बाळशास्त्री

जांभेकरांपासून (१८३२) वृत्तपत्राच्या आणि संपादकीयाच्या माध्यमातून विकसित झालेले एकेक टप्पे सहज दिसतील. टिळक, आगरकर हे ऐन तारुण्यामध्ये विचाराने झपाटलें होते. तो विचार प्रकट करण्यासाठी त्यांनी स्वतःचे असे एक आविष्कार माध्यम तयार केले. १८८९ नंतर आगरकरांनी 'सुधारक' या पत्रातून स्वतःचा आविष्कार केला तर शिवरामपंत परांजपे ह्यांनी 'काळ' ह्या आपल्या पत्राच्या माध्यमातून वैचारिक लेखन केले. आपल्या वर्तमानपत्रामार्फत जनतेशी सतत संबंध राखणे ह्या पुढाऱ्यांना शक्य होते आणि जनतेशी सतत संबंध राखणे अतिशय महत्वाचे असते. संपादकीय आणि स्तंभलेखन ह्या मार्फत हे वैचारिक लेखन व्यक्त झाले. 'संपादकीय' हा वाङ्मयाचा वेगळा प्रकार (Form of literature) नसला तरी तो एक एक वेगळा लेखन प्रकार (Form of writing) नक्कीच आहें आणि त्याचा अभ्यास वेगळ्या रीतीने केला पाहिजे. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी 'निबंधमाले' मध्ये ज्याला आपण वाङ्मयीन दृष्टचा निबंध म्हणू असें निबंध लिहिलेलें दिसतात. 'गर्व', 'लोकभ्रम' यासारखे अनेक निबंध अशा दर्जाचे आहेत. ह्या निबंधात लेखकाला जे सांगावयाचे आहें त्याचे तो प्रथम विधान करतो. त्या विधानाचे मग स्पष्टीकरण देतो. त्यानंतर खूप उदाहरणे देतो. काही प्रमाणे देतो. मग तो निर्णय देतो. जे सूत्र प्रारंभी विधान म्हणून लिहिलेले असते ते नंतर आपोआप निर्णय म्हणून येत असते. अशावेळी विधान, स्पष्टीकरण, उदाहरण, प्रमाण आणि निर्णय या रीतीने वैचारिक पातळीवरील तर्कसंगत क्रमाने हें लेखन होते आणि लेखकाला जे म्हणावयाचे आहे, जो विचार सांगावयाचा आहे तो विचार परिपूर्ण होतो. ही वैचारिक निबंध लेखनाची जी पद्धत आहे ती आपल्याला विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या निबंधात व्यवस्थितरित्या पहायला मिळते. येथे मराठी निबंध खऱ्या अर्थानें जन्माला आला. त्यानंतर पुढे आपल्याकडे जो ललित निबंधये ऊन गेला, किंवा वैचारिक परंतु लालित्याकडे झुकलेला तात्यासाहेब केळकरांचा निबंध येऊन गेला, तो जरा बाजूला ठेऊन शुद्ध वैचारिक निबंध लेखनाची शास्त्रशुद्ध पद्धती प्रकर्षाने पहायची असेल तर आपल्याला सावरकरांकडे यावे लागेल.

आपले निबंध वाङ्मय सावरकरांनी कोणत्या परिस्थितीत आणि कसे केले याची कल्पना असल्याशिवाय त्यांच्या निबंधाचा अभ्यास करता येणार नाही. त्यांच्या आयुष्याचे काही कालखंड लक्षात घेतले पाहिजेत. भगूर,

नासिकापासून फर्ग्युसन कॉलेज हा एक टप्पा, लंडनमधील वास्तव्य हा दुसरा टप्पा, अंदमानची अंधारकोठडी आणि रत्नागिरीची स्थानबद्धता हें पुढचे दोन टप्पे. १९३७ म्हणजे वयाच्या चौपन्नाव्या वर्षापासून सावरकर समाजामध्ये वावरताना आपल्याला दिसतात. १९२४ पासून १९३७ पर्यन्तच्या बारा तेरा वर्षात रत्नागिरीला राहून लिहिलेले त्यांचे साहित्य पुष्कळ आहे. हा सगळा तपशील अशासाठी आपण लक्षात ठेवला पाहिजे की टिळक, आगरकर, किंवा परांजपे ह्यांनी आणि सावरकरांनी जे वाङ्मय निर्माण केले त्यातील मूलभूत परिस्थिती आणि भेद आपल्या लक्षात यावा. ऐन तारुण्यात आपले विचार सातत्यानें व्यक्त करण्याचे साधन स्वतःच्या हाताशी ज्यांनी कायम ठेवले असे टिळक, आगरकर, परांजपे हे लेखक आहेत. सावरकरांजवळ असे स्वतःचे आविष्कार माध्यम नव्हते. रत्नागिरीला आल्यानंतर त्यांनी जे लेखन लेले तें 'किर्लोस्कर', 'स्त्री', 'मनोहर' किंवा 'केसरी' ह्यासारख्या दुसऱ्यांच्या नियतकालिकांमधून प्रसिद्ध झाले आहे. एखादी घटना घडली की त्यावरील प्रतिक्रिया पुढारी दुसऱ्या दिवशी देऊं शकतो. तसा जनतेशी आणि घडणाऱ्या घटनांशी सातत्याने संबंध राखणे सावरकरांना शक्य नव्हते. त्यामुळे जनतासंपर्क किंवा दैनंदिन घटनांशी त्यांचा संबंध राहिला नाही. परंतु त्यांचा संबंध तपशीलाशी न रहाता वैचारिक आशयाशी राहिला. ह्या दृष्टीनें इतर लेखकांपेक्षा हा निबंधकार वेगळा दिसतो. घटना घडत जातात त्यामागे कोणते सूत्र, सांस्कृतिक किंवा राष्ट्रीय तत्त्व आहे याचा विचार सावरकर करत जातात. ते सूत्र त्यांना मांडावयाचे असल्याने त्यांच्या मांडणीची पद्धती सुद्धा बदलतें. सावरकर तपशीलामागे न जाता त्यामागे कोणती वैचारिक भूमिका आहे हे पाहून निबंध लिहितांना दिसतात. स्वाभाविकच सावरकरांच्या निबंधाला खऱ्या अर्थाने वैचारिक निबंधाचें रूप लाभलेलें आहे.

सावरकर जेव्हा निबंध लिहू लागलें – म्हणजे १९२४ नंतर – तोपर्यंत मराठी निबंधाला जन्मून खूप वर्षे होऊन गेलेली होती. सावरकरांचा विचार करताना काळाचे हे सूत्र कधीही सोडून चालणार नाही. एका बाजूला सावरकरांची कविता ही केशवसुत संप्रदायाच्या समकालीन होती. त्यांची उत्कृष्ट कविता १९०० ते १९१० ह्या काळात लिहिली गेली. ते त्यांच्या कवितेचे सुवर्णयुग केशवसुत संप्रदायाच्या बरोबरचे आहे. परंतु त्यांचे नबंधयुग त्यांच्या समकालीनाच्या बरोबरीचे नाही. कारण की ज्यावेळी

सावरकर हे ह्या सर्वांच्या बरोबरीचे आहेत असे आपण म्हणतो तेव्हा त्यांचे लेखन कालदृष्टचा त्यांच्या बरोबरीचे नसते. सगळयांनी एकाच वेळात सारखे लिहिले आहे. सावरकरांच्या साहित्य प्रकारांची वेगवेगळया वाङ्मयीन सांप्रदायिकांशी तुलना करताना काळाचे हे अनुसंधान जर चुकले तर सावरकरांचे मूल्यमापन चुकेल.

सावरकरांचे निबंध जेव्हा लिहीले गेले तेव्हा मराठी वाङ्मयांत निबंध हा प्रगत झालेला साहित्य प्रकार होता. अर्थात सावरकर रुढ पद्धतीने निबंध लिहीत असत. सावरकरांच्या वाङ्मयात इंग्रजी अथवा मराठी साहित्याचे पडसाद कुठेही दिसणार नाहीत. साधारणतः असेही असते की उत्तरकालीन लेखक हा पूर्वकालीन लेखकाच्या प्रभावाखाली अथवा त्यांच्या छायेमध्ये लेखन करतो. म्हणजे त्यांत परंपरा दिसते, मग ती थांबतें आणि पुन्हा नवा प्रारंभ होतो. हें जे आपल्याला नेहमी पहायला मिळते ते सावरकरांच्या बाबतीत आढळणार नाही. कारण सावरकर हे परंपरेपासून दूर होतें. १९१० ते १९३७ ह्या काळात ते तुरुंगात व स्थानबद्धतेत असल्यामुळे त्यांचा प्रमुख प्रवाहाशी संबंध नव्हता. अशा अवस्थेत सावरकर स्वतःच स्वतःच्या ठिकाणी वाढत होते. त्यांनी आपल्या आत्मचरित्रात म्हटले आहे की 'माझा मीच पुढारी होतो. माझे मार्गदर्शन मलाच घ्यावे लागत असे. आणि ते मिळत असे.' हे फार महत्त्वाचे विधान आहे. स्वतःच्या हिंमतीवर ते वैचारिक नेंतृत्व करीत होते. राजकीय संघटन आणि राजकीय संघर्ष ते स्वतःच्या नेतृत्वावर करत होते. ह्याचा अर्थ त्यांच्यापाशी 'गॉडफादर' असा कुणीही नव्हता. त्यांचे अनुयायी यांच्या तुलनेने फार खुजें होते. बरोबरीचे अनुयायी मिळणे, ते मित्र होणे हे त्यांच्या बाबतीत घडले नाही. वैचारिक संघर्ष करण्यासाठी फारसे अनुकूल वातावरण त्यांना लाभले नाही. त्यामुळें मराठीतील विचारपरंपरेशी आणि वैचारिक वाङ्मयाशी त्यांचा फारसा संबंध आला नाही. म्हणून त्यानी जे लेखन केंले तें त्यांना जे जाणवले, व्यक्तिशः आणि तीव्रतेने जाणवले ते आग्रहीपणे आणि अभिनिवेशाने त्यांनी मांडलेले आहे. त्यांना जर खरोखरीचें पंधरा-वीस अनुयायी असते आणि त्यांच्यात सतत एक वैचारिक अभिसरण होत राहिलें असतें तर सावरकरांना समस्येची दुसरी बाजू समजून त्यांच्या विचारात थोडी लवचिकता आली असती. त्यांचा आग्रह आणि अभिनिवेश कमी

झाला असता आणि मांडणीतील धारही कमी झाली असती. सावरकरांच्या विचारात व मांडणीत कुठेही तडजोड, समतोलपणा किंवा दुसऱ्या बाजूची दखल हा प्रकार दिसत नाही. त्यांची बुद्धी ही सरळ एका दिशेनें इतक्या वेगाने जाते की एखादा तीर सुटावा आणि जें लक्ष्य आहे त्याला मारल्यानंतर ध्यानात यावे की तो तीर सुटला होता, अशी ही अतिशय शीघ्र गतीने लक्ष्यभेद करणारी बुद्धिमत्ता त्यांच्या निबंध वाङ्मयात दिसते. तिला इकडचे तिकडचें भान कां असत नाही ह्याची कारणे समजावून घेतली पाहिजेत. सावरकरांवर जेव्हा टीका होते तेव्हा अशा सर्व बाहेरच्या गोष्टी अवाङ्मयीन जरी असल्या तरी ऐतिहासिक समीक्षेमध्यें महत्वाच्या असतात. माणूस समजावून घेंतल्याशिवाय त्याची योग्य समीक्षा होंऊ शकत नाही. हे सगळें परिस्थितीचे कवच लक्षात घेतले की त्यामध्ये निर्माण झालेला सावरकरांचा निबंध नेंमका कोणता आणि कसा हे आपल्यांला बघता येईल.

समग्र सावरकर वाङ्मयाचा तिसरा खंड हा त्यांच्या निबंध वाङ्मयाला वाहिलेला आहे. त्यांतील हिंदुत्व हा निबंध खरे म्हणजें एक स्वतंत्र ग्रंथच आहे. एकाच विषयाला वाहिलेली लेखमाला म्हणजें निबंधचक्र. हिंदुत्व ह्या विषयाला वाहिलेले चक्र त्या अर्थाने हिंदुत्व हा एक ग्रंथ. त्यांचे महत्वाचे जे निबंध आहेत ते विज्ञाननिष्ठ निबंध हे सावरकरांचे खरे वैशिष्टच आहें.

सावरकरांच्या बाबतीत विचार करतांना आणखी एक दृष्टिकोन (Perspective) आपल्यासमोर ठेवतो. विष्णुशास्त्री चिपळूणकरांपासून वाङम-याचा पुन्हा एकदा विचार करूं. स्वदेश, स्वधर्म आणि स्वभाषा ही शास्त्रीबुवांची त्रिसूत्री होती. ह्या त्रिसूत्रीमुळे टिळक आणि आगरकर प्रभावित झाले होते. त्यांत टिळकांनी राष्ट्रीय शिक्षणाची भर घातली. स्वदेश, स्वभाषा, स्वधर्म, स्वराज्य आणि राष्ट्रीय शिक्षण यांचा एकत्रित विचार म्हणजे टिळकांचे जीवनसूत्र. आगरकर हें सुधारणावादी. त्यांचा सुधारणावाद हा व्यक्तिस्वातंत्र्यावर आधारित होता. नंतर शि. म. परांजपे ह्यांनी सशस्त्र क्रांतीचे सूत्र सांगितले. विद्यार्थी दशेत सावरकर फर्ग्युसन कॉलेजात असल्यामुळे त्यांचा या सर्व विचारप्रवाहांशी परिचय होता. त्यांनी शिवजयंती उत्सव सुरू केला. त्यामागील भूमिकेत टिळकांच्या चतु:सूत्रीचा अंतर्भाव होता. वाङमयाशी संबंधित नसले तरी या विचारांशी ते संबंधित असल्यामुळे सावरकरांच्या वैचारिक भूमिकेत स्वधर्माला महत्त्वाचे स्थान आहे. स्वभाषा

हे टिळकांनी थोडे मागे ठेवलेले सूत्र सावरकरांनी घेतले. आगरकरांचा सुधारणावाद व्यक्ती स्त्री आणि स्वातंत्र्यापर्यन्त सीमित झालेला होता. तोही सावरकरांनी घेतला नाही. सावरकरांच्या मते समाजसुधारणा ही विज्ञाननिष्ठ अशी सुधारणा आहे. म्हणजे विज्ञाननिष्ठा मराठी वाङ्मयातून आणणारे, हे सावरकरांचे वेगळेपण सांगता येईल. याबरोबरच अस्पृश्योद्धाराचा विचारही त्यांच्या निबंधात येतो. तो आधी उल्लेखिलेल्या तिघा विचारवंतामध्ये प्रकर्षाने आढळत नाही. अस्पृश्योद्धाराची प्रेरणा त्यांनी ज्योतिबा फुले किंवा अन्य कोणाकडून घेतली असेही झालेले नाही. त्या विचाराचे मूळ त्यांच्या हिंदुत्वनिष्ठेत सापडते. सावरकरांच्या विचारांचा शोध घेत असताना त्यांचें व्यक्तिमत्व स्वयंभू असेंच आहे हे आपल्या लक्षात येईल.

सावरकरांनी स्वतःची सूत्रे कधीच मांडली नाहीत. पण परंपरेशी अन्वय साधत साधत जर सूत्रे मांडायची झाली तर असे दिसेल की निज्ञाननिष्ठा आणि त्यावरील अतूट श्रद्धा हें त्यांच्या वाङ्मयात प्रामुख्याने आलेले आहे. विशेषतः हिंदुत्वनिष्ठेच्या अंगाने आलेले आहे. सावरकर जेव्हा निबंध लिहितात तेव्हा या सर्व गोष्टींना वाहिलेले वैचारिक वाङ्मय तें लिहितात. सावरकरांच्या निबंधातून त्यांची वैचारिक बैठक सिद्ध होते.

हिन्दू आणि हिन्दुस्थान ह्याची व्याख्या सावरकरांनी राष्ट्रीय दृष्टीकोनातून केलेली आहे. तत्पूर्वी सनातन धर्म म्हणजे काय हे ते तपासतात. धर्म हा सनातन असतो, ह्याचा त्याना वेगळा अर्थ लागलेला आहे. धर्म, हिन्दू, सनातन या संकल्पनांची व्याख्या ते बदलतात आणि बदललेल्या संदर्भात राष्ट्र आणि सनातन धर्म म्हणजे काय हे सांगत असतात. सावरकर वाचणे म्हणजे बदलत्या परिस्थितीत जुनी मूल्ये, नवे रुप, नवा अर्थ कशी धारण करतात हें पहाणे आहे. सावरकर स्वतः असे सांगतात की, 'नवदर्शन कुणीही मांडत नाही. मांडला जातो तो अन्वयार्थ (Interpretation) असतो.' स्वतःच्या काळाशी जे मिळते जुळते आहे, उद्दिष्टाच्या दृष्टिकोनातून जे उपयुक्त आहे ते तत्वज्ञान कोणते याचा विचार सतत होत असतो. हे उपयुक्त तत्वज्ञान मांडताना जी जी उपयुक्त मूल्ये आहेत त्यांचे नव्या परिस्थितीतील नवे अर्थ काय आहेत ते जाणून घेऊनच मांडायला हवे. या भूमिकेतूनच सावरकरांच्या सर्व व्याख्या अभ्यासल्या पाहिजेत. ऋषी हेच कार्य करीत असतात. प्रत्येक ऋषीची एक स्मृती असते. या स्मृतीचा त्या स्मृतीशी संबंध लावता येत नाही.

म्हणजे ती उत्क्रान्ती असते, विसंगती नसते. केशवसुत–आगरकर ह्यांचे कार्यही याच कोटीतील आहे. 'प्रत्येकाने आपल्या काळाचे वेद निर्माण करायला हवेत,' हे जे सूत्र आहे ते म्हणजे सावरकरवादाचे प्रेरक सूत्र होय. त्यांच्या निबंध वाङ्मयाचा 'सावरकरवाद' हाच आत्मा आहे. सावरकर हे एका ऋषीचे कार्य वैचारिक दृष्टया कसे करतात हे आपल्याला त्यांच्या निबंधांत पहावयास मिळते.

मनुष्याचा देव आणि विश्वाचा देव, यज्ञाची कुळकथा, गोपालन–गोपूजन नव्हें, ईश्वराचे अधिष्ठान म्हणजे काय, खरा सनातनी धर्म कोणता यासारखे तसें जुनेच आणि रूढीनें चालत आलेले विषय सावरकर तपासून घेत आहेत. त्यांनी विज्ञान आणि विज्ञानवृत्ती ह्यांची व्याख्या केली आहे. वैज्ञानिक दृष्टीने पहाता काय टिकते आणि काय टिकत नाही हे त्यांनी सांगितले आहे. टिकणारे आहें ते किती काळ टिकेंल याचा अंदाज दिलेला आहें. त्यात कोणत्या परिस्थितीत किती बदल करून घ्यावा लागेल हेही सांगितले आहे. सावरकर स्थितीशील आहेत, असे म्हटले जाते. परंतु ते तसे नाहीत. ते अत्यंत गतीशील आहेत. स्थितीशील समाजाला ते पचवता आले नाही. हा भाग वेगळा. त्यांच्या बरोबर समाजाला चालता आलेले नाही. टिळकांपासून आपण प्रेरणा घेतली असे सावरकर म्हणतात, पण टिळक हे लोकांचें पुढारी असल्याने ते एक एक पाऊल पुढे जात होतें. सावरकर म्हणतात, 'आम्हाला तें जमत नव्हते. आम्ही तरुण असल्यामुळे इतक्या वेगाने पुढे जात होतो की टिळकांना पुढची पावले निष्कंटक मार्गावर सुरक्षितपणे टाकता यावीत. आम्ही म्हणूनच पुरस्सर पथकाचे सैनिक बनलो होतो.' टिळक हें खड्गाची मूठ होते आणि सावरकरांनी त्या मुठीचे मनोगत सांगितले आहें. मूठ असल्याशिवाय पाते कार्य करू शकत नाही आणि पात्याने मुठीचे मनोगत ओळखून कार्य करावयाचे असते. टिळकांचें मनोगत ओळखून सावरकर कार्य करीत होतें. टिळक सनातन म्हणून त्यांना बाजूला टाकणे अयोग्य आहे. कारण ते प्रगतीशीलच होते. क्रांतिकारकांच्या दृष्टीनें आतापर्यंत पाहिलेल्या निष्ठांमध्ये आणखी एका निष्ठेची भर घालावी लागेल. ती म्हणजे शस्त्रनिष्ठा. मग सावरकरवाद पूर्ण होतो.

सावरकरांनी हे निबंध लिहायला घेतले त्यावेळच्या परिस्थितीचे वैशिष्टच लक्षात घेतले पाहिजे. ते रत्नागिरीला आले तेव्हा त्यांना राजकीय

दृष्टचा काही लिहायला किंवा बोलायला बंदी होती. परंतु त्यांची मूळ प्रेरणा राजकीय दृष्टचा कांहीतरी सांगावे हीच आहे. धर्मसुधारणा ही राष्ट्रीय उन्नतीसाठी आहे. ही भूमिका घेऊन राष्ट्राचे नांव न घेता ते धर्मपर लेख लिहित राहिले. मनातील जे सेकंडरी आहे ते त्यांच्या मनातील अपरमोस्टच्या तीव्रतेने ते लिहू शकतात हे सावरकरांचें वैशिष्टच ध्यानात घेतलें पाहिजे.

त्यांचा एक निबंध थोडासा वाङमयदृष्टचा उलगडून दाखवितो. 'मनुष्याच्या देव आणि विश्वाचा देव' हा त्यांचा एक उत्कृष्ट निबंध आहे. हे जग परमेश्वरानें निर्माण केलेले आहे, ते सुंदर आहे आणि पर्यायाने परमेश्वर चांगला आहें हे विश्लेषण कसें चुकीचे आहे हे त्यांनी या निबंधात स्पष्ट केले आहे. उदाहरणे आणि प्रमाण देत देत ते वेगाने तर्कशुद्ध रीतीने कोटीक्रम करीत पुढे जात राहातात. ते विचारतात, "फुले आहेत मग काटे कुणी निर्माण केले ? मोर सुंदर आहे, मग सर्प कुणी निर्माण केले ? नदी वहातें म्हणून आपण असतो. वारा आपल्यासाठी वहात नाही. प्रकाश आहे म्हणून आपण पहातो. म्हणजे परिस्थिती उलटी आहे. निसर्गात जे आहे त्यासाठी आपल्याला राहावे लागते. माणसासाठी कोणी मुद्दाम वेगळे काहीही केलेले नाही. म्हणून आपण कल्पिलेला परमेश्वर सत्य नाही. मग सत्य काय आहे ? सत्य काय आहे हें समजावून घेणे हेंच सत्य आहे. ही सृष्टी चांगल्याची आणि वाईटाची मिळून बनलेली आहे. जो अग्नि अन्न शिजवू शकतो तो तुम्हाला जाळूही शकतो. तो सज्जन आणि दुर्जन असा भेद करीत नाही. जीवन देणाऱ्या पाण्यात माणूस बुडून मरू शकतो. मूळ सृष्टीतील वस्तू चांगल्या किंवा वाईट नसतात, सृष्टी जर ओळखून घ्यावयाची असेल तर तिच्या वास्तव गुणासहित ओळखून घेतली पाहिजे. सृष्टीच्या वास्तव गुणांचा जास्तीत जास्त उपयोग कसा करून घेता येईल हें जो जाणतो तो खरा प्रज्ञापुरुष. आंधळेपणाने सृष्टीवर वाटेल ते गुणधर्म आरोपित करून स्वप्नाळू रीतीनें राहाणे हा धर्मभोळेपणा आहे. वास्तवदृष्टचा जे आहे ते चांगले वाईट पाहून त्याचा जास्तीत जास्त उपयोग मानवी प्रज्ञेला कसा करून घेता येईल ही विज्ञानदृष्टी होय. हे एकदा लक्षात घेतले म्हणजे सनातन शब्दाची व्याख्या बदलते. सृष्टीच्या प्रारंभापासून जे नियम आहेत ते सनातन नियम. ह्या सनातन धर्माच्या पाठीमागे गुणवंताचे अधिष्ठान पाहिजे. हा गुणवंत म्हणजे मानवी प्रज्ञा. ह्या प्रज्ञेने सनातन विषय आणि त्यांचे नियम ह्यांचा वापर करून

नवे निर्माण करता येईल आणि स्वतःचे सुख वाढविता येईल. स्वतःचें म्हणजे एकट्याचे नव्हे तर अखिल मानव जातीचे. अत्यंत श्रेष्ठ असें सुख अधिकात अधिक लोकांसाठी निर्माण करणारी जी बुद्धि, जे शास्त्र किंवा जे प्रमाण त्याबद्दल सावरकरांनी आपल्या लेखनात आग्रह धरला. सावरकरांचा निबंध हा असा वक्तृत्वाच्या वेगाने, वैचारिक आवेगाने जणू पूर्वपक्ष, उत्तरपक्ष करीत ठासून मत प्रतिपादन करीत निःशंकतेने आक्रमण करीत निघालेला असतो.

सावरकर शिकणे म्हणजे काय हे आपण ध्यानात घेतलें पाहिजे. दुर्दैवाने सावरकरांवर ब्राह्मण्याचा, सनातनीपणाचा शिक्का मारला गेला आहे. त्याचे कारण सावरकरांचे मूळ लेखन वाचले जात नाही, त्यांच्या संबंधात इतरांनी काय म्हटले आहे ते वाचून आपण आपलें मत बनवितो. परंतु सावरकरांचे वाङमय मुळातून वाचले तर आपल्या असे लक्षात येईल की ते वाचकाला विचार करायला लावते. आपल्या निबंधातून आपले विचार ते पटवून देत असतात. विधान, स्पष्टीकरण, उदाहरण, प्रमाण आणि निर्णय ह्या अवस्थातून त्यांचा निबंध विकसित होत जातो, त्याला Perfect Essay असे म्हणता येईल. मराठी वाङमयात सावरकरांचे निबंध हा वाङमयेतिहासाच्या दृष्टीने एक महत्वाचा टप्पा आहे. किंबहुना ती एक स्वतंत्र, स्वयंपूर्ण स्वायत्त अशी भूमी आहे. अंतर्गत रचना आणि बांधणीच्या दृष्टीनें सावरकरांचा निबंध परिपूर्णता व परिणामकारता राखतो असे त्याचे सौष्ठवपूर्ण स्वरूप आहे.

★★★

ग्रंथालय ठाणे
३०१३
निबंध २४०९४
७।१।८४
REFBK-0024094